18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

VTG/ 14:05

18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

VTG/ KGS/ KTG/ 14:05

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

पृ.शी. व मु.शी. सदस्यांचा परिचय

श्री.छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. रामदास गंगाराम कदम यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्थातर्फे निर्वाचित श्री. अमरिशभाई रसिकलाल पटेल यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. भाई जगताप यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय,सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. दीपक बापुसाहेब साळुंखे यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. सुभाष गणू भोईर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, पुणे स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित ॲड. वंदना हेमंत चव्हाण यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 2

VTG/ KGS/ KTG/ 14:05

पृ.शी. मु.शी : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत आज गुरुवार, दिनांक 18 मार्च, 2010 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले अभिभाषण छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. भाई जगताप यांचा प्रस्ताव

श्री भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य , त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, श्री. भाई जगताप यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

सभापती : प्रस्ताव असा आहे की :-

" माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

शुक्रवार, दिनांक 19 व शनिवार,दिनांक 20 मार्च, 2010 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांस सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या सुधारणा गुरुवार, दिनांक 18 मार्च 2010 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत, कक्ष क्रमांक 017, विधान भवन, मुंबई येथे द्याव्यात.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. शोक प्रस्ताव

मु.शी.: ज्येष्ठ साहित्यिक, कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री.मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री): सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री.मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते "

सभापती महोदय, थोर साहित्यिक, जाणीवनिष्ठ कवी, भाषंतरकार, समीक्षक आणि प्राध्यापक अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाने अबालवृध्दांना परिचित असलेल्या गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांचा जन्म 23 ऑगस्ट, 1918 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धालवली येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते.

कै. विंदा करंदीकर यांनी सुरुवातीस काही काळ मनमाड, तासगांव येथे शिक्षक म्हणून नोकरी केली. पुढे रत्नागिरी, कागल, बेळगाव येथील महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर मुंबईतील रुईया महाविद्यालय व एस.आय.ई.एस. या नामांकित महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले. या काळात विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची प्रतिमा होती.

कै.करंदीकर यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रमामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही भोगावा लागला होता. प्रारंभीच्या काळात त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव पडला होता. त्यांच्या कवितेत सामाजिक भान, विज्ञाननिष्ठ आणि अध्यात्मिक कुतूहल यांचा संगम झालेला दिसून येतो. प्रयोगशीलता हे त्यांच्या कवितेचे एक वैशिष्टय आहे. करंदीकर यांनी अनेक बाल कविता रचल्या. मुलांच्या भाव विश्वाशी समरस होऊन त्यांनी केलेल्या कविता खूपच गाजल्या. कल्पनाशक्ती, अभिजात प्रसन्नता आणि विनोद यातून साकारलेल्या त्यांच्या बाल कविता हा मराठी साहित्यातील अनमोल ठेवा आहे. ' राणीचा बाग ', 'एकदा काय झाले', सशाचे कान ',बागुलबुवा',

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

'परी ग परी', 'सर्कसवाला', अशी किती तरी कविता बालवाचकांत लोकप्रिय ठरल्या. 'स्पर्शाची पालवी', आकाशाचा अर्थ', 'करंदीकरांचे समग्र लघुनिबंध', हे ललित लेखनही लोकप्रिय झाले. काव्य लेखनासोबत विंदांनी भाषांतराचेही मोठे काम केले होते. ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', शेक्सपियरचे 'राजा लिअर', गाथेचे फाऊस्ट -भाग 1' इत्यादी ग्रंथांचे अनुवाद त्यांनी केले. मराठी समिक्षेत ' परंपरा व नवता ', ' उद्‌गार ' या ग्रंथांना खास महत्व आहे.

सर्वसामान्य माणूस हाच विंदांच्या साहित्य निर्मितीचा अखेर पर्यंत केंद्रबिंदू राहिला. सामान्य माणूस, त्यांचा जीवन कलह, त्याची स्वप्ने व स्वप्नभंग आणि या सर्वांसह त्याची जगण्याची चिवट इच्छाशक्ती हे विंदांच्या कवितेचे मर्म होऊन राहिले. 'स्वेदगंगा', मृदगंध', धृपद', 'जातक', विरुपिका', अष्टदर्शने' इ. कविता संग्रह विंदांच्या प्रतिभेची साक्ष देतात. त्यांच्या विपुल साहित्य संपदेने मराठी भाषा समृध्द झाली आहे.

कै.विंदा करंदीकरांच्या साहित्याला माणुसकीचे अधिष्ठान होते. 'उठ उठ सह्याद्रे । घुमवीत, बोल मराठी खडे । समतेचे हे तुफान उठले । उठले सागराकडे ॥ हे विंदांचे समतेच्या तुफानाचे काव्य ऐकताना ज्या माणसाच्या अंगावर रोमांच उठले नाहीत असा माणूस विरळच. त्याचप्रमाणे ' मजुरांच्या हाडांचा येथे जळतो अंगार सदा । मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरतीही यंत्रे । मजुरांचे पिंजुनिया स्नायू सूत इथे हे निघते । मजुरांच्या रक्ताने ते सुंदर होते ॥ ' अशा काव्यामधून विंदांनी सामान्य माणसांच्या जीवनातील वास्तवता दाखवून दिली आहे. विंदांना त्यांच्या साहित्य संपदेसाठी ' सीनिअर फुलब्राईट पुरस्कार', सोव्हिएत लँड नेहरु वाङमय पुरस्कार ', 'जनस्थान पुरस्कार' अशा अनेक पुरस्काराने सन्मानित केले होते. एवढेच नव्हे तर त्यांना भारतीय भाषेतील सर्वोच्च सन्मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कारही मिळाला होता.

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे । घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे ॥' अशा ओळी लिहिणाऱ्या आभाळाला कवेत घेणारी प्रतिभाशक्ती लाभलेल्या व केवळ मराठी काव्यालाच नव्हे तर साहित्यकरणाला आणि समाज जीवनाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणाऱ्या या ज्येष्ठ साहित्यिकाचे रविवार दि. 14 मार्च, 2010 रोजी वयाच्या 92 व्या वर्षी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.सरफरे....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

कै. मधुकर रघुनाथ सरपोतदार यांचा जन्म 31 जानेवारी 1934 रोजी रत्नागिरी जिल्ह्यात आंजणारी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. सरपोतदार यांनी महाराष्ट्र श्रमिक सेना, महाराष्ट्र रिक्षाचालक सेना, एअर इंडिया इंजिनिअरिंग ॲन्ड फ्लाईट डिस्पॅचर असोसिएशन मुंबई, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कर्मचारी संघटना, कापूस महासंघ कर्मचारी संघटना, सहकारी सहनिवास संस्था महासंघ खेरनगर, मुंबई. विजय बजरंग व्यायामशाळा, मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)चे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. सरपोतदार हे भवानी सहकारी बँकेचे संचालक, महाराष्ट्र कुस्तीगीर संघटनेचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सल्लागार, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट व कॉन्स्टीट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्लीचे आजीव सदस्य तसेच राष्ट्रीय जहाज वाहतूक मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

कै. सरपोतदार हे शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. लढाऊ शिवसैनिक, झुंजार कामगार नेते आणि अभ्यासू व प्रभावी संसदपटू म्हणून ते परिचित होते.

कै. सरपोतदार सन 1990 व 1995 असे दोन वेळा खेरवाडी, मुंबई मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 2002 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवरही निर्वाचित झाले होते. तसेच 1996 व 1998 असे दोन वेळा उत्तर-पश्चिम, मुंबई, मतदार संघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. लोकसभेतील शिवसेना पक्षाचे गटनेते तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी शिखर समन्वय समितीचे संस्थापक-सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले होते.

अशा या ज्येष्ठ लढाऊ कामगार नेत्याचे व अभ्यासू संसदपटूचे शनिवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सुप्रसिध्द कवि विंदा करंदीकर यांच्या निधनामुळे मराठी साहित्य सृष्टीची अपरिमित हानी झाली आहे. पुणे येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार होते. संमेलन अगदी तोंडाशी आलेले असतांना ते अचानकपणे आपणास सोडून जातील असे कुणालाही वाटले नव्हते. परंतु शेवटी नियतीपुढे कुणाचेच काही चालत नाही हेच खरे आहे.

विंदा आज हयात नसले तरी त्यांनी केलेली साहित्याची सेवा अजरामर राहणार आहे. काव्य संग्रह, बाल कविता संग्रह, ललित निबंध, समीक्षा, अनुवाद, इंग्रजी समीक्षा आदी साहित्याच्या अनेक प्रांतात त्यांनी अतुलनीय कामगिरी केलेली आहे. सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या साहित्याचा सतत केंद्रबिंदू राहिलेला आहे. "स्वेदगंगा" हा सन 1949 सालातील काव्य संग्रह असो किंवा "अष्टदर्शन" हा सन 2003 मध्ये प्रसिध्द झालेला काव्यसंग्रह असो या सर्वच काव्यसंग्रहात मानवी आस्था हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू होता. "शपथ तुला", "माझ्या मना बन दगड", "रक्तसमाधी", "ती जनता अमर आहे" इत्यादी त्यांच्या रचना समाजमनाचा ठाव घेणाऱ्या होत्या. नव काव्याची अभिरुचीही त्यांनी आपल्या काव्य गायनाने समाजातील सर्व थरामध्ये पोहोचविली. "देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेणाऱ्याने घेता घेता, देणाऱ्याचे हात घ्यावे" हे त्यांचेच शब्द, साध्या सोप्या शब्दात उदात्त आशय भरणाऱ्या त्यांच्या कविता म्हणजे साहित्यातील मौल्यवान अलंकार होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्ल मार्क्स आणि संत ज्ञानेश्वर यांच्या प्रभावामुळे त्यांचे विचार कधीच बंदिस्त राहिले नाहीत, त्यांची दृष्टी माणसाच्या जगण्याचा आणि सत्याचाही सतत शोध घेत राहिली.

विंदा त्यांच्या समवयस्कांबरोबर जसे रमले तसेच ते बालगोपाळातही रमले आणि म्हणूनच समृध्द सार्थकी जीवन जगू शकले. त्यांच्या जाण्याने आज एक न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

सभापती महोदय,सन्माननीय कै.मधुकरराव सरपोतदार, ज्यांना आम्ही आदराने "दादा" असे संबोधत असू, असे आमचे सर्वांचेच दादा म्हणजे सरपोतदारदादा यांचे दिनांक 20 फेब्रुवारी 2010 रोजी निधन झाले.

सुरुवातीपासून शेवटच्या श्वासापर्यंत एकाच पक्षात काम करणाऱ्या राजकारण्यांची संख्या हल्लीच्या जमान्यात कमी होत चाललेली आहे. परंतु शिवसेनेची दिनांक 19 फेब्रुवारी 1966 रोजी स्थापना झाल्यापासून सरपोतदार दादा आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्याशी आणि शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले. त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. परंतु राजकीय चढ-उताराने न डगमगता ते सतत आपल्या कामामध्ये मग्न राहिले.शिवसेनेच्या उत्कर्षाच्या काळात आणि पडत्या काळात देखील सतत शिवसेनेच्याच ध्येय धोरणांशी ते प्रामाणिक राहिले.

दादांचे व्यक्तिमत्व हे विविधांगी होते. महाराष्ट्र श्रमिक सेनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक कामगारांना न्याय मिळवून दिला. कामगारांच्यावतीने आंदोलनामध्ये उतरुन त्यांनी अनेक खटले आपल्या अंगावर ओढवून घेतले. सभापती महोदय, 1994 मध्ये जेव्हा मी कापूस पणन महासंघाचा प्रशासक म्हणून महाराष्ट्रात काम करीत होतो, तेव्हा त्यांनी कापूस कामगार सेना निर्माण केली होती. त्या कामगार सेनेच्या माध्यमातून अनेकदा त्यांचे प्रश्न समजावून घेण्याची मला माननीय श्री.मधुकरराव सरपोतदार यांच्याकडून संधी मिळाली. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने माननीय सरपोतदारदादा आणि माझे संबंध अधिक दृढ होत गेले. मराठी, हिंदी व इंग्रजी या तीनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांची समूहशक्ती निर्माण करण्यात त्यांचा हातखंडा होता.मुंबईतील दंगलीच्या वेळी याच समूहशक्तीच्या जोरावर त्यांनी बांद्रा खेरवाडीमधील हिंदूचे रक्षण केले. मुंबईत अवैधपणे रहाणाऱ्या बांगलादेशी आणि पाकिस्तानी नागरिकांना भारताबाहेर हाकलून लावण्यासाठी त्यांनी सतत आवाज उठविला. हिंदुत्वाचे कट्टर अभिमानी असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरपोतदार यांनी अनेक खटले आपल्या अंगावर ओढवून घेतले पण तत्वापासून कधी माघार घेतली नाही.

सभापती महोदय, या सभागृहात देखील आपण सर्वांनी त्यांचे कामकाज पाहिलेले आहे. ज्या वेळेला 1998 मध्ये ते लोकसभेमध्ये सदस्य म्हणून काम करीत होते, त्यावेळी मला देखील लोकसभेमध्ये त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. एक करारी बाण्याचा माणूस, एक कर्मठ माणूस आणि कधीही नियमाच्या बाहेर न जाता, संसदीय आयुधे वापरुन सरकारवर सतत प्रहार करण्याची एकही संधी त्यांनी लोकसभेमध्ये देखील सोडली नव्हती. सभापती महोदय, आपणही सभागृहामध्ये अनेक वेळा विधेयकांच्या बाबतीत पाहिलेले आहे की, या सभागृहामधून एकही विधेयक चर्चेशिवाय पारित होऊ नये असा त्यांचा सतत आग्रह असावयाचा. तसेच सभागृहातील कामकाजाच्या वेळेबाबत सुध्दा ते आपल्याला सतत असे सांगत असत की, आम्ही वेठबिगार नाही. सभागृहाचे कामकाज हे ठरलेल्या वेळेप्रमाणेच चालले पाहिजे असा त्यांचा आग्रह असावयाचा.

सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या निधनाने आपण एका अभ्यासू, निष्ठावान कार्यकर्त्यास मुकलो आहोत. त्यांचे विचार, त्यांचे वर्तन, त्यांची निष्ठा आम्हा सर्वांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल. याठिकाणी मी माझ्यावतीने, माझ्या पक्षाच्यावतीने या दोन्ही महानुभवांना आदरांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.छगन भूजबळ यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाबाबत माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

श्री.विंदा करंदीकर यांच्याबाबत आपण बोलणे कितपत योग्य आहे असे आम्हाला वाटते. कारण साहित्य क्षेत्रातील त्यांचे स्थान हे उच्च प्रतीचे आहे, ज्यांचे वर्णन ध्रुव ताऱ्याच्याही पलिकडील असेच करता येईल. कविता आणि इतर सर्वच क्षेत्रामध्ये मार्गदर्शन कसे असावे हे यावरुन कळेल. आपण त्यांच्या अनेक कविता वाचून दाखवू शकतो कारण त्या त्यांनी लिहिल्या आहेत. पण समतेचा विचार देणाऱ्या विंदा करंदीकर यांना या महाराष्ट्रामध्ये कवितेतील ऋषीतुल्यता प्राप्त झाल्या नंतर सुध्दा, त्यांनी ज्ञानपीठ हा सर्वोच्य पुरस्कार मिळविल्यानंतर सुध्दा आपण खरोखरच त्या पध्दतीचा समाज येथे अनुभवतो काय हा प्रश्न जेव्हा निर्माण होतो, तेव्हा विंदा करंदीकर यांना श्रध्दांजली वाहण्याची आपली स्वत:ची, मी योग्यता वगैरे म्हणणार नाही, परंतु आपण तसे आहोत काय असा विचार आपण अंतर्मूख होऊन करावयास पाहिजे अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी या ठिकाणी विंदांची एक कविता उद्धृत केली. "ऊठ ऊठ सह्याद्रे । घुमवित, बोल मराठी खडे । समतेचे हे तुफान उठले । उठले सागराकडे।।" महाराष्ट्रातील 'मराठी' हा शब्द जो सर्व साहित्यिकांनी जीवाभावाने जपला आणि ऊरी बाळगला त्यासंदर्भात माझ्या सदनामध्ये मला 'मराठीत बोला हो' असे ज्यावेळेला उठून सांगावे लागते त्यावेळेला आपण अशा थोर साहित्यिकांना श्रध्दांजली का वाहावयाची असा प्रश्न माझ्यापुढे निर्माण होतो. महाराष्ट्राच्या या सदनामध्ये मराठी राज्यभाषा असताना मराठी बोलण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्याची पाळी येते त्यावेळेला ज्या साहित्यिकांचा आदर करण्यासाठी आम्ही उभे राहतो त्यावेळी ही शाशंकता निर्माण होते की, आम्ही या थोर साहित्यिकांच्या बाबतीत आमच्या भावना व्यक्त करण्याच्या बाजूबाजूला तरी फिरकतो का ? काही कर्तव्ये असतात ती करावी लागतात कारण त्यांचे थोरपण फार मोठे आणि मोलाचे असते. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा, आपण बोलणार आहात ते आम्ही ऐकणार आहोत. अशा साहित्यिकांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ज्यावेळी आपण उभे राहतो त्यावेळी त्यांच्या मृत्यूचा सन्मान होण्यापेक्षा त्यांच्या मृत्यूमुळे विधानसभा आणि विधान परिषदच सन्मानित होते एवढी त्यांची उंची असते. आपण त्यांच्या अनेक कवितांचे रसग्रहण सांगणार, त्याच्यावर बोलणार त्यापेक्षाही आता साहित्यात तेवढ्या उंचीचे कोण राहिले आहे हा प्रश्न माननीय शिवसेनाप्रमुखांनी व्यथित अंत:करणाने निर्माण केला. एवढ्या उंचीचे जे होते ते सगळे गेले. विंदा हे त्या पिढीतील शेवटचे होते. त्यांच्या बाबतीत चार दिवस रसभरीत वर्णने येत आहेत. वाचता वाचता आपण थकतोय. मग आपल्या लक्षात येते की, या व्यक्तिमत्वाचे असे अनेक अंग असतात की, जे आपल्याला माहीत नसतात. तत्वशीलता आणि तत्वाशी कधी तडजोड नाही असे जीवन जगणारे, सामान्य जीवन जगणारे, स्वत:ची कामे स्वत: करावयाची आणि या वयामध्ये त्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहावयाचे नाही ही जी तपस्वीता या व्यक्तिमत्वांकडे येते त्यावेळेला त्यांच्याबद्दल आपल्या जीवनामध्ये बोलावयास मिळते हे आपल्याला मिळालेले मोठेपण असते ही भावना व्यक्त करताना विंदांबद्दलचा आदर कोणत्या शब्दात व्यक्त करावा असे मला वाटते. ज्ञानपीठ पुरस्काराने पुरस्कृत झालेल्या महाराष्ट्रातील एका थोर

....2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

RDB

श्री. दिवाकर रावते .....

साहित्यिकाला आपण मुकलो आहोत. पण एक खंत वाटते. त्यांच्या या शेवटच्या अस्ताच्या काळामध्ये सारस्वतांची भूमी असलेल्या पुण्यामध्ये स्वत:चे काव्य वाचन करण्याकरिता ते येणार होते परंतु आता ते येऊ शकणार नाहीत. एका सारस्वत नगरीमध्ये एका सारस्वताला उद्याचे साहित्य सम्मेलन मुकलेले आहे अशी खंत व्यक्त करुन त्यांच्या बद्दलच्या भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमचे नेते दादा सरपोतदार यांचा आणि माझा सततचा परिचय होता. संघर्ष म्हणजे दादा सरपोतदार. शिवसेनेमध्ये जिथे संघर्ष असेल त्या संघर्षामध्ये जी जी नावे गोवली जातात त्यामध्ये दादा सरपोतदार हे एक नाव कायम असावयाचे. किंबहुना या सदनामध्ये बोलताना ते असे म्हणाले होते की, संघर्ष पुढे चालतो आणि त्याच्या मागे मी जातो, माझ्यामागे संघर्ष येईल यासाठी मी कधी थांबत नाही, कारण मी शिवसेनाप्रमुखांच्या विचाराने घडलेला जातीवंत शिवसैनिक आहे. दादांमध्ये एक वेगळे वैशिष्ट्य होते. सुदैवाने दादा विधानसभेत होते, विधान परिषदेत होते, आणि लोकसभेमध्येही होते. त्यांचा बाहेरच्या कामाचा मोठा व्याप होता. ते कामगार नेतेही होते पण सुशिक्षित, सुलक्षणी आणि समोरच्या माणसाशी त्याच पध्दतीने संवाद करणारे असे ते नेते होते. अरेला कारे म्हणणार परंतु कामगारांच्या भल्याकरिता काही वेळेला एक पाऊल मागे जावे लागले तरी चालेल, कामगारांच्या भल्याचे जे असेल त्याकरिता तडजोड नाही आणि त्यावेळेपुरते जे योग्य असेल ते करणार. कामगारांच्या हिताकरिता एक वेळ संघर्ष बाजूला ठेवावा लागला तरी चालेल अशा पध्दतीचे कामगार क्षेत्रातील त्याचे काम मोठे आणि वेगळ्या पध्दतीचे होते. आमचे दादा सरपोतदार श्रमिक सेनेचे प्रमुख होते. माननीय शिवसेनाप्रमुखांनी त्यांना शिवसेनची कामगार सेना असताना सुध्दा कामगार क्षेत्रातील स्वतंत्र संघटना चालू करण्याची परवानगी दिली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. माझा आणि त्यांचा परिचय नवीन असताना ते जॉन्सनमध्ये लेबर ऑफीसर होते. मी ठाण्यामध्ये जात येत असे. मी एक शिवसैनिक आहे. कोठे काही असेल तर धावावयाचे हे आमच्या रक्तातच होते. मी त्यावेळी वर्तमानपत्रामध्ये वाचले. दत्ता सामंत यांनी त्यावेळेला असे जाहीर केले की, आज आम्ही सरपोतदारांना घेराव घालणार.

यानंतर श्री. खंदारे...

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मी ताबडतोब दादांकडे जाऊन उभा राहिलो. त्यावेळी ते मला म्हणाले की, दिवाकर कशासाठी आलास ? मी त्यांना म्हणालो की, आज घोषणा झाली आहे ना ? आमच्या डोक्यात असे होते की, आमच्या नेत्याला कोणी तरी घेराव घालणार आहेत. ते लेबर ऑफिसर म्हणून तेथे कार्यरत आहेत हे आमच्या डोक्यातच नव्हते. त्यावेळी ते मला म्हणाले की, तू चिंता करु नकोस. तू जा. तेथे बाकीचे संवाद काय झाले ते मी येथे सांगत नाही. असा संघर्ष करणारे नेते म्हणजे दादा सरपोतदार. ते जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीत असताना एखादा माणूस आपल्या व्रताशी किती प्रामाणिक राहू शकतो ? ते त्या कंपनीत लेबर ऑफिसर असल्यामुळे कंपनीचे भले बघणार हे अपेक्षित होते. परंतु त्यांनी असंख्य बेकार शिवसैनिकांना, युवकांना कामाला लावले. पण कामगारांच्या भल्यासाठी त्यांनी ते पदही सोडून दिले. श्री.दत्ताजी नलावडे एकदा म्हणाले होते की, ते पूर्वी एका छोटया धरमशी मोरारजी नावाच्या उपक्रमात कामाला होते आणि त्यांच्या घरासमोरच कब्बडीचे सामने होत असत. त्यांना कब्बडीचा शौक होता. कब्बडी या क्रीडा क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळवून त्या कब्बडी संघटनेचे नेतृत्व केले होते. कामगारांच्या वेगवेगळया संघटनांमध्ये सहभागी होवून शिवसेनेच्या मुलभूत अशा प्रत्येक आंदोलनामध्ये दादा विचाराने नव्हे तर आचाराने सहभागी होत असत. जी परिस्थिती असेल त्या परिस्थितीला सामोरे जाऊन त्यात उतरत असत. श्री.अनिल देसाई हे त्यांच्या सोबत सातत्याने होते. ते एकेक गोष्ट सांगू शकतील. त्या गोष्टी मला माहीत आहेत आणि शिवसैनिकांनाही माहीत आहेत. दादा, कोणत्याही परिस्थितीला घाबरायचे नाहीत, कचरायचे नाहीत. 1992-93 च्या दंगलीमध्ये पोलिसांचे तुकडे तुकडे करुन टाकणारा समाज जेथे राहतो त्या समाजाला सुध्दा धाक दाखविण्याची त्यांच्यात हिंमत होती. दादा सरपोतदार यांनी येरवडा जेलमध्ये जवळपास 6-7 महिने तुरुंगवास भोगला होता. मला त्याच जेलमधील एका खोलीत जेलरने नेले आणि सांगितले की, ज्या खोलीत दादा सरपोतदार यांना ठेवले होते त्या खोलीत तुम्ही आहात. तेव्हा तुमच्या बरोबर जे कार्यकर्ते आहेत त्यांना समजावून सांगावे. दादा तुरुंगात असताना सुध्दा कसे वागायचे, कसे विचार करायचे, कसे रहायचे, कसा संवाद साधायचे ते त्या तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी मला आवर्जून सांगितले होते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जेलमध्ये असताना सुध्दा त्यांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यावेळी दादांनी कशासाठी तुरुंगवास भोगला होता ? हिंदुत्ववाद्यांवर होणा-या आक्रमणाच्या विरोधात त्यांनी संघर्ष पुकारला होता. त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. शेवटी न्यायालयाने त्यांना त्यातून मुक्त केले. परंतु त्यांच्या जीवनातील सहा महिने अत्यंत कठीण स्थितीत गेले होते. तसे कठीण दिवस मी सुध्दा अनुभवले होते. दादांचा पोलिसांशी नेहमीच संघर्ष होत होता. एकदा दादांना अटक होत असताना पहिल्यांदा हायवे बंद केला गेला. हजारो महिलांनी तो रस्ता बंद केला होता. इतका प्रखर संघर्ष घराघरांमध्ये पोहोचला होता. आज आपण दादांना आदरांजली वाहत आहोत. पण ते विधानसभेत होते, या सभागृहात होते. मी त्यांच्या बाजूला बसत होतो. त्यांच्या संसदीय कार्य पध्दतीबद्दल बोलण्याची आवश्यकता नाही. कारण आपण सर्वांनी ती अनुभवली आहे. सभागृहात आम्हाला वेठबिगार ठरवू नये असे सातत्याने बोलत असत. दादा सभागृहात आल्यानंतर नियमांचे पुस्तक समोरच ठेवत असत. ते केव्हाही नियमाच्या आधारे बोलत असत. या संसदीय कामकाजामध्ये नियमाला सोडून कोणतेही कामकाज होता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असे. ते ज्या पध्दतीने सरकारसंबंधी बोलत असत त्याच पध्दतीने स्वकीयांना सुध्दा ते कधी माफ करीत नसत. एखादी गोष्ट नियमांच्या विसंगत होत आहे असे त्यांना वाटले की, ते लगेच बाहेर येऊन आम्हाला बोलत असत की, असे होता कामा नये, असे होऊ नये. इतका कडवटपणा त्यांच्यात होता. सभापती महोदय, आपल्याही दालनामध्ये कोणत्याही चर्चेसाठी आल्यानंतर त्यांच्यातील कडवटपणा कमी होत नसे. सभागृहात कोणतेही विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची तारीख, त्याचे संदर्भ ते नीट व्यवस्थितपणे लिहून ठेवत असत. सभापती महोदय, ज्यावेळी दादा सरपोतदार या सभागृहात असायचे त्यावेळी आम्हाला त्यांचा मोठा आधार वाटत असे. या सदनाला सुध्दा आधार वाटत असे. त्यांचे एक वैशिष्ट्य होते. या सभागृहात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी ते लक्षात ठेवले पाहिजे. दादा एकदा सभागृहात आल्यानंतर सभागृहाची बैठक संपेपर्यंत बाहेर जात नव्हते. गंमत म्हणून ते दिवसभर बसत नसत, तर आपण या विधिमंडळामध्ये

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आल्यानंतर विधिमंडळाच्या कामकाजामध्ये पूर्णपणे सहभागी झाले पाहिजे, आपण एखाद्या चर्चेत सहभागी होवो अगर न होवो, सभागृहात दुसरे वक्ते बोलत असतात त्यावेळी त्यांचे विचार आपण ऐकले पाहिजेत आणि आपण ज्यावेळी बोलत असतो त्यावेळी आपले विचार दुसरे सदस्य ऐकत असतात याचे भान त्यांना सातत्याने होते. त्यामुळे आपण सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे अशी त्यांची भावना असे. युतीचे शासन असताना ते सरकार कसे बरखास्त करता येईल यादृष्टीने त्यावेळच्या विरोधी पक्षातील काँग्रेसवाल्यांनी चंग बांधला होता. राज्यातील सरकार बरखास्त करण्याच्या घटनेतील कलमाचा वापर करण्यासाठी दिल्लीमधील सरकारवर प्रचंड दबाव टाकण्यात आला होता.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...

मला आठवते, त्यावेळच्या परिस्थितीच्या संदर्भात मला दादांसमवेत दिल्लीला जाण्याचा प्रसंग आला. दादा त्यावेळी केन्द्रीय गृहमंत्र्यांना भेटले. दादांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा तेथील संसद व्यवस्थेवर आणि मंत्रिमंडावर होता. कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण महाराष्ट्राची बाजू एकल्या शिवाय अशा प्रकारचे पाऊल उचलता येणार नाही असे केन्द्रीय गृहमंत्र्यांना ठणकावून सांगणारे दादा मी त्यावेळी पाहिले. त्याचा परिणाम असा झाला की, केन्द्रीय गृहमंत्री मुंबईला आले, शिवसेना प्रमुखांना भेटले, तत्कालीन मुख्यमंत्र्यांना भेटले, सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यानंतर सरकार बरखास्त करण्याचा केन्द्राचा निर्णय स्थगित करण्यात आला. दादा आम्हाला कौतुकाने सांगत असत की, ते संसदीय अंदाज समितीचे चेअरमन असताना आताचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे त्यावेळी त्यांच्या समितीमध्ये सदस्य म्हणून असायचे आणि ते त्यांच्या समवेत विविध विषयावर चर्चा करायचे. दिल्लीतील असे अनेक दिग्गज दादांची चौकशी करायचे. आपल्या कार्यकर्तृत्वाची आणि व्यक्तिमत्वाची छाप संसदेवर टाकणारे दादा आज आमच्यातून गेले आहेत. या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी जेव्हा दादांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला त्यावेळी मी त्यांच्याकडे पाहिले. एकेकाळचे ते त्यांचे सवंगडी. निष्ठा कशा असाव्यात ? सभापती महोदय, घरामध्ये अन्य पक्षाचे वादळ घोंगावले तरी दादांची शिवसेना प्रमुखांवरची निष्ठा कधीही पातळ झ ाली नाही. शेवटपर्यन्त त्यांनी कडवट निष्ठा जोपासली. स्वत:च्या घरातच दुस-या पक्षाचे काम चालू असताना शिवसेनेचे काम करण्याकरिता घराबाहेर पडणारे दादा मी पाहिले. मला काय मिळाले या पेक्षा मी एक कडवट शिवसैनिक आहे हे व्रत अखेरपर्यन्त सांभाळणारे दादा आमच्या सारख्या शिवसैनिकांना आदर्श आहेत.. या संघटनेमध्ये मला काही मिळत नाही म्हणून निष्ठा टाकून पळणारे मी अनेक पाहिले. घरामध्ये दुस-या पक्षाशी संघर्ष असतानाही शिवसेनेवरची निष्ठा तिळमात्रही ढळू न देता दादा शेवटपर्यन्त आमच्या भगव्यामध्येच राहिले. हे सर्व संस्कार शिवसेना प्रमुखांनी केले आणि ते त्यांनी अखेरपर्यन्त जोपासले. ते संस्कार आमच्यामध्ये कायम राहोत अशा प्रकारची भावना मी व्यक्त करतो आणि दादांना आणि विंदांना आदरांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या 10-15 वर्षात आणि स्वातंत्र्यानंतरच्या 10-15 वर्षात मराठी काव्य क्षेत्रामध्ये ज्यांची नावे अतिशय तळपून उठली त्यामध्ये विंदा हे एक नाव होते. सुरुवातीला बा.सी.मर्ढेकर, कुसुमाग्रज, वसंत बापट, मंगेश पांडगावकर अशी फार मोठी दिग्गज माणसे होती. राज्यकर्ते ज्या देशामध्ये स्वतंत्र असतात किंवा जो देश स्वतंत्र असतो तेथे साहित्याला जो मान मिळतो त्या दर्जाचा मान पारतंत्र्यामध्ये असलेल्या देशातील साहित्याला फारसा मिळतो असे नाही. त्यावेळी साहित्याला जो सन्मान मिळायला पाहिजे तो मिळत नाही हे त्या पिढीच्या लक्षात येत होते. ही माणसे त्यावेळेला काव्यावरच्या आपल्या श्रध्देतून गावागावातून, शहरा-शहरातून काव्य गायनाचे कार्यक्रम करीत असत आणि हे कार्यक्रम ज्या तरुण पिढीने पाहिले त्या पिढीचा मी एक प्रतिनिधी आहे. मला विंदांचे एक महत्वाचे वैशिष्टय वाटते ते असे की, राजकारण हे समाजकारणाशी चाटून जाते. राजकारणामध्ये अनेक विषय हे सामान्य असे असतात. पण राजकारणाच्या या प्रवाहामध्ये काळाच्या ओघात काही असामान्य असे प्रसंग येतात. मग स्वातंत्र्य आंदोलनासारखा प्रसंग असेल, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसारखा प्रसंग असेल किंवा आणीबाणीसारखा प्रसंग असेल, अशा वेळेला त्या क्षेत्राशी संबंधित नसलेली देखील अनेक माणसे त्यामध्ये दाखल होतात. पण एकदा राजकारणाच्या प्रवाहामध्ये दाखल झाल्यानंतर फार दुर्मिळ माणसे त्यापासून बाजूला सरकतात. हैद्राबादच्या मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेला हा थोर सेनानी ते काम संपल्या बरोबर पुन्हा आपल्या साहित्याच्या क्षेत्राकडे, काव्याच्या क्षेत्राकडे ज्या सहजपणे वळला ते एक त्यांचे दुर्मिळ अशा प्रकारचे वैशिष्टय आहे असे मला स्वत:ला नेहमीच वाटत आलेले आहे. सभापती महोदय, सामान्य लोकांची संख्या ही मोठीच असणार. असामान्यांच्या पोटी जन्म घेऊन असामान्यत्वाला पोहोचणे हे फार कठीण आहे अशातला भाग नाही. पण सामान्याच्या पोटी जन्म घेऊन असामान्यत्वापर्यन्त जो मनुष्य पोहोचतो तो अनेक सामान्य लोकांसाठी दीपस्तंभासारखा उभा रहातो. विंदांनी त्यांच्या आयुष्याची सुरुवात ही मनमाडला, तासगावला शिक्षक म्हणून केली.

...नंतर श्री. भोगले.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

शिक्षक म्हणून काम केल्यानंतर स्वत:च्या गुणांनी ते नंतर प्राध्यापक झाले. बेळगावसारख्या ठिकाणी व शेवटी शेवटी मुंबईतील रुईया, ईएसआयएस कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्या काळात जी नामांकित अशी मंडळी होती, त्यामध्ये कै.विंदा करंदीकर हे एक होते. ज्ञानपीठ पुरस्काराचा मानकरी ठरलेला हा थोर माणूस अतिशय समृध्द असे 92 वर्षाचे जीवन जगला. मला त्यांचे एक अतिशय महत्वाचे वैशिष्ट्य वाटते ते असे की, मानवी स्वभावाचे बारीक धागेदोरे न्याहाळून जो स्वभाव चिरंतन आहे, चिरायू आहे, टिकावू आहे त्यांना ओळखून त्यावर शब्दांची रचना बांधणे हा अतिशय दुर्मिळ गुण त्यांच्यामध्ये मुबलक प्रमाणात होता असे मानणारा मी आहे. मानवी समूह आहे त्यामध्ये देणाऱ्यांची संख्या कमी आहे. देणारे आहेत ते देतच जातात, ते विचार करीत नाहीत. अशांची संख्या कमी आहे. परंतु घेणाऱ्यांची संख्या भरमसाठ आहे आणि घेता घेता किती घ्यावे याची मर्यादा ठाऊक नसलेल्या लोकांची संख्या सुध्दा खूप आहे. हा मानवी स्वभाव आहे. ही संख्या अगदी अल्पसंख्य आहे. मोजायची झाली तर दुर्मिळ ठरेल अशी आहे. मग हे सारे चित्र ज्यांच्या मनामध्ये त्यांनी पाहिले त्यावेळी त्यांनी या स्थितीचे वर्णन केले, "देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातच घ्यावे." घेणाऱ्याचा स्वभाव आणि देणाऱ्याचा स्वभाव इतक्या सोप्या पध्दतीने त्यांनी मांडला. हा मानवाचा स्वभाव चिरायू असल्यामुळे त्यांचे हे शब्द सुध्दा सहजपणे चिरायू ठरणार आहेत. मानवी स्वभावावर उत्कृष्टपणे शब्दरचना करणाऱ्या कै.विंदा करंदीकर यांच्याबद्दल मी मनापासून आदरभाव व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सभागृहातील आमचे सहकारी कै.मधुकरराव सरपोतदार यांना सुध्दा आपण आदरांजली अर्पण करीत आहोत. अतिशय तडफदार कामगार नेता, अतिशय उत्कृष्ट संसदपटू, प्रदीर्घ संसदीय कारकीर्द लाभलेले आणि या राज्याच्या विधानसभेमध्ये दोन वेळा, देशाच्या लोकसभेमध्ये दोन वेळा आणि विधानपरिषदेमध्ये सहा वर्षे ते आपल्यासोबत होते. या सभागृहातून निवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा जास्त कालखंड उलटलेला नाही. नियमांच्या पुस्तकावर बोट ठेवणारे, नियम लक्षात आणून देणारे, पीठासीन अधिकाऱ्यांना नियमांनुसार कामकाजाबाबत विनंती करणारे आणि पीठासीन अधिकारी सुध्दा त्यांची विनंती लक्षात घेऊन योग्य ती दुरुस्ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यास सहमत होत असत. कै.मधुकर सरपोतदार यांची संसदीय कारकीर्द अतिशय प्रभावी ठरली. कामगार चळवळीमध्ये त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे आणि तिसरे म्हणजे आपल्या पक्षाशी ठामपणे निष्ठा बाळगणारे होते. पक्षाच्या स्थापनेपासून शेवटपर्यंत पक्षनिष्ठा त्यांनी सोबत ठेवली असा वैशिष्ट्यपूर्ण नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. मी मनापासून त्यांना श्रध्दांजली वाहतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उपमुख्यमंत्री यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या शोकप्रस्तावासाठी मी माझ्या सहवेदना याठिकाणी व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

मराठी सारस्वताच्या दरबारातील एक ज्येष्ठ मानकरी आदरणीय विंदा करंदीकर यांचे दु:खद निधन झाले. मराठी वाङ:मयाला तीन महापुरुष लाभले. तीनही कादंबरीकार व कवी अशा साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला ते कै.वि.स.खांडेकर, कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर हे होत. जेव्हा विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा सभागृहात आपण सर्वांनी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडून तो संमत केला. हा अभिनंदनाचा प्रस्ताव संमत केल्यानंतर त्यांचा या दोन्ही सदनाच्या वतीने आपल्या मध्यवर्ती सभागृहात सन्मान करावा, सत्कार करावा किंवा त्यापेक्षा मोठा सत्कार शासनाच्या वतीने करावा अशी आपल्या सर्वांची इच्छा होती. पण तत्वाशी कधीही तडजोड न केलेल्या आणि कोणत्याही सत्कार सन्मानाची अपेक्षा आयुष्यामध्ये कधीही न बाळगलेले हे महाकवी होते.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

त्यांच्या सुनबाई डॉ. नीलमताई गोऱ्हे या आपल्या सभागृहात सदस्या आहेत. आपले ठरले होते की, त्यांचा या ठिकाणी सन्मान करायचा परंतु विंदा यांनी अशा प्रकारचा कुठलाही सन्मान घ्यायचा नाही हा जीवनात घेतलेला निर्णय त्यांनी शेवटपर्यंत अमलात आणला. पुण्याला 26 ते 28 मार्च या काळात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा कार्याध्यक्ष म्हणून आम्ही विंदांना उद्घाटनाचे निमंत्रण दिले. त्यांनी यासाठी येण्याचेही मान्य केले. एवढेच नव्हे तर त्यांचा स्वभाव एवढा मिश्कील की त्यांनी स्वत:च्या हाताने या संमेलनासाठी उपस्थित राहीन म्हणून पत्रही लिहून दिले. त्यावेळेस स्वागताध्यक्ष आणि आम्ही म्हणालो की, पत्राची वगैरे काही जरुर नाही परंतु ते म्हणाले की, लोकांना असे वाटेल की, हा माणूस येतो की नाही ? वय झाले वगैरे शंका कुशंका व्यक्त करतात म्हणून माझे पत्र घेऊन जा. असे म्हणून त्यांनी थरथरत्या हाताने चार ओळीचे पत्र दिले आणि ते पत्र आजही त्या ठिकाणी आहे त्यामुळेच आज विशेष दु:ख होत आहे. ज्यावेळी उद्घाटनाला येणार अशी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले, त्यांचा पहाडी आवाज होता. त्या आवाज ते म्हणाले की, कदाचित तुमची कल्पना असेल की मी भाषण करावे परंतु मी या संमेलनाच्या ठिकाणी भाषण वगैरे करणार नाही तर माझ्या कवितांचे काव्य वाचन करीन. त्यातल्या त्यात महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी जी गीते केलेली आहेत त्यापैकी दोन तीन गीते तरी मी 100 टक्के म्हणून दाखवीन. आताच सभागृहात सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे अत्यंत परखड मते असणाऱ्या विंदांवर सुरुवातीला गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. नंतरच्या काळात कार्ल मार्क्सपासून शेक्सपियरपर्यंत, ज्ञानोबापासून तुकोबांपर्यंत कुठलाही वैचारिक बैठकीचा धागा त्यांनी सोडला नाही. या सर्वांच्या मधून त्यांचं सूत्र मात्र असं होतं की, माणसामधला माणूस शोधावयाचा, सत्याचा वेध घ्यायचा, समतेच्या तत्वांशी कधीही तडजोड करावयाची नाही. सामान्यपणे विचारांप्रमाणे आचरण करावयाचे यांची जी फारकत समाजामध्ये आज तुम्हा-आम्हाला दिसत आहे त्याबाबत विंदांच्या बाबतीत आदरपूर्वक सांगितले पाहिजे की, विचार आणि आचरण यांचे एक सूत्र जीवनाच्या माध्यमातून सर्व समाजाला, सर्व साहित्यिकांना आणि सर्वांना खऱ्या अर्थाने आपल्या वागण्यातून, आपल्या आचरणातून दाखविलेले होते. त्यांचे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

जबरदस्त प्रभुत्व होते तसेच त्यांची भाषांतरे खूप गाजलेली आहेत. म्हणून दीर्घ काव्यांपासून बालकवितांपर्यंत कसलाही प्रांत त्यांनी सोडलेला नाही. आताच प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, समकालीन कविंच्या मध्ये कै. वसंत बापट ते कै. विं.दा.करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या तिन्ही महानुभवांनी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यामध्ये, खेड्यापाड्यापर्यंत काव्य वाचनाचा आणि काव्य गायनाचा हा प्रकार पोहचविला. त्यापूर्वी देखील हा प्रकार होताच. कवि यशवंत, मर्ढेकर तसेच बा.भ.बोरकर यांच्या काळातही या तिघांनी मराठी वाङ:मयामध्ये काव्य गायनाचा प्रकार अत्यंत लोकप्रिय केला. त्यावेळेस जे मानधन मिळत होते त्याबाबत त्यांनी लिहून ठेवलेले आहे. त्यावेळेस या तिघांना मिळून 51 रुपये मानधन मिळत होते. 51 रुपयेच का तर 17 गुणिले 3 असे तिघांना सारखी रक्कम मिळावी म्हणून 51 रुपये त्या काळात मानधन ठरवून दिलेले होते. अशा या तिन्ही महा कविंच्या बाबतीत पुलंनी आपापल्या परीने वर्णन केलेले आहे. त्यांनी वसंत बापट यांच्या बाबतीत वर्णन केले आहे. मंगेश पाडगांवकरांच्या बाबतीत वर्णन केलेले आहे. त्यांनी असे वर्णन केले आहे की, एक कवी मानधनाचे पाकिट मिळाले की खिशात हात घालून खिशातल्या खिशातच मोजत होते. दुसरा कवी मानधनाचे पाकिट मिळाल्याबरोबर पत्नीकडे देत होते. तर विंदांच्या बाबतीत वर्णन करताना त्यांनी सांगितले की, मानधनाचे पाकिट सर्वांच्या समोर उघडणार आणि नोटा मोजणार, कारण काय तर तुझी एक रुपयाची नोट सुध्दा मला जास्त येता कामा नये म्हणून मी मोजतो, असे ते म्हणत असत. तसेच ते पाकिट ताबडतोब कोणाला तरी देणगी म्हणून ते देत असत. अशा प्रकारे त्यांनी कधीच मानधनाचे पाकिट घरी नेले नाही हे विंदांच्या आयुष्यातील फार मोठे वैशिष्ट्य होते. आताच प्रा.बी.टी. देशमुख यांनी सांगितले की, सामान्यत्वाकडून असामान्यत्वाकडे पोहचणे हे जसे अवघड तसेच ते अत्यंत साधे आणि सोपे विंदांनी आपल्या आयुष्यात करुन दाखविले पण आयुष्यात त्यांनी मानधनाचा एक रुपया सुध्दा खर्च केला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

त्यांना जे काही मानधन मिळत होते ते त्यांनी कधीच जवळ ठेवले नाही तर ते त्यांनी कोणत्याना कोणत्या मार्गाने परत देऊन टाकले होते. विंदांचे दुसरे वैशिष्टयअसे की, कै. विंदा यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्य योद्धे म्हणून काम केले होते परंतु ते काम संपल्यानंतर कुठलीही अपेक्षा न करता त्यातून बाहेर येऊन आपल्या काव्य प्रांतामध्ये समरस होणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या अनेक काव्यांचे वर्णन या ठिकाणी करण्यात आलेले आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजाचे हे चतुर्थ जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे मुद्दाम वर्णन करतो की, विंदांच्या मुखातून हे काव्य मला तीन वेळा ऐकायला मिळाले होते. त्या वाक्यातील कल्पना अशी आहे की, शेक्सपियर आणि संत तुकाराम महाराज स्वर्गामध्ये भेटलेले आहेत व त्यांच्यांमध्ये जो संवाद होतो तो विंदानी लिहिलेला आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, विंदाची ताकद फार मोठी होती. त्यांनी विल्यम शेक्सपियरचा उल्लेख "विल्ल्या" म्हणून केलेला आहे आणि संत तुकाराम महाराजांचा उल्लेख "तुक्या" असा केलेला आहे. विल्ल्या तुक्याशी बोलतो आहे असा तो संवाद आहे. त्या संवादामधून त्यांनी दाखवून दिलेले आहे की, आमचे जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे सर्वश्रेष्ठ तत्ववेत्ते होते आणि हेच दाखवण्याचे काम विंदानी आपल्या काव्य पंक्तीमधून, शब्दाच्या सामर्थ्यामधून मराठी सारस्वताला आणि मराठी माणसाला दिलेले आहे. त्यांच्या खूप कविता मी वाचलेल्या आहेत. मी जेव्हा शाळेत शिकत होतो तेव्हा त्यांची एक कविता अशी होती की, "माझ्या मना बन दगड, हास रगड, हास रगड" अशी कविता होती. या कवितेमधून त्यांनी स्थितप्रज्ञाची एक फिलॉसॉफी दाखवून दिलेली आहे. "तू तुझ्या मनावर दगड ठेव, मन दगड करुन टाक आणि मग आयुष्यामध्ये हसत जा, हसत जा असे त्यांना या कवितेमधून सांगावयाचे होते. अशा सुंदर आणि साध्या शब्दामध्ये काव्य लिहिण्याचे सामर्थ्य आणि त्यातून मोठे तत्वज्ञान सांगण्याचे सामर्थ्य हे विंदाच्या काव्य पंक्तीमध्ये होते. "उसळलेल्या द-यातून, पिसाळलेली आयाळ घ्यावी, भरलेल्या भीमेमधून तुकोबाची माळ घ्यावी" असे सुंदर तत्वज्ञान विंदांच्या कवितेमधून आपल्याला दिसून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

येते. विंदानी भागवत संप्रदायाचे तत्वाज्ञान असेल, मार्क्सवाद असेल, कान्ट असेल, एंजेल असेल, शेक्सपियर असेल, टॉलस्टॉय असेल असे सर्व वाङमय प्रकार त्यांनी हाताळले होते, त्यांनी कोणतेही वाङमय सोडले नाही एवढे सामर्थ्य विंदांच्या लेखणीमध्ये, काव्यामध्ये आणि लेखनामध्ये होते.

सभापती महोदय, विंदा हे आमच्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला येणार होते परंतु मला त्यासंदर्भात सांगतांना वेदना होतात. ते जर आमच्या कार्यक्रमाला आले असते तर सर्व मराठी मनाला आनंद झाला असता. परंतु तरी देखील या सदनाला मी सांगू इच्छितो की, आम्ही कार्यक्रमाच्या संदर्भात निर्णय घेतला आहे की, उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी विंदांच्या काव्य गायनाच्या क्लिपिंग्स त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या रसिकांना दाखविल्या जाणार आहेत. मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली महासाहित्यिकाला, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या सरस्वती दरबारातील एका श्रेष्ठ मानक-याला अर्पण करतो.

सभापती महोदय, आमचे सर्वांचे सहकारी कै.मधुकर सरपोतदार (दादा) हे सुरुवातीला माक्सर्वादी विचाराचे होते परंतु ते नंतर शिवसेनेच्या विचाराने प्रभावित झाले होते. मराठी माणसाच्या प्रश्नांच्या संदर्भात त्यांची पोटतिडीक, कामगार चळवळीतील त्यांच्या पोटतिडकीबद्दल तसेच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या संदर्भातील वर्णन या ठिकाणी करण्यात आले आहे. त्यांनी मोठया प्रमाणात कामगार चळवळी बांधल्याच बांधल्या परंतु त्यांच्या प्रश्नांकरिता अत्यंत प्रामाणिकपणे आणि शेवटच्या श्वासापर्यंत संघर्षही केला. त्यांच्या संदर्भात दुसरी जी गोष्ट या ठिकाणी सांगितली गेली ती अत्यंत महत्वाची आहे. दादा हे दिवसभर या सभागृहात उपस्थित राहत असत असे माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी या ठिकाणी सांगितले आहे. सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून संपेपर्यत ते कधीही सभागृहाच्या बाहेत जात नसत असा नियम त्यांनी आपल्या जीवनात पाळला होता आणि आपण ही बाब सर्वांनी जवळून पाहिलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ....

विधान सभा, विधान परिषद आणि लोकसभा या तीनही ठिकाणी ते अत्यंत समर्थपणाने वावरत होते.लोकसभेचे अधिवेशन चालू असतांना मुबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न असो वा अन्य कोणताही प्रश्न असो तो त्यांनी मांडला नाही असे एकही अधिवेशन गेले नाही. या संदर्भात त्या त्या वेळची बातमी आपल्याला वृत्तपत्रात वाचावयास मिळाली नाही असे कधीही घडले नाही. मुबईतील चाळींचा प्रश्न असो, मुंबईतील कामगारांचा प्रश्न असो, घरांचा प्रश्न असो असे विविध प्रश्न नियमांचे पुस्तक बरोबर घेंऊन आणि नियमावर बोट ठेवून सभागृहात ते शांतपणें मांडत होते. त्यांना कोणी कितीही विचलीत करण्याचा प्रयत्न केला असला तरी शातपणें आपल्या मुद्यापासून बाजूला न जाता तो मुद्दा अत्यंत आग्रहीपणाने मांडण्याचे सामर्थ वा आत्मविश्वास दादांमध्ये होते. आज ते आपल्यामध्ये नाहीत. गेल्या पास सहा वर्षात त्यांनी या सभागृहात जे काम केले होते ते आमच्या सारख्या अनेक सन्माननीय सदस्यांना मार्गदर्शक आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---- --

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांबद्दल या ठिकाणी भरभरुन बोलले गेले आहे.त्यांच्याबद्दल आपण जितके बोलू तितके कमीच आहे.मराठी वाङमयाचे नभांगण अलीकडच्या काळात वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या त्रिमुर्तीने फुलवले होते परंतु विंदाच्या कवितेची जातकुळी मात्र वेगळीच होती. ते तत्ववेत्ते कवी होते आणि त्यांच्या कवितेमध्ये मानवतेचा कैवार होता, शोषणाविरुध्दचा एल्गार होता, क्रांतीचा पुकार होता आणि समाजवादाचा कडवा पुरस्कारही होता.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी आताच सांगितल्याप्रमाणे महात्मा गांधींवर श्रध्दा असलेले विंदा हे पक्के मार्क्सवादी होते त्याचबरोबर या मातीशी त्यांचे नातेसुध्दा अत्यंत अतूट असे होते. मराठी भाषेवर आणि मराठी संस्कृतीवर प्रेम करीत असतांना त्यांनी हे प्रेम कधीही संकीर्ण होऊ दिले नाही, संकुचितही होऊ दिले नाही. उलट आपल्या भाषेची आणि संस्कृतीची कवाडे कशी खुली राहतील याचा प्रयत्न त्यांच्या प्रत्येक शब्दा शब्दातून आपल्याला जाणवत राहतो. विंदाना ज्यावेळी ज्ञानपीठ पुरस्काराचे दोन लाख रुपये मिळाले होते त्यावेळी त्यांनी ते आंतरभारती अनुवादासाठी देणगी म्हणून दिले होते. अशा प्रकारची त्यांची निष्ठा होती.

सभापती महोदय, हे सभागृह सार्वभौम आहे असे आपण नेहमी म्हणत असतो परंतु या सभागृहातील आपण सारे जण सार्वभौम जनतेचे प्रतिनिधी आहोत. ही जनता अखेर सार्वभौम आहे. त्या जनतेचा आक्रोश , त्या जनतेच्या मागण्या, त्या जनतेच्या वेदना आपण जाग्या ठेवल्या पाहिजेत यासबंधीचा इशारा विंदांनी आपल्या कवितेतून दिला आहे.त्या कवितेतील काही ओळी मी आपल्याला वाचून दाखवतो.

" **<u>ती जनता अमर आहे</u>**

जनतेच्या पोटामध्ये
आग आहे आग आहे;
जनतेच्या डोळयांमध्ये
शंकराचा राग आहे.
जनतेच्या ऐक्यामध्ये
लाव्हाची लाट आहे;

श्री.कपिल पाटील .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जनतेच्या पायांपुढे

प्रकाशाची लाट आहे.

कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत :-

" जनतेच्या नसांमध्ये
लाल लाल रक्त आहे;
जनतेच्या सत्तेखाली
पृथ्वीचे तख्त आहे.
जनतेच्या मुक्तीसाठी
अजून एक समर आहे;
आणि जिचा आत्मा एक
ती जनता अमर आहे.

त्यांची सगळी कविता आणि त्यांचे सगळे वाङ्मय जनतेच्या शोषण मुक्तीसाठी होते परंतु यासाठी प्रयत्न करीत असातांना ते कधीही प्रचारकी झाले नाहीत. कवितेतील वाट त्यांनी कधीही सोडली नाही. वाङमयातील नियम त्यांनी कधी नाकारले नाहीत आणि कधीही प्रचारकी होऊ न देता त्यांनी आपला विचार इतरांसमोर पोहोचवला. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे एका बाजूला विंदा हे अत्यंत आधुनिक असलेले कवी होते परंतु त्यांनी तुकोबाकडून माळ घेतली होती. भीमेकडून काय घ्यावयाचे तर तुकोबाची माळ घ्यावी असे त्यांनी आवाहन केले होते. "देणाराने देत जावे आणि घेणा-याने घेत जावे "या कवितेमध्ये त्या ओळी आहेत. अशा प्रकारे विंदा हे एक मोठे कवी होते. हे महाकवी आज आपल्यातून निघून गेलेले आहेत त्यांना मी विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय कै. मधुकर सरपोतदार यांचे दु:खद निधन झालेले आहे. आदरणीय दादा हे सभागृहात असतांना मी देखील या सभागृहात आलो होतो. सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत ते या सभागृहात उपस्थित रहात होते. प्रत्येक चर्चेमध्ये ते नियमानुसार भाग घेत होते. सभागृहातील नियमांच्या बाबतीत ते कठोर आग्रही होते. त्यांचे विचार कदाचित वेगळे असू शकतील सभागृहात मी एखाद्या विषयावर बोललो तर ते मला लॉबीत गेल्यावर प्रेमाने असे म्हणत की , "तू वेगळे बोलत आहेस परंतु माझा विचार दुसरा आहे त्याचा तू देखील विचार कर " .

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारे स्वत:च्या विचाराबद्दल आग्रही असणारा परंतु तो न लादता रेटत राहणे. आणि सर्वाशी संवाद राखणे असे एक अजब रसायन दादांकडे होते. कै. मधुकर सरपोतदार यांचे दु:खद निधन झाले आहे. मी त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ' माझ्या मना बन दगड' असे कितीही म्हटले तरी अशा प्रसंगी वैयक्तिक,सार्वजनिक,सामाजिक,कौटुंबिक,अशा प्रकारच्या सगळया भावना एकत्रित आलेल्या असतात तशा प्रकारचा हा प्रसंग आहे. विंदा करंदीकर यांना श्रध्दांजली व्यक्त करीत असतांना त्यांच्याशी माझा जो काही कौटुंबिक असा परिचय होता. त्यामध्ये 1976 साली मी त्यांच्या घरामध्ये सून म्हणून प्रवेश केल्यानंतर एक तर पहिला प्रश्न ते नेहमीच मला करायचे, कारण त्यावेळी माझे मेडिकलचे शिक्षण एक वर्ष बाकी होते. त्यामुळे त्यांना नेहमीच काळजी वाटायची. कारण मी चळवळीमधील एक कार्यकर्ती होते आणि चळवळीतील बरीचशी माणसे ही चळवळीमुळे आपले शिक्षण अर्धवट सोडत असतात. त्यामुळेच ते मी भेटले की, एकच प्रश्न नेहमी मला विचारीत असत की, तू अभ्यास चालू ठेवला आहेस की नाही, अभ्यास पूर्ण केला आहेस की नाही ? त्यांच्या अशा देखरेखालीच माझे आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण झाले, मला त्यातील पदवी प्राप्त झाली. त्यानंतर मी दहा वर्षे प्रॅक्टीस केली. लिखाण सुरु केले. सामाजिक राजकीय चळवळीमध्ये काम केले. त्यांच्या स्वभावाचे वैशिष्टय सांगावयाचे तर मी आपल्याला सांगेन की, त्यांचा स्वभाव हा अत्यंत मनस्वी असा होता. त्याचबरोबर ते अत्यंत प्रेमळ स्वभावाचेही होते. शिवाय ते स्वत:चे व्यक्तीस्वातंत्र्य जसे जपत होते तसेच, ते घरातील सुना, मुले यांनाही स्वत:ची मते असू शकतात, हे मान्य करणारे होते आणि त्या पध्दतीने प्रत्येकाने आपले जीवन जगावे ही समज त्यांच्यात मुळापासून होती आणि त्या पध्दतीने त्यांचे आर्शीवाद कायम आमच्या सोबत होते. लहान मुलांमध्ये मूल होणारे, त्याच बरोबर समीक्षा आणि जीवनाच्या अनेक कला, त्यामध्ये मग तबला वाजविणे असेल, संगीत आहे, समीक्षा, या सगळयांमध्ये त्यांचा अतिशय गाढा अभ्यास होता. माझ्या सासूबाई श्रीमती सुमाताई करंदीकर यांचे गेल्या वर्षीच निधन झाले आणि दोघांचीही सह जीवनाची साथ दीर्घकाळ होती ती खंडित झाली. त्यामुळे त्यानंतर भाऊ थोडे अबोल झाले होते. ते फारसे बोलत नसत. त्यांना कोणी काही विचारले तर जास्त काही बोलायचे नाहीत. मनामध्ये अशी काळजी वाटत होती की, सुमाताईंच्या शिवाय आता पुढील काळात ते स्वत:च्या स्वत: प्रवास कसे काय करतील, करतील ? तसे पाहिले तर त्या दोघांचेही पराकोटीचे अगदी साधे राहणीमान होते. विंदानी जी अनेक पुस्तके लिहिली त्यातील ठराविक पुस्तकांची नावे पुन्हा पुन्हा नेहमीच आपल्यासमोर येत असतात. स्वाभाविक आहे, कारण ती सारीच पुस्तके लोकप्रिय आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

परंतु त्यांना ज्या पुस्तकासाठी " ज्ञानपीठ पुरस्कार " मिळाला ते पुस्तक म्हणजे " अष्ट दर्शन " हा त्यांचा काव्यसंग्रह आहे. त्याचबरोबर " परंपरा आणि नवता " हे त्यांचे आणखी एक पुस्तक, तसेच " स्पर्शाची पालवी ", " अमृतानुभव " ही अशी काही पुस्तके आहेत की, ज्याचा आता सन्मानीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी उल्लेख केला की, त्यात विज्ञान, अध्यात्म, संस्कृति, आधुनिक विचार याचा अतिशय चांगल्या प8ध्दतीने सर्जनशील अविष्कार विंदांच्या साहित्यातून झालेला होता. सभापती महोदय, एक साधारण अशी समजूत असते की, काव्य म्हटले की, फुले, चंद्र, प्रेम या पुरतेच काव्य असतं, परंतु अगदी श्रमिक, वेगवेगळया पध्दतीचे मजूर, स्त्री - पुरुषांच्या जीवनात येणारे संघर्ष, स्त्रीला पडणारे कष्ट मग ती स्त्री कुटुंबातील असे वा समाजातील कोणत्याही थरातील असेल, याचीही अतिशय चांगल्या प्रकारची जाणीव त्यांना होती आणि ती त्यांच्या साहित्यातून दिसून येत होती. त्यांनी विद्याभ्यासाचा संस्कार केला. आज मराठी साहित्य संमेलनामध्ये त्यांचे कविता वाचन होऊ शकत नाही. याबद्दल मलाही वाईट वाटते आहे. परंतु थोडीशी खंत वाटते, मला यात कोठलेही राजकारण आणायचे नाही पण असेही वाटे की, साहित्य संमेलन माणिकचंद कुटखा कंपनीकडून प्रायोजित करुन विंदांचे काव्यसंमेलन झाले असते तर ते विंदानाही खरोखरी अजिबात आवडले नसते. म्हणून अनेक साहित्य संमेलनापासून काही कारणांनी का होईना पण ते अध्यक्ष पदासाठी निवडणुकीला उभे राहिले नाहीत, तसेच कोठल्याही राजकारणात त्यांनी भाग घेतला नाही. पण एका अर्थाने मला तरी असे वाटते की, साहित्य संमेलनाला त्यांनी एका वेगळया प्रकारचा चकवाच दिला आणि साहित्य संमेलनाच्या अगोदर त्यांचे प्रस्थान झाले. या सगळया त्यांच्य वाटचालीमध्ये त्यांना जे पुरस्कार मिळाले ते अनेक सामाजिक संघटनांना, कार्यांना दिले. विशेषत: विकास आमटे, त्याच बरोबर त्यांचे पिता बाबा आमटे, साधनाताई आमटे यांच्याशी देखील त्यांचा चांगल्या प्रकारचा स्नेह होता. तसेच " जाणीव " सारख्या विजाया लवाटे यांच्या संसथेला, कामाला त्यांनी त्यांचे पुरस्कार भेट दिले की, ज्या ठिकाणी एचआयव्ही पॉझिटिव्ह मुलांसाठी म्हणून काम चालते. मला आणखी एक उल्लेख येथे करावासा वाटतो की, अंध मुलांना शिकविण्याचे काम भाऊ आणि सुमाताई करायचे. त्यातील अनेक अंध मुले त्या दिवशी त्यांच्या अंत्य दर्शनाला आली होती. त्या संदर्भात मला असे वाटते

....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

की, माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या वेळेस जाहीर केले की, शासकीय इतमामामध्ये आम्ही विंदांचा अंत्यसंस्कार करणार आहोत. त्यावेळेस खरे तर प्रशासनाला देखील प्रश्न पडला की, देहदान करणा-या माणसावल शासकीय इतमामामध्ये अंत्यसंस्कार कसे करायचे त्यामुळे काही काळ समजावण्यात आणि समजून घेण्यात गेला. जो देह त्यांनी दान केलेला आहे, त्यांनी नेत्रदान केले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नेत्रदान झाले त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले की, त्यांचे नेत्र चांगल्या अवस्थेत होते आणि त्यामुळे एका माणसाला निश्चितपणे नवी दृष्टी मिळणार आहे. तसेच त्यांनी देहदान केले त्यातून देखील शासकीय इतमामामध्ये अंत्यसंस्कार होत असतांना संवेदनशीलतेने सरकारने ही गोष्ट हाताळली त्याबद्दल मला खरोखर सरकारचे आभार मानावेसे वाटतात. भाऊ तर त्याच्या खूप पलिकडे पोहोचलेले होते. पण त्याच बरोबर पश्चिम बंगारमध्ये ज्योतिबसूं सारख नेता की ज्याने देहदान केले आणि शासकीय इतमामामध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.....

(यानंतर श्री.सरफरे...एम 1.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....
अशाप्रकारे बऱ्याचशा गोष्टी त्यामधून बोलक्या होतात. आपल्या आयुष्यामध्ये भाऊंनी कधीही कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा ठेवली नाही. परंतु पद्मभूषण, पद्मविभूषण अशा पुरस्कारांसाठी शासनाने त्यांचा विचार करावयास हवा होता. हे मी त्यांची सून म्हणून नव्हेतर महाराष्ट्राची एक कन्या म्हणून याठिकाणी सांगू इच्छिते. या साहित्यिकांच्या बाबतीत आपल्या मनामध्ये किती संवेदनशीलता आहे, हे आपण आपला चश्मा बाजूला काढून जरुर बघावे. त्यांच्या कवितेतील परी जी खऱ्या अर्थाने एक अंध विद्यार्थीनी आहे, ती आता मोठी झालेली आहे. तिला नेत्रसुख नसतांना सुध्दा भाऊंच्या अंत्यसंस्काराच्या दिवशी त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आली होती. अशाप्रकारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. "देणा-याने देत जावे" ही त्यांची कविता खूप सुंदर आहे. दुसऱ्याकडील सर्व काही आपण ओरबाडून घेऊ नये अशाप्रकारचे संस्कार या विधीमंडळामध्ये झाले तरी खूप मोठी गोष्ट होईल असे मला वाटते. मी यानिमित्ताने कै. विंदा करंदीकरांना याठिकाणी श्रध्दांजली अपर्ण करते.

कै. दादा सरपोतदार हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व होते. त्यांचे जसे समोर लक्ष असायचे, तसे मागेसुध्दा लक्ष असायचे. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व मी आपसामध्ये कुजबुजत राहिलो तरी ते मागे वळून बघून आमच्यावर रागवायचे. त्यांनी मागे वळून बघण्यापूर्वीच आम्ही गप्प रहात होतो.
कामगार चळवळीप्रमाणे महिलांच्या प्रश्नाबाबत, त्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाबाबत त्यांची नेहमी तेजस्वी अशाप्रकारची भूमिका असायची. ज्यावेळी पश्चिम महाराष्ट्र महिला विभागाच्या संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली त्यावेळी या संदर्भातील घ्यावयाच्या मुलाखती कोणत्या ने त्याबरोबर घ्यावयाच्या आहेत? असे माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी मला विचारले. त्यावेळी कै. दादा सरपोतदार हे व्यक्तिमत्व माझ्यासमोर होते. अशा व्यक्तिमत्वासोबत स्त्रियांना निर्भयपणे काम करणे शक्य होत असे हे मला याठिकाणी मुद्दाम नमूद करावेसे वाटते. या निमित्त कै. विंदा करंदीकर व कै. दादा सरपोतदार यांच्यापुढे मी नतमस्तक होते.

धन्यवाद, जय महाराष्ट्र.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी कै. विंदा करंदीकर व कै. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांच्या बाबतीत एक गोष्ट सांगितली पाहिजे की, "मुक्त झालो मी माझ्यातून" हे काव्य त्यांनी लिहिले होते. ज्यावेळी ते स्वत:मधून मुक्त झाले त्यावेळी देहदान करण्यासाठी त्यांची गाडी जे.जे. हॉस्पिटलकडे चालली होती, यानिमित्ताने त्यांनी एक वेगळा आदर्श याठिकाणी घालून दिला. याठिकाणी असे सांगण्यात आले की, साहित्यामधून मिळणारे मानधन ते कधीही स्वत:साठी वापरीत नव्हते, ते मानधन इतरांसाठी देत होते. "स्वत:साठी जगला तो मेला, दुसऱ्यांसाठी जो जगला तो खऱ्या अर्थाने जगला" हे विंदानी कृतीमधून दाखवून दिले. आणि म्हणून मराठी साहित्य विश्वाला तिसरे ज्ञानपीठ मिळवून देणारा असा महान कवी वयाच्या 91 व्या वर्षी आपल्यातून निघून गेला.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आमचे सन्माननीय नेते कै. मधुकरराव सरपोतदार शिवसेनेच्या स्थापनेपासून माननीय शिवसेनाप्रमुखांच्या खांद्याला खांदा लावून शिवसेना मोठी करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. शेवटपर्यंत भगवा झेंडयाचा शिपाई व शिवसेनेचा मावळा म्हणून त्यांनी काम केले हे सांगण्यासाठी मी उभा आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 1975 ते 1985 पर्यंत दहा वर्षे ते महाराष्ट्र श्रमिक सेनेचे अध्यक्ष होते. त्यांच्याजवळील काही कंपन्यांमधील कामगार संघटना मी संभाळीत होतो. त्यामध्ये कांदिवली येथील बॉम्बे ड्रग्ज कंपनी असू दे, मालाडची पटेल ॲल्युमिनियम कंपनी असू दे, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी असू दे, ओटीस कंपनी असू दे अशा अनेक कंपन्यांमधील कामगार संघटना संभाळण्याची जबाबदारी त्यांनी माझ्याकडे सोपविली होती. तितक्याच समर्थपणे या कंपन्यामधील कामगार संघटना मी संभाळीत होतो. त्यांच्यामुळेच कामगार क्षेत्रातील थोडाबहुत अनुभव मला मिळाला आहे, याच्या पाठिमागे त्यांचेच आशीर्वाद आहेत असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, यानिमित्ताने मला आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते की, शिवसेनेचे फार मोठे नेते म्हणून आम्ही त्यांच्याकडे पहात होतो. 1985 मध्ये शाखाप्रमुखांच्या नियुक्त्या व्हावयाच्या होत्या, माननीय शिवसेनाप्रमुखांनी शिवसेना नेत्यांवर शाखाप्रमुखांची नियुक्ती करण्याची जबाबदारी सोपविली होती. त्यावेळी कै.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

दादा सरपोतदार यांनी शिवसेनेचा शाखाप्रमुख म्हणून माझी नियुक्ती केली. अशाप्रकारे शिवसेनेचा ज्येष्ठ महान नेता, कामगार क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेला कामगार

दि.18.3.2010/विप(असुधारित प्रत प्रसिध्दीसाठी नाही) M 3

श्री.सरफरे)

श्री. रामदास कदम...

नेता, कामगारांना सतत न्याय देत राहणारा कामगार नेता, शिवसेनाप्रमुखांच्या पाठिशी सतत ठामपणे, खंबीरपणे उभा राहणारा आमचा हा कामगार नेता आमच्यातून निघून गेला. या निमित्ताने मी कै. विंदा करंदीकर व कै. दादा सरपोतदार या दोघांनाही माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या वतीने, शिवसेना पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार यांच्या बाबतीत सांगावयाचे तर एक समर्पित जीवन जगलेला, रस्त्यावरच्या राजकारणापासून संसदेतील पटलापर्यंत आपला ठसा उमटविणारा एक मोठी दृष्टी असलेल्या नेत्याचे निधन झालेले आहे, त्या बद्दल मी शोक प्रकट करतो.

ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर यांच्या बाबतीत सांगावयाचे तर मराठी भाषेला आतापर्यंत तीन ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आहेत. पहिला पुरस्कार कै.वि.स.खांडेकर यांना मिळाला, दुसरा पुरस्कार कै.वि.वा.शिरवाडकर यांना मिळाला असून तिसरा पुरस्कार कै.विंदा करंदीकर यांना मिळाला आहे. तिघांच्याही नावामध्ये "व्ही" आहे. वि.स.खांडेकर यांना पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यानंतर वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा "विशाखा" हा पहिला कविता संग्रह हा वि.स.खांडेकर यांनी प्रकाशित केला होता आणि वि.वा.शिरवाडकर यांनी स्थापन केलेल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा "जनस्थान" पुरस्कार वि.वा.शिरवाडकर यांनी विंदा करंदीकर यांना दिला होता असे एक सत्र आपण गेली काही दशके आपल्या राज्यामध्ये, आपल्या मराठी भाषेमध्ये अनुभवलेले आहे. तसेच तीन विभिन्न प्रकारे कविता करणारे विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगांवकर एकत्रितपणे कविता सादर करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोचले. या तिघांचे स्वभाव कसे वेगळे होते हे सर्वांना सर्वश्रृत आहे. मघाशी 51 रुपयांच्या मानधनाच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. जर कोणी त्यापेक्षा कमी मानधन दिले तर विंदा करंदीकर त्याठिकाणी कधीच जाण्यास तयार नसत. हा कोकणी माणूस त्याबाबतीत घासाधीस करावयास कधीही मागेपुढे पहात नसे. पण त्यांना मिळालेले कोणतेही मानधन,पुरस्कार किंवा पुरस्काराची रक्कम त्यांनी आयुष्यभरामध्ये एकदा सुध्दा स्वत:च्या खिशामध्ये कधीही ठेवली नाही. सामाजिक विषम व्यवस्थेच्या विरोधात, अन्यायाच्या विरोधात साम्यवादी विचाराने ओतप्रोत नहालेले असे विंदा करंदीकर यांचे व्यक्तिमत्व होते. सर्वसाधारणपणे कवी म्हटल्यानंतर कुठल्यातरी स्वप्नांच्या जगामध्ये, वास्तवाच्या पलिकडे कल्पनेच्या अविष्काराने तो वेगळाच कोणीतरी असावा असे आपल्याला वाटते. पण विंदा करंदीकर यांचे पाय जमिनीवर घट्ट रोवलेले होते. येथील मातीचे आणि माणसांचे जे दु:ख आहे, त्या मध्ये ते सहभागी होऊन जगत असत. मान-सन्मान, पुरस्कार

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

मिळविणे हे या कोकणातील माणसाला कधी जमलेच नाही. अंतर्बाह्य पारदर्शक व्यक्तिमत्व, संवादासाठी सदैव आसुलेले, कोणाचीही भीड सहज मोडण्याचे कौशल्य त्यांच्यापाशी होते. साहित्याच्या निर्मितीनंतर त्याला जे स्थान प्राप्त होते, त्याला पुरस्कार मिळातात, जो सत्कार केला जातो त्यानंतर त्याची अधिकाधिक निर्मिती करण्याकडे प्रवृत्ती होऊ लागते. परंतु विंदा करंदीकर यांच्यासारखे थोडेच जण असतात की जे आपल्या साहित्य निर्मितीबद्दल स्वत: सुध्दा केव्हातरी शंका उपस्थित करु शकतात आणि मग ठरवितात की, आपण आता काही काळ लिहावयाचे थांबविले तरी हरकत नाही आणि हा "थांबा" असतो, तो विचारांसाठी महत्त्वाचा असतो.ते साम्यवादी विचारसरणीची कास धरलेले, त्याचबरोबर शेक्सपिअरच्या "किंग लिअर"च्या प्रेमात पडलेले आणि तुकोबाच्या माळेवरही प्रेम करणारे होते. कुसुमाग्रज यांना एकदा अचानक प्रश्न विचारला होता की, ईश्वर आहे की नाही याबद्दल तुमचे काय मत आहे ? हा अवघड प्रश्न होता. त्यावेळी कुसुमाग्रज यांनी ज्ञानेश्वरीचे दाखले दिले आणि संत ज्ञानेश्वरांनी ईश्वराचे रुप कसे मांडलेले आहे ते सांगितले. त्यामुळे मग त्यांना सहाजिकच पुढचा प्रश्न विचारला की, तुम्ही ईश्वर आहे याबद्दल ठाम आहात काय ? त्यावर कुसुमाग्रज यांनी उत्तर दिले की, शेवटी ज्ञानेश्वर सुध्दा कवीच होता. इतकी कवीची महती मोठी असते. लहान मुलांपासून अतिशय तत्वज्ञानी विचारांपर्यंत पोहोचलेल्या कविता, किंग लिअर या ग्रथांचे भाषांतर आणि त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार ज्या कृतीमुळे मिळालेला आहे ती म्हणजे "अष्टदर्शने" हा कविता संग्रह होय. असा हा फकीरी वृतीने मस्त जगलेला अवलिया पुरुष होता. या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण विंदा करंदीकर यांना मुकलो आहोत. खरे म्हणजे सदनामध्ये होणारे शोक प्रस्ताव, त्यातील औपचारिकता, त्याबाबत भावना व्यक्त करणे या पलिकडेही या मातीची, या महाराष्ट्रातील माणसांची जी दु:ख आहेत, वेदना आहेत अशा या साहित्याच्या पलिकडील गोष्टी देखील त्यांच्या व्यक्तिमत्वातून कायम प्रदर्शित झाल्या होत्या.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. हेमंत टकले...

किमान या सुवर्णमहोत्सवी वर्षात वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर आणि विंदा करंदीकर या ज्ञानपीठ त्रयींचे समग्र साहित्य एकत्रितरीत्या ग्रंथरुपात महाराष्ट्र शासनाला निर्माण करता येऊ शकेल. एखाद्या रस्त्याला, उद्यानाला, वास्तूला विंदा करंदीकरांचे नाव देता येऊ शकेल तसेच आपण माय मराठी आणि त्यांच्या सामाजिक समतेच्या अविष्काराचे चिरंतन स्मरण होण्यासाठी एखाद्या लोकजागर अभियानाला त्यांचे नाव देऊन ती योजना महाराष्ट्र शासन हाती घेऊ शकेल. याबद्दल शासनाने विचार करावा अशी माझी सभागृहामार्फत शासनाला विनंती आहे. "घेणाऱ्याने घेत जावे ... एके दिवशी घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावे" पण काय घ्यावे हे सांगताना गाडी घ्यावी, मोटार घ्यावी, बंगला घ्यावा असे नाही तर सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार म्हणाले त्याप्रमाणे मागताना सुध्दा भीमेकडून तुकोबाची माळ मागावी. ऐहिक गोष्टीपेक्षा चिरंतन राहणाऱ्या, काही मूल्य सागणाऱ्या, तत्व देणाऱ्या गोष्टी मागाव्यात म्हणजे देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही एक वेगळा आनंद मिळतो. अशा या महाकवीच्या निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने शोक प्रकट करुन माझे दोन शब्द थांबवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांनी आज ज्या दोन दिग्गजांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव सादर केलेला आहे हे दोन्ही दिग्गज माझ्या शेजारी राहात होते. विंदा करंदीकर ज्या ठिकाणी राहात होते त्या साहित्य सहवासला लागून माझी शाळा होती. शाळेतील कविता वाचल्यानंतर त्या कवींना बघण्याची जी ओढ त्या वयात होती त्यावेळेला श्री. य.दि.फडके यांचे चिरंजीव अनिरुध्द हे मला दाखवत होते की, हे विंदा करंदीकर, हे मंगेश पाडगावकर, हे य. दि. फडके, हे ना. सि. फडके. असे वेगवेगळे थोर व्यक्तिमत्व ज्या साहित्य सहवासमध्ये राहात होते तेथेच बाजूला मी शिकत असल्यामुळे लहानपणापासून या सर्वांचा माझ्यावर जबरदस्त प्रभाव होता. आज ते विंदा आपल्यात नाहीत. सभागृहाने त्यांच्याबद्दल ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सगळ्या भावनांशी मी देखील सहमत आहे.

सभापती महोदय, राजकारणात ज्यांचे बोट धरुन माझ्या आयुष्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली त्या दादासाहेब सरपोतदार यांच्या निधनाबद्दल या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. माझ या आयुष्यावर दादांचा जबरदस्त प्रभाव होता. शालेय जीवनापासून मी त्यांच्याबरोबर काम करीत होतो, त्यांच्याकडे जात होतो. त्यांच्या प्रत्येक हालचालीतून त्यांच्या प्रत्येक बोलण्यातून, प्रत्येक कृतीतून मी प्रत्येक वेळी नवीन काही तरी शिकत होतो. असा एक जबरदस्त नेता, शिवसेनाप्रमुखांना आपला सेनापती समजणारा आणि सेनापतींनी एकदा कोठलाही आदेश दिला की तो तंतोतंत पाळलाच गेला पाहिजे आणि त्यांचा शब्द खरा करण्यासाठी पडेल ती किंमत देऊन ते करण्याचा सातत्याने त्यांचा प्रयत्न असे. माझे कॉलेजचे शिक्षण चालू असताना एकदा त्यांनी मला विचारले की, तू नेमके काय करावयाचे ठरविले आहे ? मी त्यांना सांगितले की, मला आपल्याबरोबर काम करावयाचे आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझ्याबरोबर काम करावयाचे असेल तर ती काही सोपी गोष्ट नाही. प्रचंड कष्ट करावे लागतील आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे हाताला घड्याळ बांधून यावयाचे नाही. कारण माझ्याबरोबर काम करावयाचे असेल तर घरी कधी जायला मिळेल याची कधी वाट बघावयाची नाही. प्रचंड मेहनत करावी लागेल, शिक्षण पूर्ण करावे लागेल. कारण जो शिकतो त्याच्या विचाराची दिशा बदलते असे त्यांचे नेहमीचे वाक्य

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

असावयाचे. म्हणून माझे शिक्षण पूर्ण करावे यासाठी मी कशा पध्दतीने अभ्यास करतो, काय करतो याकडे त्यांचे जबरदस्त लक्ष असावयाचे. कामगार क्षेत्रात 20 वर्षे त्यांच्याबरोबर काम करीत असताना मी त्यांचे वेगवेगळे पैलू बघितले. ज्यावेळेला ते जॉन्सल टाईल्समध्ये कॉर्पोरेट जनरल मॅनेजर म्हणून काम करीत होते त्यावेळेला व्यवस्थापनाची बाजू कशा पध्दतीने मांडावयाची हे देखील मी बघितले. परंतु ज्या दिवशी बाळासाहेबांनी त्यांना आदेश दिला की, आता आपण कामगार क्षेत्रामध्ये कामगार नेते म्हणून काम करा, कामगारांच्या युनियनचे अध्यक्षपद स्वीकारा त्यावेळी सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या कंपनीमध्ये त्यांनी कॉर्पोरेट जनरल मॅनेजर म्हणून काम केले त्याच कंपनीची सगळ्यात पहिली युनियन, त्याच कंपनीचे सगळे कामगार सगळ्यात पहिल्यांदा कामगार नेता म्हणून त्यांच्याकडे आले. एक जबरदस्त विश्वास, जबरदस्त ध्येय, जबरदस्त ध्यास असे सगळे मिश्रण असलेल्या नेत्याबरोबर मला गेली कित्येक वर्षे काम करण्याची संधी मिळाली

यानंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

आज ख-या अर्थाने आम्ही पोरके झालो आहोत. कारण शेवटच्या दिवसापर्यंत ते मला सांगत होते की, अनिल, काम करीत असताना मरण आले पाहिजे. जर मरण यायचे असेल तर ते अशा पध्दतीने यावयास पाहिजे की, त्याचा त्रास आपल्याला होता कामा नये आणि दुस-याला देखील होता कामा नये. त्यांच्या शेवटच्या कार्यक्रमामध्ये मी तसेच या सभागृहाचे माजी सदस्य व विद्यमान विधानसभा सदस्य श्री.प्रकाश शेंडगे हे देखील उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी श्री.शेंडगे यांची तुम्ही विधानसभेची निवडणूक कशाप्रकारे जिंकली याबाबत आस्थेने चौकशी केली होती. त्यांचा जिव्हाळा मी पाहिला होता. अतिशय निर्भीड, शिवसेनाप्रमुखांना मानणारे ते नेते होते. हयातीमध्ये त्यांच्या जीवावर बेतणारे कित्येक प्रसंग आले होते. कामगार क्षेत्रामध्ये किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असताना ते कधीच डगमगले नाहीत. कामगार क्षेत्रामध्ये काम करीत असताना दिनांक 11.10.1988 रोजी 'इंडियन टूल्स' या कंपनीत त्यांच्यावर हल्ला झाला. त्याठिकाणी त्यांच्या विरोधातील कामगार होते. त्या कामगारांनी त्यांना चारही बाजूने घेराव घालून त्यांना असे म्हटले होते की, तुम्ही आम्हाला एका कागदावर लिहून द्यावे की, मी या कंपनीमध्ये पुन्हा कधी येणार नाही. अन्यथा, आम्ही तुम्हाला जीवानीशी मारुन टाकू. मी त्या घटनेचा साक्षीदार आहे. परंतु त्यावेळी दादांनी त्यांना असे म्हटले होते की, माझा मुडदा जरी येथून बाहेर गेला तरी मी तुमच्या कोणत्याही धमकीला भीक घालणार नाही, मी लिहून देणार नाही. त्यानंतर त्यांच्यावर त्या कंपनीत जबरदस्त हल्ला झाला. त्यामुळे ते 15 दिवस हॉस्पिटलमध्ये होते. मी देखील त्यांच्याबरोबर होतो. ते कधीही कोणालाही घाबरले नाहीत किंवा कोणाच्याही दबावाला बळी पडून त्यांनी कोणतीही कृती केली नाही.

सभापती महोदय, 1984 साली त्यांना एनएसए खाली अटक करण्यात आली होती. त्यावेळी श्री.रिबेरो हे मुंबई पोलीस आयुक्त होते. श्री.रिबेरो यांनी दादांना असे म्हटले होते की, तुमच्यामुळे या भागामध्ये दंगल पसरत असल्याने तुम्हाला अटक करीत आहोत. त्यांना अटक झाली त्यावेळी श्री.रिबेरो यांच्याकडे सगळयात पहिले शिष्टमंडळ मुस्लीम संघटनांचे गेले होते. त्यांनी त्यांना असे म्हटले होते की, साहेब, तुमचा दादांविषयी चुकीचा समज झालेला आहे. हे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

जर बाहेर असतील तर या विभागातील दंगल शांत होईल, दंगल शमू शकते. त्यामुळे तुम्ही त्यांना ताबडतोब सोडून द्यावे. दादा पोलिसांना कधीच घाबरले नाहीत. पोलिसांबरोबरचे त्यांचे संघर्ष मी कित्येक वेळा बघितले आहेत. ते मला नेहमी एकच गोष्ट सांगत असत की, अनिल, पोलिसांशी जर संघर्ष करावयाचा असेल तर स्वत:चे चारित्र्य अतिशय स्वच्छ ठेवले पाहिजे. पोलिसांनी आपल्याला कोणत्याही गोष्टीसाठी अडकविता कामा नये तरच आपण पोलिसांसमोर ताठ मानेने उभे राहून संघर्ष करु शकतो. अशी जबरदस्त हिंमत त्यांच्यात होती. 1992-93 मध्ये ज्यावेळी त्यांना पुन्हा अटक झाली त्यावेळचे किस्से सुध्दा सांगण्यासारखे आहेत. ते प्रत्येक गोष्ट नियमाच्या आधारे करीत असत. जेलमध्ये त्यांना नेल्यावर ते प्रथम जेलचे मॅन्यूअल मागवून घ्यायचे. कैद्यांना जेलमध्ये कसे ठेवले पाहिजे याचा ते अभ्यास करायचे. नाशिकच्या जेलमधून त्यांना ठाण्याच्या जेलमध्ये नेल्यावर पोटाचा विकार जडला आहे असे मला कळले होते. त्यामुळे मी त्यांच्यासाठी पाण्याच्या बाटल्या घेऊन गेलो होतो. मी त्यांना सांगितले की, दादा, तुम्हाला जेलचे पाणी चालणार नाही. म्हणून मी बिसलेरीच्या बाटल्या आणलेल्या आहेत. त्यावेळी ते माझ्यावर जबरदस्त चिडले. मला म्हणाले की, मी येथे कैदी म्हणून आलेलो आहे, मी कैदी म्हणूनच राहणार आहे. बाकीच्या कैद्यांना जशी वागणूक मिळते तशीच वागणूक मला देखील मिळाली पाहिजे. माझ्यात आणि बाकीच्या कैद्यात कोणत्याही प्रकारचा फरक होता कामा नये. अशाप्रकारे अतिशय वाईट परिस्थिती असताना देखील त्यांनी नियमाला बगल दिली नाही. सभागृहात एकदा आल्यानंतर ते सभागृह स्थगित होईपर्यंत बसत असत. मी ज्यावेळी आमदार झालो त्यावेळी त्यांना अतिशय आनंद झाला, आपला एक विद्यार्थी आपल्याबरोबर या सभागृहात आल्याचा त्यांना मनोमन आनंद झाला होता. सभागृहाच्या नियमांबाबत ते किती जागरुक होते याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. त्यांच्या शिस्तबध्द कार्यपध्दतीचा आमच्या जीवनावर, आयुष्यावर कायमचा प्रभाव आहे. अशा सर्व गोष्टी निरंतर जोपासून त्यांची ध्येय धोरणे पूर्ण करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी येथेच थांबतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी दोन विभुतींच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांच्या बाबतीत मी काही बोलावे इतका मी मोठा नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मराठी साहित्याचा महामेरु, मराठी वाङमयाचे मोठे शिखर, अतिशय कमी लोकांना ज्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले त्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविलेली मोठी विभूती म्हणजे विंदा करंदीकर. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याच्या शिरपेचातील एक मौल्यवार हिरा निखळून पडला असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. मी माझ्या आणि माझ्या कुटुंबियांतर्फे, तसेच माझ्या पक्षातर्फे आणि माझ्या संघटनेतर्फे त्यांना आदरांजली वाहतो.

कै. मधुकर सरपोतदार उर्फ दादा यांच्या संबंधात मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो तो असा की, कष्टक-यांच्या चळवळीमध्ये जनसामान्यांच्या परिस्थितीचे, वास्तवतेचे भान असलेले देशामध्ये जे काही फार कमी नेते आहेत त्यांच्यामध्ये आदरणीय मधुकर सरपोतदार उर्फ दादांचा सर्वात वरचा नंबर लागतो अशा माझ्या भावना आहेत. मला या ठिकाणी एका प्रसंगाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. खरे तर कामगार चळवळीमध्ये आम्ही नेहमीच एकमेकांच्या विरोधात उभे राहिलो. पण कामगार क्षेत्रामध्ये अनावधानाने एक गोष्ट पाळली जाते. वस्तुस्थिती स्वीकारली जात नाही, ती नाकारण्याचीच जास्तीत जास्त प्रवृत्ती असते. पण या माझ्या कामगारांच्या कैवा-याच्या बाबतीत असे कधी घडले नाही. ज्या जॉन्सन टाईल्सचा उल्लेख येथे झाला त्या कंपनीमध्ये त्यांनी पर्सनल मॅनेजर म्हणून आपली कारकीर्द सुरु केली आणि जॉन्सन टाईल्सच्या कामगारांचे नेतृत्व करुन कामगार क्षेत्रामध्ये कामगारांचे प्रतिनिधीत्व करायला सुरुवात केली. 1995-96च्या काळामध्ये जॉन्सन टाईल्सचे कामगार माझ्याकडे आले. त्यावेळी राज्यावर युतीचे सरकार होते आणि श्री. साबीर शेख हे त्यावेळी कामगार मंत्री होते. त्यांनी कामगारांच्या सांगण्यावरुन बैठक लावली. त्या बैठकीला दादा आणि मी उपस्थित होतो. त्या बैठकीचा सूर वेगळा होता. त्यातील राजकीय अभिनिवेश मी बाजूला ठेवतो. त्यावेळी त्या बैठकीमध्ये दादांनी कामगारांना एकच प्रश्न विचारला की, तुम्हाला माझे नेतृत्व हवे की नको ? त्यावेळी कामगारांनी सांगितले की, आम्ही भाई जगताप यांचे नवीन नेतृत्व आणलेले आहे. खरे म्हणजे त्यावेळी कामगार मंत्र्यांनी रदबदली करण्यासाठी बैठक बोलावलेली होती. दादांनी कामगार मंत्र्यांना स्पष्टपणे सांगितले की या प्रश्नामध्ये कसल्याही प्रकारची रदबदली नको, कामगार माझ्या बरोबर नाहीत, ते भाई जगताप यांच्या बरोबर आहेत त्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व भाई जगताप हेच करतील. असे वास्तवाचे भान असेलेली फार कमी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

माणसे या कष्टक-यांच्या चळवळीमध्ये अनावधानाने पहायला मिळतात.सभापती महोदय, जेव्हा या ठिकाणी हा शोक प्रस्ताव मांडला गेला त्यावेळी मी मुद्दाम आपल्याला चिठ्ठी पाठवून माझ्या भावना व्यक्त करण्याची परवानगी मागितली. कारण अशा विभूतीच्या बाबतीत मी राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून माझ्या भावना व्यक्त केल्या नाही तर मी माझ्या कर्तव्यामध्ये कसूर केल्यासारखे होईल. दादांना आदरांजली वाहताना मी इतकेच सांगेन की, दादांनी या कामगार चळवळीमध्ये काम करण्याचा जो आदर्श वारसा ठेवलेला आहे त्याचे जतन करण्याचे काम कामगार क्षेत्रातील आमच्या सारख्या कार्यकर्त्यांवर येणार आहे. तो वारसा जपण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु. मी माझ्या कष्टकरी समाजा तर्फे, कष्टकरी कामगार चळवळी तर्फे, माझ्या पक्षा तर्फे आणि माझ्या कुटुंबिया तर्फे या दोन्ही विभूतींना श्रध्दांजली अर्पण करतो.

नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सदनाचे नेते, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री यांनी सदनामध्ये जो दिग्गजांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला त्यावर मी माझ्या भावना याठिकाणी व्यक्त करीत आहे.

विंदा करंदीकर हे खऱ्या अर्थाने देशाला अभिमान वाटावा अशा पध्दतीचे मराठी व्यक्तिमत्व यादृष्टीने त्यांच्याकडे पाहणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. एक महान कवी, एक महान साहित्यिक आणि आयुष्यामध्ये अत्यंत परखडपणे डाव्या विचारसरणीच्या माध्यमातून गोरगरीब सामान्य समाज हा केंद्रबिंदू मानून त्यांनी साहित्याची सेवा केली आणि त्या अनुषंगाने समाजाला अनेक पध्दतीची दिशा दिली. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि त्यामध्ये कारावासही भोगला. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्यावर गांधीजींचाही प्रभाव होता आणि त्याच पध्दतीने डाव्या विचारसरणीच्या अनुषंगाने त्यांनी एकंदरीत आपल्या जीवनाची सुरुवात केली होती. एक शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली आणि नंतरच्या काळामध्ये मुंबईमधील रुईया आणि ई.एस.आय.एस.या नामांकित महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचेही काम केले. विंदा करंदीकर यांनी बाल कविताही केल्या. त्या खूप गाजल्या. "राणीचा बाग", "एकदा काय झाले", "सशाचे कान", "बागुलबोवा", "परी ग परी", "सर्कसवाला" अशा पध्दतीने त्यांनी मुलांच्या अनुषंगाने केलेल्या कविता अतिशय लोकप्रिय ठरल्या. त्यांनी "शेक्सपियरचे राजा लिअर", "ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र", "गोथेचे फाऊस्ट-भाग 1" इत्यांदी ग्रंथांचे अनुवाद केले. सर्वसामान्य माणूस हा विंदांच्या साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू होता आणि आयुष्यामध्ये शेवटपर्यंत त्या केंद्रबिंदूच्या अनुषंगाने त्यांनी आपले विचार, आपला ध्येयवाद लोकांच्या समोर मांडला. त्यांचे कवितासंग्रह "स्वेदगंगा", "मृदगंध", "धृपद", "जातक", "विरुपिका", "अष्टदर्शने" इत्यादी कवितासंग्रह त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. अशा या महान कवीचा अनेक पुरस्काराने गौरवही झाला. "सीनिअर फुलब्राईट पुरस्कार", "सोविएत लँड नेहरु वाड:मय पुरस्कार", "महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार", "कवीराज कुसुमाग्रज पुरस्कार", "कबीर पुरस्कार", "जनस्थान पुरस्कार", भारतीय भाषेतील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांना सन्मानित केले गेले. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल या सभागृहाने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव दिनांक 17 मार्च, 2006 रोजी संमत केला. अशा या महान साहित्यिकाचे, महान कवीचे निधन 14 मार्च, 2010 रोजी झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

या सदनाचे सदस्य, एक अत्यंत परखड ध्येयवादी, संयमी आणि कामगार हा केंद्रबिंदू मानणारे, त्या अनुषंगाने सातत्याने या महाराष्ट्रामध्ये काम करणारे आम्हा सर्वांचे सहकारी मधुकर सरपोतदार यांच्याशी माझा गेली जवळजवळ 15 वर्षांचा परिचय होता. या सदनाचे सदस्य म्हणून ज्या ज्यावेळी या सदनामध्ये ते काम करीत होते तेव्हा त्यांची मर्यादा फक्त शिवसेना अशा पध्दतीची राजकीय मर्यादा होती असे मला कधी वाटले नाही. ज्या ज्या ठिकाणी अन्याय असेल, ज्या ज्या ठिकाणी एखाद्या बाबतीत सर्वसामान्य समाजाला न्याय द्यायची भूमिका असेल त्या त्या ठिकाणी सन्माननीय मधुकर सरपोतदार हे एखाद्या वाघासारखे धावून जाणाऱ्यांपैकी एक व्यक्तिमत्व होते. सदनामध्ये सकाळी आल्यानंतर संध्याकाळी सदनाची बैठक संपेपयंत सातत्याने सभागृहात बसून सदनाचे नियम, पध्दती याबरहुकूम काम करणे, सभापती सुध्दा एखाद्या वेळी एखादी गोष्ट चुकत आहेत असे त्यांना वाटे त्या त्यावेळी अत्यंत मर्यादित शब्दात ते या सदनामध्ये सांगत असत.....

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....
आणि त्यादृष्टीने या सदनात सर्वसाधारणपणे न्याय मिळावा यासाठीच त्यांचे प्रयत्न राहत होते ही वस्तुस्थिती आहे. अनेक वेळा अनेक ठिकाणी सर्वसामान्य समाजाचे प्रश्न, कामगार व कष्टकऱ्यांचे प्रश्न असतील अशा लोकांसाठी त्यांनी सातत्याने राज्यात काम केलेले आहे. शिवसेनेची जडणघडण होत असताना त्यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच त्यांच्या विचाराबरहुकूम सतत काम केले व ते वागले. म्हणून खऱ्या अर्थाने कष्टकरी सामान्य समाज हा त्यांचा केंद्रबिंदू होता अशा लढवय्या नेत्याचा दुर्दैवाने 3 मार्च, 2010 रोजी मृत्यू झाला पण शेवटपर्यंत अत्यंत तडफेचा कार्यकर्ता यादृष्टीने आपले आयुष्य ते जगले आणि असे आयुष्य जगत असताना त्यामध्ये कधीही व कोणत्याही प्रसंगी डगमगले नाही. त्यांचा सभागृहातील एक प्रसंग मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तो म्हणजे मी काही काळ या राज्याचा गृह राज्यमंत्री होतो. त्या काळात साधारणत: सन 1983 च्या दरम्यान कै. सरपोतदार यांना नॅशनल सिक्युरिटी ॲक्टखाली बंदी केले होते. त्यानंतरच्या काळात शासनाने त्यांना मुक्त केले. ज्या दिवशी त्यांना सभागृहाने निरोप दिला त्या दिवशी बोलत असताना त्यांनी सांगितले की, अशा पध्दतीने मी नाशिकला बंदीत होतो तरीही सरकारला मी कधी डगमगलो नाही. अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. कुठल्याही प्रसंगाला न डगमगता तोंड देणे असे कै. सरपोतदार यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. मी त्यांना शिवसैनिक न म्हणता एक विचारी, ध्येयवादी व तत्ववादी तसेच सामान्य माणसाला न्याय देणारा असेच त्यांचे वर्णन करीन. या दोन्हीही दिग्गज नेत्यांना मी अभिवादन करुन श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.38 ते 3.48 पर्यंत स्थगित झाली)

-------- (नंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./ मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) :अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 4- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 1- महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 3-मुंबई न्यायालय-फी (सुधारणा आणि त्या चालू राहणे) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 2 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे. आणि तसे करीत असतांना आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 व 203 (3)मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

उपसभापती : सन 2009-2010 या वर्षाच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणात वितरीत करण्यात येत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी विधेयकांना संमती अधिसंमती

उपसभापती : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधी यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

1) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2009

2) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 8 - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2009

3) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 9 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक ,2009

4) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 11 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2009

5) सन 2009 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 13 - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक ,2009

6) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 18 -मुबई मोटार वाहन कर) (सुधारणा) विधयेक, 2009

7) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 20 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राहयीकरण) विधेयक, 2009

8) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 22 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका व मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2009

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी. : सभापती तालिका नामनिर्देशित करणे

उपसभापती : मी महाराष्ट्र विधान परिषद नियम आठ च्या पोट नियम एक अन्वये खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1) श्री. जयप्रकाश छाजेड
2) श्री. रमेश शेंडगे
3) श्री. चंद्रकांत पाटील
4) ॲड. अनिल परब

सर्व तालिका सभापतींना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी सभागृहात अवश्य उपस्थित रहावे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी. औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या अनेक वर्षापासून विधिमंडळाच्या कामकाजाच्या निमित्ताने आम्ही सर्व सभासद या ठिकाणी येत असतो परंतु आज येथे येत असतांना आम्ही सर्वजण घाबरलेल्या आणि बावरलेल्या मनस्थितीतून या सभागृहात आलेलो आहोत. या सदनात कधी बॉम्ब हल्ला होणार आहे, कधी आतंकवादी घुसणार आहेत,कोण कोठून येणार, कोण कसा हल्ला करणार अशा प्रकारचे आमच्यावर एक नवीन दडपण निर्माण झालेले आहे. या ठिकाणी वेगळी सिक्युरिटी आज आम्ही पाहिलेली आहे. आम्ही पायी चालत आलो तसेच माननीय सभापतीसुध्दा पायी चालत आले आहेत.. परंतु एका एकी एवढी सुरक्षा वाढविण्यासाठी काय घडले आहे ते आम्हाला कळलेले नाही. महाराष्ट्रातील विधान भवनच जर या छायेखाली असेल तर महाराष्ट्रातील जनतेने काय करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. माझी सिक्युरिटी काढली म्हणून सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.रमेश बागवे हे व्यथित आहेत. त्याबाबतीत आपण नंतर बोलू . परंतु आज या सदनाच्या बाहेर खूप सिक्युरिटी ठेवण्यात आलेली आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांची सिक्युरिटी काढून ती या ठिकाणी आणली आहे. या ठिकाणी एवढी सिक्युरिटी ठेवण्यात आलेली आहे की, प्रत्येकजण संशयाने बघत बघत आतमध्ये येत आहे. तेव्हा एवढी सिक्युरिटी का ठेवण्यात आलेली आहे हे कळत नाही. सभापती महोदय, आमदारांवर अविश्वास निर्माण करणारे विधिमंडळातील हे कोणते कामकाज आहे ? आमदारांच्या प्रत्येक गाडीला लावण्यासाठी स्टीकर दिले जाते. आमदारांची गाडी तपासली जाते. त्याबाबतीत आजपर्यंत कोणीही तक्रार केलेली नाही. आमदाराच्या गाडीमध्ये कितीही माणसे बसलेली असली तरी त्यांना खाली उतरविले जाते परंतु त्याबाबतीत कोणीही तक्रार केलेली नाही.

नंतर श्री. सुंबरे

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते.....

महाराष्ट्रातील या विधिमंडळामध्ये येणारे आम्ही या राज्यातील जनतेचे प्रतिनिधी आहोत आणि असे असतानाही आम्ही अशा भीतीच्या छायेखाली येणार असू, या विधान भवनामधील वातावरण भीतीचे झाले असेल तर मग आपली सुरक्षा ठिकाणावर आहे काय हा प्रश्न निर्माण होतो. या विधिमंडळाला संपूर्णत: सुरक्षेच्या आवरणाखाली ठेवायचे किंवा काही धोका होईल असा प्रश्न पडला असेल तर आज येथे त्याबाबत खुलासा झाला पाहिजे. श्री. अबू आझमी हे आता विधान सभेचे सदस्य आहेत आणि त्यांचा दहशतवाद्यांशी जवळचा संबंध आहे अशी बातमी मध्यंतरी वृत्तपत्रातून आमच्या वाचनात आली आहे. तेव्हा असा एखादा सदस्य आपला आतंकवादी सहकारी घेऊन येथे आला वा येईल अशी भीती आपल्याला वाटते आहे का ? त्याचाही खुलासा झाला पाहिजे. नाही तरी गेल्या वेळेस आमदार निवासामध्ये आतंकवादी राहून गेले आणि त्या गोष्टीवर या सदनामध्ये चर्चाही झाली आहे. तेव्हा कोणी कोणाबद्दल काय काय बोलायचे ? या पध्दतीने आम्ही येथे आल्यानंतर पाहतो आहोत की, तुमचे सचिव खाली उतरतात. तुमची सारी व्यवस्था कशी आहे, गाडी आली तरी ती बाहेरच उभी करायचे आणि तेथून चालत यायचे. खरे तर तुम्ही लाखो रुपये खर्च या सुरक्षेसाठी केले आहेत, त्यादृष्टीने अनेक गोष्टी आणल्या आहेत, येथे उभारल्या आहेत. त्यात दोन-तीन मंडप देखील आपण घातले आहेत. त्यावर आपण खर्च केला आहे. आता तुम्हाला ऑडिटमध्ये याबद्दल काही कोणी विचारीत नाही म्हणून काहीही करायचे का ? तुम्ही येथे एवढी सुरक्षा लावली आहे की, गाडी येथून येणार नाही, जाणार नाही. गाडीतून किती माणसे आणायची यावर देखील मर्यादा. म्हणजे मग यामागे तुमची नेमकी भूमिका काय आहे ? अशा प्रकारे आपण येथे सुरक्षा व्यवस्था ठेवणार असाल तर हे शासन महाराष्ट्राला सुरक्षा कशी देणार आहे ? येथील आपल्या या सुरक्षे व्यवस्थेमुळे अध्यक्ष, सभापती, मंत्री, आमदार सारे चालत येत आहेत. चारही बाजूंनी भीतीदायक वातावरण या साऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे निर्माण झालेले आहे की, प्रत्येक जण एक दुसऱ्याकडे, आजूबाजूला भयचकित नजरेने पाहतो आहे. अशा प्रकारे आपण महाराष्ट्राच्या जनतेने निवडून दिलेल्या आमदारांवर गैरविश्वास दाखविणार असाल तर ते बरोबर नाही. आपण सुरक्षेबाबत काही सूचना दिल्या आहेत त्या आम्ही वाचल्या. ती जी काही बैठक आपली झाली त्यामध्ये मी हजर नव्हतो. पण मी देखील आपल्याला या अगोदर सांगितले होते की, तुम्ही विधिमंडळामध्ये येणारी संख्या मर्यादित करा. आमदारांसाठी कँटीन आपण काढले पण तेथेही

....व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते.....

आमदाराला बसायल मिळत नाही, इतरच मंडळी तेथे असतात. इतकेच काय, पण मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेबांना सांगू इच्छितो की, उद्या तुम्हाला कोणी शिष्टमंडळ भेटायला येथे आले तर ते या विधिमंडळामध्ये येऊ शकणार नाही तर त्यासाठी लांब उभारलेल्या मंडपामध्ये तुम्हाला जावे लाणार आहे तेथे तुम्ही या शिष्टमंडळाची भेट घेऊ शकणार आहात. सभापती महोदय, आता आपण हे सारे केले आहे ते योग्य आहे असे म्हणत असाल तर मग आमचे काही म्हणणे नाही, पण महाराष्ट्रातील जनतेला हे कळले पाहिजे की संसदेसारख्या या विधिमंडळावर कोणता हल्ला होणार आहे ? अफझल गुरु सारखा नाही तरी आज अत्यंत सुरक्षा व्यवस्थेत जगतोच आहे, तसे असेल तर मग कोणालाही हल्ला करु द्यात, झालाच हल्ला तर त्यात दोन चार पोलीस, 5-10 माणसे मरतील, त्यांची चिंता आपण का करता ? त्यांना शहीद म्हणून आपण हार घालणारच आहोत. तेव्हा ही बाब अत्यंत गंभीर आहे. तुम्ही आमदारांबद्दल गैरविश्वास दाखवित आहात तो बरोबर नाही. आपण जे काही केले आहे वा करता आहात ते योग्य आहे असे वाटत असेल तर त्याचे कारण काय हेही आपण येथे सांगितले पाहिजे. विधिमंडळावर हल्ला होण्याची भीती असेल तर तसे आम्हाला कळले पाहिजे. म्हणूनच मी औचित्याच्या मुद्याद्वारे या सुरक्षे व्यवस्थे संबंधीचा मुद्दा गांभीर्याने येथे मांडला आहे. त्याबाबत आता खुलासा कोण करणार ? सभापती म्हणून आपण करणार की, सरकार करणार आहे हेही मी समजू शकत नाही. पण कोणाकडूनही येथे खुलासा व्हावा एवढीच विनंती.

(यानंतर श्री. सरफरे----डब्ल्यू 1..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) W

DGS/ KTG/ KGS/ D/ MMP/

16:00

18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

VTG/ KGS/ KTG/ 14:05

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

पृ.शी. व मु.शी. सदस्यांचा परिचय

श्री.छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. रामदास गंगाराम कदम यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्थातर्फे निर्वाचित श्री. अमरिशभाई रसिकलाल पटेल यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. भाई जगताप यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय,सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित श्री. दीपक बापुसाहेब साळुंखे यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. सुभाष गणू भोईर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, पुणे स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे निर्वाचित ॲड. वंदना हेमंत चव्हाण यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 2

VTG/ KGS/ KTG/ 14:05

पृ.शी. मु.शी : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत आज गुरुवार, दिनांक 18 मार्च, 2010 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले अभिभाषण छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. भाई जगताप यांचा प्रस्ताव

श्री भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य , त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, श्री. भाई जगताप यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

सभापती : प्रस्ताव असा आहे की :-

" माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

शुक्रवार, दिनांक 19 व शनिवार,दिनांक 20 मार्च, 2010 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांस सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या सुधारणा गुरुवार, दिनांक 18 मार्च 2010 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत, कक्ष क्रमांक 017, विधान भवन, मुंबई येथे द्याव्यात.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. शोक प्रस्ताव

मु.शी.: ज्येष्ठ साहित्यिक, कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री.मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री): सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री.मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते "

सभापती महोदय, थोर साहित्यिक, जाणीवनिष्ठ कवी, भाषंतरकार, समीक्षक आणि प्राध्यापक अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाने अबालवृध्दांना परिचित असलेल्या गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांचा जन्म 23 ऑगस्ट, 1918 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धालवली येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते.

कै. विंदा करंदीकर यांनी सुरुवातीस काही काळ मनमाड, तासगांव येथे शिक्षक म्हणून नोकरी केली. पुढे रत्नागिरी, कागल, बेळगाव येथील महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर मुंबईतील रुईया महाविद्यालय व एस.आय.ई.एस. या नामांकित महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले. या काळात विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची प्रतिमा होती.

कै.करंदीकर यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रमामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही भोगावा लागला होता. प्रारंभीच्या काळात त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव पडला होता. त्यांच्या कवितेत सामाजिक भान, विज्ञाननिष्ठ आणि अध्यात्मिक कुतूहल यांचा संगम झालेला दिसून येतो. प्रयोगशीलता हे त्यांच्या कवितेचे एक वैशिष्टय आहे. करंदीकर यांनी अनेक बाल कविता रचल्या. मुलांच्या भाव विश्वाशी समरस होऊन त्यांनी केलेल्या कविता खूपच गाजल्या. कल्पनाशक्ती, अभिजात प्रसन्नता आणि विनोद यातून साकारलेल्या त्यांच्या बाल कविता हा मराठी साहित्यातील अनमोल ठेवा आहे. ' राणीचा बाग ', 'एकदा काय झाले', सशाचे कान ',बागुलबुवा',

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

'परी ग परी', 'सर्कसवाला', अशी किती तरी कविता बालवाचकांत लोकप्रिय ठरल्या. 'स्पर्शाची पालवी', आकाशाचा अर्थ', 'करंदीकरांचे समग्र लघुनिबंध', हे ललित लेखनही लोकप्रिय झाले. काव्य लेखनासोबत विंदांनी भाषांतराचेही मोठे काम केले होते. ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', शेक्सपियरचे 'राजा लिअर', गाथेचे फाऊस्ट -भाग 1' इत्यादी ग्रंथांचे अनुवाद त्यांनी केले. मराठी समिक्षेत ' परंपरा व नवता ', ' उद्‌गार ' या ग्रंथांना खास महत्व आहे.

सर्वसामान्य माणूस हाच विंदांच्या साहित्य निर्मितीचा अखेर पर्यंत केंद्रबिंदू राहिला. सामान्य माणूस, त्यांचा जीवन कलह, त्याची स्वप्ने व स्वप्नभंग आणि या सर्वांसह त्याची जगण्याची चिवट इच्छाशक्ती हे विंदांच्या कवितेचे मर्म होऊन राहिले. 'स्वेदगंगा', मृदगंध', धृपद', 'जातक', विरुपिका', अष्टदर्शने' इ. कविता संग्रह विंदांच्या प्रतिभेची साक्ष देतात. त्यांच्या विपुल साहित्य संपदेने मराठी भाषा समृध्द झाली आहे.

कै.विंदा करंदीकरांच्या साहित्याला माणुसकीचे अधिष्ठान होते. 'उठ उठ सह्याद्रे । घुमवीत, बोल मराठी खडे । समतेचे हे तुफान उठले । उठले सागराकडे ॥ हे विंदांचे समतेच्या तुफानाचे काव्य ऐकताना ज्या माणसाच्या अंगावर रोमांच उठले नाहीत असा माणूस विरळच. त्याचप्रमाणे ' मजुरांच्या हाडांचा येथे जळतो अंगार सदा । मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरतीही यंत्रे । मजुरांचे पिंजुनिया स्नायू सूत इथे हे निघते । मजुरांच्या रक्ताने ते सुंदर होते ॥ ' अशा काव्यामधून विंदांनी सामान्य माणसांच्या जीवनातील वास्तवता दाखवून दिली आहे. विंदांना त्यांच्या साहित्य संपदेसाठी ' सीनिअर फुलब्राईट पुरस्कार', सोव्हिएत लँड नेहरु वाङमय पुरस्कार ', 'जनस्थान पुरस्कार' अशा अनेक पुरस्काराने सन्मानित केले होते. एवढेच नव्हे तर त्यांना भारतीय भाषेतील सर्वोच्च सन्मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कारही मिळाला होता.

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे । घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे ॥' अशा ओळी लिहिणाऱ्या आभाळाला कवेत घेणारी प्रतिभाशक्ती लाभलेल्या व केवळ मराठी काव्यालाच नव्हे तर साहित्यकरणाला आणि समाज जीवनाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणाऱ्या या ज्येष्ठ साहित्यिकाचे रविवार दि. 14 मार्च, 2010 रोजी वयाच्या 92 व्या वर्षी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

कै. मधुकर रघुनाथ सरपोतदार यांचा जन्म 31 जानेवारी 1934 रोजी रत्नागिरी जिल्ह्यात आंजणारी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. सरपोतदार यांनी महाराष्ट्र श्रमिक सेना, महाराष्ट्र रिक्षाचालक सेना, एअर इंडिया इंजिनिअरिंग ॲन्ड फ्लाईट डिस्पॅचर असोसिएशन मुंबई, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कर्मचारी संघटना, कापूस महासंघ कर्मचारी संघटना, सहकारी सहनिवास संस्था महासंघ खेरनगर, मुंबई. विजय बजरंग व्यायामशाळा, मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)चे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. सरपोतदार हे भवानी सहकारी बँकेचे संचालक, महाराष्ट्र कुस्तीगीर संघटनेचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सल्लागार, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट व कॉन्स्टीट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्लीचे आजीव सदस्य तसेच राष्ट्रीय जहाज वाहतूक मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

कै. सरपोतदार हे शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. लढाऊ शिवसैनिक, झुंजार कामगार नेते आणि अभ्यासू व प्रभावी संसदपटू म्हणून ते परिचित होते.

कै. सरपोतदार सन 1990 व 1995 असे दोन वेळा खेरवाडी, मुंबई मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 2002 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवरही निर्वाचित झाले होते. तसेच 1996 व 1998 असे दोन वेळा उत्तर-पश्चिम, मुंबई, मतदार संघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. लोकसभेतील शिवसेना पक्षाचे गटनेते तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी शिखर समन्वय समितीचे संस्थापक-सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले होते.

अशा या ज्येष्ठ लढाऊ कामगार नेत्याचे व अभ्यासू संसदपटूचे शनिवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 रोजी दु:खद निधन झाले.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर तसेच श्री. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सुप्रसिध्द कवि विंदा करंदीकर यांच्या निधनामुळे मराठी साहित्य सृष्टीची अपरिमित हानी झाली आहे. पुणे येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार होते. संमेलन अगदी तोंडाशी आलेले असतांना ते अचानकपणे आपणास सोडून जातील असे कुणालाही वाटले नव्हते. परंतु शेवटी नियतीपुढे कुणाचेच काही चालत नाही हेच खरे आहे.

विंदा आज हयात नसले तरी त्यांनी केलेली साहित्याची सेवा अजरामर राहणार आहे. काव्य संग्रह, बाल कविता संग्रह, ललित निबंध, समीक्षा, अनुवाद, इंग्रजी समीक्षा आदी साहित्याच्या अनेक प्रांतात त्यांनी अतुलनीय कामगिरी केलेली आहे. सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या साहित्याचा सतत केंद्रबिंदू राहिलेला आहे. "स्वेदगंगा" हा सन 1949 सालातील काव्य संग्रह असो किंवा "अष्टदर्शन" हा सन 2003 मध्ये प्रसिध्द झालेला काव्यसंग्रह असो या सर्वच काव्यसंग्रहात मानवी आस्था हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू होता. "शपथ तुला", "माझ्या मना बन दगड", "रक्तसमाधी", "ती जनता अमर आहे" इत्यादी त्यांच्या रचना समाजमनाचा ठाव घेणाऱ्या होत्या. नव काव्याची अभिरुचीही त्यांनी आपल्या काव्य गायनाने समाजातील सर्व थरामध्ये पोहोचविली. "देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेणाऱ्याने घेता घेता, देणाऱ्याचे हात घ्यावे" हे त्यांचेच शब्द, साध्या सोप्या शब्दात उदात्त आशय भरणाऱ्या त्यांच्या कविता म्हणजे साहित्यातील मौल्यवान अलंकार होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्ल मार्क्स आणि संत ज्ञानेश्वर यांच्या प्रभावामुळे त्यांचे विचार कधीच बंदिस्त राहिले नाहीत, त्यांची दृष्टी माणसाच्या जगण्याचा आणि सत्याचाही सतत शोध घेत राहिली.

विंदा त्यांच्या समवयस्कांबरोबर जसे रमले तसेच ते बालगोपाळातही रमले आणि म्हणूनच समृध्द सार्थकी जीवन जगू शकले. त्यांच्या जाण्याने आज एक न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

सभापती महोदय,सन्माननीय कै.मधुकरराव सरपोतदार, ज्यांना आम्ही आदराने "दादा" असे संबोधत असू, असे आमचे सर्वांचेच दादा म्हणजे सरपोतदारदादा यांचे दिनांक 20 फेब्रुवारी 2010 रोजी निधन झाले.

सुरुवातीपासून शेवटच्या श्वासापर्यंत एकाच पक्षात काम करणाऱ्या राजकारण्यांची संख्या हल्लीच्या जमान्यात कमी होत चाललेली आहे. परंतु शिवसेनेची दिनांक 19 फेब्रुवारी 1966 रोजी स्थापना झाल्यापासून सरपोतदार दादा आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्याशी आणि शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले. त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. परंतु राजकीय चढ-उताराने न डगमगता ते सतत आपल्या कामामध्ये मग्न राहिले.शिवसेनेच्या उत्कर्षाच्या काळात आणि पडत्या काळात देखील सतत शिवसेनेच्याच ध्येय धोरणांशी ते प्रामाणिक राहिले.

दादांचे व्यक्तिमत्व हे विविधांगी होते. महाराष्ट्र श्रमिक सेनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक कामगारांना न्याय मिळवून दिला. कामगारांच्यावतीने आंदोलनामध्ये उतरुन त्यांनी अनेक खटले आपल्या अंगावर ओढवून घेतले. सभापती महोदय, 1994 मध्ये जेव्हा मी कापूस पणन महासंघाचा प्रशासक म्हणून महाराष्ट्रात काम करीत होतो, तेव्हा त्यांनी कापूस कामगार सेना निर्माण केली होती. त्या कामगार सेनेच्या माध्यमातून अनेकदा त्यांचे प्रश्न समजावून घेण्याची मला माननीय श्री.मधुकरराव सरपोतदार यांच्याकडून संधी मिळाली. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने माननीय सरपोतदारदादा आणि माझे संबंध अधिक दृढ होत गेले. मराठी, हिंदी व इंग्रजी या तीनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांची समूहशक्ती निर्माण करण्यात त्यांचा हातखंडा होता.मुंबईतील दंगलीच्या वेळी याच समूहशक्तीच्या जोरावर त्यांनी बांद्रा खेरवाडीमधील हिंदूचे रक्षण केले. मुंबईत अवैधपणे रहाणाऱ्या बांगलादेशी आणि पाकिस्तानी नागरिकांना भारताबाहेर हाकलून लावण्यासाठी त्यांनी सतत आवाज उठविला. हिंदुत्वाचे कट्टर अभिमानी असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरपोतदार यांनी अनेक खटले आपल्या अंगावर ओढवून घेतले पण तत्वापासून कधी माघार घेतली नाही.

सभापती महोदय, या सभागृहात देखील आपण सर्वांनी त्यांचे कामकाज पाहिलेले आहे. ज्या वेळेला 1998 मध्ये ते लोकसभेमध्ये सदस्य म्हणून काम करीत होते, त्यावेळी मला देखील लोकसभेमध्ये त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. एक करारी बाण्याचा माणूस, एक कर्मठ माणूस आणि कधीही नियमाच्या बाहेर न जाता, संसदीय आयुधे वापरुन सरकारवर सतत प्रहार करण्याची एकही संधी त्यांनी लोकसभेमध्ये देखील सोडली नव्हती. सभापती महोदय, आपणही सभागृहामध्ये अनेक वेळा विधेयकांच्या बाबतीत पाहिलेले आहे की, या सभागृहामधून एकही विधेयक चर्चेशिवाय पारित होऊ नये असा त्यांचा सतत आग्रह असावयाचा. तसेच सभागृहातील कामकाजाच्या वेळेबाबत सुध्दा ते आपल्याला सतत असे सांगत असत की, आम्ही वेठबिगार नाही. सभागृहाचे कामकाज हे ठरलेल्या वेळेप्रमाणेच चालले पाहिजे असा त्यांचा आग्रह असावयाचा.

सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या निधनाने आपण एका अभ्यासू, निष्ठावान कार्यकर्त्यास मुकलो आहोत. त्यांचे विचार, त्यांचे वर्तन, त्यांची निष्ठा आम्हा सर्वांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल. याठिकाणी मी माझ्यावतीने, माझ्या पक्षाच्यावतीने या दोन्ही महानुभवांना आदरांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.छगन भूजबळ यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाबाबत माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

श्री.विंदा करंदीकर यांच्याबाबत आपण बोलणे कितपत योग्य आहे असे आम्हाला वाटते. कारण साहित्य क्षेत्रातील त्यांचे स्थान हे उच्च प्रतीचे आहे, ज्यांचे वर्णन ध्रुव ताऱ्याच्याही पलिकडील असेच करता येईल. कविता आणि इतर सर्वच क्षेत्रामध्ये मार्गदर्शन कसे असावे हे यावरुन कळेल. आपण त्यांच्या अनेक कविता वाचून दाखवू शकतो कारण त्या त्यांनी लिहिल्या आहेत. पण समतेचा विचार देणाऱ्या विंदा करंदीकर यांना या महाराष्ट्रामध्ये कवितेतील ऋषीतुल्यता प्राप्त झाल्या नंतर सुध्दा, त्यांनी ज्ञानपीठ हा सर्वोच्य पुरस्कार मिळविल्यानंतर सुध्दा आपण खरोखरच त्या पध्दतीचा समाज येथे अनुभवतो काय हा प्रश्न जेव्हा निर्माण होतो, तेव्हा विंदा करंदीकर यांना श्रध्दांजली वाहण्याची आपली स्वत:ची, मी योग्यता वगैरे म्हणणार नाही, परंतु आपण तसे आहोत काय असा विचार आपण अंतर्मूख होऊन करावयास पाहिजे अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी या ठिकाणी विंदांची एक कविता उद्धृत केली. "ऊठ ऊठ सह्याद्रे । घुमवित, बोल मराठी खडे । समतेचे हे तुफान उठले । उठले सागराकडे॥" महाराष्ट्रातील 'मराठी' हा शब्द जो सर्व साहित्यिकांनी जीवाभावाने जपला आणि ऊरी बाळगला त्यासंदर्भात माझ्या सदनामध्ये मला 'मराठीत बोला हो' असे ज्यावेळेला उठून सांगावे लागते त्यावेळेला आपण अशा थोर साहित्यिकांना श्रध्दांजली का वाहावयाची असा प्रश्न माझ्यापुढे निर्माण होतो. महाराष्ट्राच्या या सदनामध्ये मराठी राज्यभाषा असताना मराठी बोलण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्याची पाळी येते त्यावेळेला ज्या साहित्यिकांचा आदर करण्यासाठी आम्ही उभे राहतो त्यावेळी ही शाशंकता निर्माण होते की, आम्ही या थोर साहित्यिकांच्या बाबतीत आमच्या भावना व्यक्त करण्याच्या बाजूबाजूला तरी फिरकतो का ? काही कर्तव्ये असतात ती करावी लागतात कारण त्यांचे थोरपण फार मोठे आणि मोलाचे असते. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा, आपण बोलणार आहात ते आम्ही ऐकणार आहोत. अशा साहित्यिकांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ज्यावेळी आपण उभे राहतो त्यावेळी त्यांच्या मृत्यूचा सन्मान होण्यापेक्षा त्यांच्या मृत्यूमुळे विधानसभा आणि विधान परिषदच सन्मानित होते एवढी त्यांची उंची असते. आपण त्यांच्या अनेक कवितांचे रसग्रहण सांगणार, त्याच्यावर बोलणार त्यापेक्षाही आता साहित्यात तेवढ्या उंचीचे कोण राहिले आहे हा प्रश्न माननीय शिवसेनाप्रमुखांनी व्यथित अंत:करणाने निर्माण केला. एवढ्या उंचीचे जे होते ते सगळे गेले. विंदा हे त्या पिढीतील शेवटचे होते. त्यांच्या बाबतीत चार दिवस रसभरीत वर्णने येत आहेत. वाचता वाचता आपण थकतोय. मग आपल्या लक्षात येते की, या व्यक्तिमत्वाचे असे अनेक अंग असतात की, जे आपल्याला माहीत नसतात. तत्वशीलता आणि तत्वाशी कधी तडजोड नाही असे जीवन जगणारे, सामान्य जीवन जगणारे, स्वत:ची कामे स्वत: करावयाची आणि या वयामध्ये त्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहावयाचे नाही ही जी तपस्वीता या व्यक्तिमत्वांकडे येते त्यावेळेला त्यांच्याबद्दल आपल्या जीवनामध्ये बोलावयास मिळते हे आपल्याला मिळालेले मोठेपण असते ही भावना व्यक्त करताना विंदांबद्दलचा आदर कोणत्या शब्दात व्यक्त करावा असे मला वाटते. ज्ञानपीठ पुरस्काराने पुरस्कृत झालेल्या महाराष्ट्रातील एका थोर

....2...

श्री. दिवाकर रावते .....

साहित्यिकाला आपण मुकलो आहोत. पण एक खंत वाटते. त्यांच्या या शेवटच्या अस्ताच्या काळामध्ये सारस्वतांची भूमी असलेल्या पुण्यामध्ये स्वत:चे काव्य वाचन करण्याकरिता ते येणार होते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु आता ते येऊ शकणार नाहीत. एका सारस्वत नगरीमध्ये एका सारस्वताला उद्याचे साहित्य सम्मेलन मुकलेले आहे अशी खंत व्यक्त करुन त्यांच्या बद्दलच्या भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमचे नेते दादा सरपोतदार यांचा आणि माझा सततचा परिचय होता. संघर्ष म्हणजे दादा सरपोतदार. शिवसेनेमध्ये जिथे संघर्ष असेल त्या संघर्षामध्ये जी जी नावे गोवली जातात त्यामध्ये दादा सरपोतदार हे एक नाव कायम असावयाचे. किंबहुना या सदनामध्ये बोलताना ते असे म्हणाले होते की, संघर्ष पुढे चालतो आणि त्याच्या मागे मी जातो, माझ्यामागे संघर्ष येईल यासाठी मी कधी थांबत नाही, कारण मी शिवसेनाप्रमुखांच्या विचाराने घडलेला जातीवंत शिवसैनिक आहे. दादांमध्ये एक वेगळे वैशिष्ट्य होते. सुदैवाने दादा विधानसभेत होते, विधान परिषदेत होते, आणि लोकसभेमध्येही होते. त्यांचा बाहेरच्या कामाचा मोठा व्याप होता. ते कामगार नेतेही होते पण सुशिक्षित, सुलक्षणी आणि समोरच्या माणसाशी त्याच पध्दतीने संवाद करणारे असे ते नेते होते. अरेला कारे म्हणणार परंतु कामगारांच्या भल्याकरिता काही वेळेला एक पाऊल मागे जावे लागले तरी चालेल, कामगारांच्या भल्याचे जे असेल त्याकरिता तडजोड नाही आणि त्यावेळेपुरते जे योग्य असेल ते करणार. कामगारांच्या हिताकरिता एक वेळ संघर्ष बाजूला ठेवावा लागला तरी चालेल अशा पध्दतीचे कामगार क्षेत्रातील त्याचे काम मोठे आणि वेगळ्या पध्दतीचे होते. आमचे दादा सरपोतदार श्रमिक सेनेचे प्रमुख होते. माननीय शिवसेनाप्रमुखांनी त्यांना शिवसेनची कामगार सेना असताना सुध्दा कामगार क्षेत्रातील स्वतंत्र संघटना चालू करण्याची परवानगी दिली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. माझा आणि त्यांचा परिचय नवीन असताना ते जॉन्सनमध्ये लेबर ऑफीसर होते. मी ठाण्यामध्ये जात येत असे. मी एक शिवसैनिक आहे. कोठे काही असेल तर धावावयाचे हे आमच्या रक्तातच होते. मी त्यावेळी वर्तमानपत्रामध्ये वाचले. दत्ता सामंत यांनी त्यावेळेला असे जाहीर केले की, आज आम्ही सरपोतदारांना घेराव घालणार.

यानंतर श्री. खंदारे...

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मी ताबडतोब दादांकडे जाऊन उभा राहिलो. त्यावेळी ते मला म्हणाले की, दिवाकर कशासाठी आलास ? मी त्यांना म्हणालो की, आज घोषणा झाली आहे ना ? आमच्या डोक्यात असे होते की, आमच्या नेत्याला कोणी तरी घेराव घालणार आहेत. ते लेबर ऑफिसर म्हणून तेथे कार्यरत आहेत हे आमच्या डोक्यातच नव्हते. त्यावेळी ते मला म्हणाले की, तू चिंता करु नकोस. तू जा. तेथे बाकीचे संवाद काय झाले ते मी येथे सांगत नाही. असा संघर्ष करणारे नेते म्हणजे दादा सरपोतदार. ते जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीत असताना एखादा माणूस आपल्या व्रताशी किती प्रामाणिक राहू शकतो ? ते त्या कंपनीत लेबर ऑफिसर असल्यामुळे कंपनीचे भले बघणार हे अपेक्षित होते. परंतु त्यांनी असंख्य बेकार शिवसैनिकांना, युवकांना कामाला लावले. पण कामगारांच्या भल्यासाठी त्यांनी ते पदही सोडून दिले. श्री.दत्ताजी नलावडे एकदा म्हणाले होते की, ते पूर्वी एका छोटया धरमशी मोरारजी नावाच्या उपक्रमात कामाला होते आणि त्यांच्या घरासमोरच कब्बडीचे सामने होत असत. त्यांना कब्बडीचा शौक होता. कब्बडी या क्रीडा क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळवून त्या कब्बडी संघटनेचे नेतृत्व केले होते. कामगारांच्या वेगवेगळया संघटनांमध्ये सहभागी होवून शिवसेनेच्या मुलभूत अशा प्रत्येक आंदोलनामध्ये दादा विचाराने नव्हे तर आचाराने सहभागी होत असत. जी परिस्थिती असेल त्या परिस्थितीला सामोरे जाऊन त्यात उतरत असत. श्री.अनिल देसाई हे त्यांच्या सोबत सातत्याने होते. ते एकेक गोष्ट सांगू शकतील. त्या गोष्टी मला माहीत आहेत आणि शिवसैनिकांनाही माहीत आहेत. दादा, कोणत्याही परिस्थितीला घाबरायचे नाहीत, कचरायचे नाहीत. 1992-93 च्या दंगलीमध्ये पोलिसांचे तुकडे तुकडे करुन टाकणारा समाज जेथे राहतो त्या समाजाला सुध्दा धाक दाखविण्याची त्यांच्यात हिंमत होती. दादा सरपोतदार यांनी येरवडा जेलमध्ये जवळपास 6-7 महिने तुरुंगवास भोगला होता. मला त्याच जेलमधील एका खोलीत जेलरने नेले आणि सांगितले की, ज्या खोलीत दादा सरपोतदार यांना ठेवले होते त्या खोलीत तुम्ही आहात. तेव्हा तुमच्या बरोबर जे कार्यकर्ते आहेत त्यांना समजावून सांगावे. दादा तुरुंगात असताना सुध्दा कसे वागायचे, कसे विचार करायचे, कसे रहायचे, कसा संवाद साधायचे ते त्या तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी मला आवर्जून सांगितले होते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जेलमध्ये असताना सुध्दा त्यांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यावेळी दादांनी कशासाठी तुरुंगवास भोगला होता ? हिंदुत्ववाद्यांवर होणा-या आक्रमणाच्या विरोधात त्यांनी संघर्ष पुकारला होता. त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. शेवटी न्यायालयाने त्यांना त्यातून मुक्त केले. परंतु त्यांच्या जीवनातील सहा महिने अत्यंत कठीण स्थितीत गेले होते. तसे कठीण दिवस मी सुध्दा अनुभवले होते. दादांचा पोलिसांशी नेहमीच संघर्ष होत होता. एकदा दादांना अटक होत असताना पहिल्यांदा हायवे बंद केला गेला. हजारो महिलांनी तो रस्ता बंद केला होता. इतका प्रखर संघर्ष घराघरांमध्ये पोहोचला होता. आज आपण दादांना आदरांजली वाहत आहोत. पण ते विधानसभेत होते, या सभागृहात होते. मी त्यांच्या बाजूला बसत होतो. त्यांच्या संसदीय कार्य पध्दतीबद्दल बोलण्याची आवश्यकता नाही. कारण आपण सर्वांनी ती अनुभवली आहे. सभागृहात आम्हाला वेठबिगार ठरवू नये असे सातत्याने बोलत असत. दादा सभागृहात आल्यानंतर नियमांचे पुस्तक समोरच ठेवत असत. ते केव्हाही नियमाच्या आधारे बोलत असत. या संसदीय कामकाजामध्ये नियमाला सोडून कोणतेही कामकाज होता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असे. ते ज्या पध्दतीने सरकारसंबंधी बोलत असत त्याच पध्दतीने स्वकीयांना सुध्दा ते कधी माफ करीत नसत. एखादी गोष्ट नियमांच्या विसंगत होत आहे असे त्यांना वाटले की, ते लगेच बाहेर येऊन आम्हाला बोलत असत की, असे होता कामा नये, असे होऊ नये. इतका कडवटपणा त्यांच्यात होता. सभापती महोदय, आपल्याही दालनामध्ये कोणत्याही चर्चेसाठी आल्यानंतर त्यांच्यातील कडवटपणा कमी होत नसे. सभागृहात कोणतेही विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची तारीख, त्याचे संदर्भ ते नीट व्यवस्थितपणे लिहून ठेवत असत. सभापती महोदय, ज्यावेळी दादा सरपोतदार या सभागृहात असायचे त्यावेळी आम्हाला त्यांचा मोठा आधार वाटत असे. या सदनाला सुध्दा आधार वाटत असे. त्यांचे एक वैशिष्ट्य होते. या सभागृहात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी ते लक्षात ठेवले पाहिजे. दादा एकदा सभागृहात आल्यानंतर सभागृहाची बैठक संपेपर्यंत बाहेर जात नव्हते. गंमत म्हणून ते दिवसभर बसत नसत, तर आपण या विधिमंडळामध्ये

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आल्यानंतर विधिमंडळाच्या कामकाजामध्ये पूर्णपणे सहभागी झाले पाहिजे, आपण एखाद्या चर्चेत सहभागी होवो अगर न होवो, सभागृहात दुसरे वक्ते बोलत असतात त्यावेळी त्यांचे विचार आपण ऐकले पाहिजेत आणि आपण ज्यावेळी बोलत असतो त्यावेळी आपले विचार दुसरे सदस्य ऐकत असतात याचे भान त्यांना सातत्याने होते. त्यामुळे आपण सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे अशी त्यांची भावना असे. युतीचे शासन असताना ते सरकार कसे बरखास्त करता येईल यादृष्टीने त्यावेळच्या विरोधी पक्षातील काँग्रेसवाल्यांनी चंग बांधला होता. राज्यातील सरकार बरखास्त करण्याच्या घटनेतील कलमाचा वापर करण्यासाठी दिल्लीमधील सरकारवर प्रचंड दबाव टाकण्यात आला होता.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...

मला आठवते, त्यावेळच्या परिस्थितीच्या संदर्भात मला दादांसमवेत दिल्लीला जाण्याचा प्रसंग आला. दादा त्यावेळी केन्द्रीय गृहमंत्र्यांना भेटले. दादांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा तेथील संसद व्यवस्थेवर आणि मंत्रिमंडावर होता. कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण महाराष्ट्राची बाजू एकल्या शिवाय अशा प्रकारचे पाऊल उचलता येणार नाही असे केन्द्रीय गृहमंत्र्यांना ठणकावून सांगणारे दादा मी त्यावेळी पाहिले. त्याचा परिणाम असा झाला की, केन्द्रीय गृहमंत्री मुंबईला आले, शिवसेना प्रमुखांना भेटले, तत्कालीन मुख्यमंत्र्यांना भेटले, सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यानंतर सरकार बरखास्त करण्याचा केन्द्राचा निर्णय स्थगित करण्यात आला. दादा आम्हाला कौतुकाने सांगत असत की, ते संसदीय अंदाज समितीचे चेअरमन असताना आताचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे त्यावेळी त्यांच्या समितीमध्ये सदस्य म्हणून असायचे आणि ते त्यांच्या समवेत विविध विषयावर चर्चा करायचे. दिल्लीतील असे अनेक दिग्गज दादांची चौकशी करायचे. आपल्या कार्यकर्तृत्वाची आणि व्यक्तिमत्वाची छाप संसदेवर टाकणारे दादा आज आमच्यातून गेले आहेत. या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी जेव्हा दादांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला त्यावेळी मी त्यांच्याकडे पाहिले. एकेकाळचे ते त्यांचे सवंगडी. निष्ठा कशा असाव्यात ? सभापती महोदय, घरामध्ये अन्य पक्षाचे वादळ घोंगावले तरी दादांची शिवसेना प्रमुखांवरची निष्ठा कधीही पातळ झ ाली नाही. शेवटपर्यन्त त्यांनी कडवट निष्ठा जोपासली. स्वत:च्या घरातच दुस-या पक्षाचे काम चालू असताना शिवसेनेचे काम करण्याकरिता घराबाहेर पडणारे दादा मी पाहिले. मला काय मिळाले या पेक्षा मी एक कडवट शिवसैनिक आहे हे व्रत अखेरपर्यन्त सांभाळणारे दादा आमच्या सारख्या शिवसैनिकांना आदर्श आहेत.. या संघटनेमध्ये मला काही मिळत नाही म्हणून निष्ठा टाकून पळणारे मी अनेक पाहिले. घरामध्ये दुस-या पक्षाशी संघर्ष असतानाही शिवसेनेवरची निष्ठा तिळमात्रही ढळू न देता दादा शेवटपर्यन्त आमच्या भगव्यामध्येच राहिले. हे सर्व संस्कार शिवसेना प्रमुखांनी केले आणि ते त्यांनी अखेरपर्यन्त जोपासले. ते संस्कार आमच्यामध्ये कायम राहोत अशा प्रकारची भावना मी व्यक्त करतो आणि दादांना आणि विंदांना आदरांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या 10-15 वर्षात आणि स्वातंत्र्यानंतरच्या 10-15 वर्षात मराठी काव्य क्षेत्रामध्ये ज्यांची नावे अतिशय तळपून उठली त्यामध्ये विंदा हे एक नाव होते. सुरुवातीला बा.सी.मर्ढेकर, कुसुमाग्रज, वसंत बापट, मंगेश पांडगावकर अशी फार मोठी दिग्गज माणसे होती. राज्यकर्ते ज्या देशामध्ये स्वतंत्र असतात किंवा जो देश स्वतंत्र असतो तेथे साहित्याला जो मान मिळतो त्या दर्जाचा मान पारतंत्र्यामध्ये असलेल्या देशातील साहित्याला फारसा मिळतो असे नाही. त्यावेळी साहित्याला जो सन्मान मिळायला पाहिजे तो मिळत नाही हे त्या पिढीच्या लक्षात येत होते. ही माणसे त्यावेळेला काव्यावरच्या आपल्या श्रध्देतून गावागावातून, शहरा-शहरातून काव्य गायनाचे कार्यक्रम करीत असत आणि हे कार्यक्रम ज्या तरुण पिढीने पाहिले त्या पिढीचा मी एक प्रतिनिधी आहे. मला विंदांचे एक महत्वाचे वैशिष्टय वाटते ते असे की, राजकारण हे समाजकारणाशी चाटून जाते. राजकारणामध्ये अनेक विषय हे सामान्य असे असतात. पण राजकारणाच्या या प्रवाहामध्ये काळाच्या ओघात काही असामान्य असे प्रसंग येतात. मग स्वातंत्र्य आंदोलनासारखा प्रसंग असेल, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसारखा प्रसंग असेल किंवा आणीबाणीसारखा प्रसंग असेल, अशा वेळेला त्या क्षेत्राशी संबंधित नसलेली देखील अनेक माणसे त्यामध्ये दाखल होतात. पण एकदा राजकारणाच्या प्रवाहामध्ये दाखल झाल्यानंतर फार दुर्मिळ माणसे त्यापासून बाजूला सरकतात. हैद्राबादच्या मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेला हा थोर सेनानी ते काम संपल्या बरोबर पुन्हा आपल्या साहित्याच्या क्षेत्राकडे, काव्याच्या क्षेत्राकडे ज्या सहजपणे वळला ते एक त्यांचे दुर्मिळ अशा प्रकारचे वैशिष्टय आहे असे मला स्वत:ला नेहमीच वाटत आलेले आहे. सभापती महोदय, सामान्य लोकांची संख्या ही मोठीच असणार. असामान्यांच्या पोटी जन्म घेऊन असामान्यत्वाला पोहोचणे हे फार कठीण आहे अशातला भाग नाही. पण सामान्याच्या पोटी जन्म घेऊन असामान्यत्वापर्यन्त जो मनुष्य पोहोचतो तो अनेक सामान्य लोकांसाठी दीपस्तंभासारखा उभा रहातो. विंदांनी त्यांच्या आयुष्याची सुरुवात ही मनमाडला, तासगावला शिक्षक म्हणून केली.

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षक म्हणून काम केल्यानंतर स्वत:च्या गुणांनी ते नंतर प्राध्यापक झाले. बेळगावसारख्या ठिकाणी व शेवटी शेवटी मुंबईतील रुईया, ईएसआयएस कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्या काळात जी नामांकित अशी मंडळी होती, त्यामध्ये कै.विंदा करंदीकर हे एक होते. ज्ञानपीठ पुरस्काराचा मानकरी ठरलेला हा थोर माणूस अतिशय समृध्द असे 92 वर्षाचे जीवन जगला. मला त्यांचे एक अतिशय महत्वाचे वैशिष्ट्य वाटते ते असे की, मानवी स्वभावाचे बारीक धागेदोरे न्याहाळून जो स्वभाव चिरंतन आहे, चिरायू आहे, टिकावू आहे त्यांना ओळखून त्यावर शब्दांची रचना बांधणे हा अतिशय दुर्मिळ गुण त्यांच्यामध्ये मुबलक प्रमाणात होता असे मानणारा मी आहे. मानवी समूह आहे त्यामध्ये देणाऱ्यांची संख्या कमी आहे. देणारे आहेत ते देतच जातात, ते विचार करीत नाहीत. अशांची संख्या कमी आहे. परंतु घेणाऱ्यांची संख्या भरमसाठ आहे आणि घेता घेता किती घ्यावे याची मर्यादा ठाऊक नसलेल्या लोकांची संख्या सुध्दा खूप आहे. हा मानवी स्वभाव आहे. ही संख्या अगदी अल्पसंख्य आहे. मोजायची झाली तर दुर्मिळ ठरेल अशी आहे. मग हे सारे चित्र ज्यांच्या मनामध्ये त्यांनी पाहिले त्यावेळी त्यांनी या स्थितीचे वर्णन केले, "देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातच घ्यावे." घेणाऱ्याचा स्वभाव आणि देणाऱ्याचा स्वभाव इतक्या सोप्या पध्दतीने त्यांनी मांडला. हा मानवाचा स्वभाव चिरायू असल्यामुळे त्यांचे हे शब्द सुध्दा सहजपणे चिरायू ठरणार आहेत. मानवी स्वभावावर उत्कृष्टपणे शब्दरचना करणाऱ्या कै.विंदा करंदीकर यांच्याबद्दल मी मनापासून आदरभाव व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सभागृहातील आमचे सहकारी कै.मधुकरराव सरपोतदार यांना सुध्दा आपण आदरांजली अर्पण करीत आहोत. अतिशय तडफदार कामगार नेता, अतिशय उत्कृष्ट संसदपटू, प्रदीर्घ संसदीय कारकीर्द लाभलेले आणि या राज्याच्या विधानसभेमध्ये दोन वेळा, देशाच्या लोकसभेमध्ये दोन वेळा आणि विधानपरिषदेमध्ये सहा वर्षे ते आपल्यासोबत होते. या सभागृहातून निवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा जास्त कालखंड उलटलेला नाही. नियमांच्या पुस्तकावर बोट ठेवणारे, नियम लक्षात आणून देणारे, पीठासीन अधिकाऱ्यांना नियमांनुसार कामकाजाबाबत विनंती करणारे आणि पीठासीन अधिकारी सुध्दा त्यांची विनंती लक्षात घेऊन योग्य ती दुरुस्ती

प्रा.बी.टी.देशमुख.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यास सहमत होत असत. कै.मधुकर सरपोतदार यांची संसदीय कारकीर्द अतिशय प्रभावी ठरली. कामगार चळवळीमध्ये त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे आणि तिसरे म्हणजे आपल्या पक्षाशी ठामपणे निष्ठा बाळगणारे होते. पक्षाच्या स्थापनेपासून शेवटपर्यंत पक्षनिष्ठा त्यांनी सोबत ठेवली असा वैशिष्ट्यपूर्ण नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. मी मनापासून त्यांना श्रध्दांजली वाहतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उपमुख्यमंत्री यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या शोकप्रस्तावासाठी मी माझ्या सहवेदना याठिकाणी व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

मराठी सारस्वताच्या दरबारातील एक ज्येष्ठ मानकरी आदरणीय विंदा करंदीकर यांचे दु:खद निधन झाले. मराठी वाङ:मयाला तीन महापुरुष लाभले. तीनही कादंबरीकार व कवी अशा साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला ते कै.वि.स.खांडेकर, कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर हे होत. जेव्हा विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा सभागृहात आपण सर्वांनी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडून तो संमत केला. हा अभिनंदनाचा प्रस्ताव संमत केल्यानंतर त्यांचा या दोन्ही सदनाच्या वतीने आपल्या मध्यवर्ती सभागृहात सन्मान करावा, सत्कार करावा किंवा त्यापेक्षा मोठा सत्कार शासनाच्या वतीने करावा अशी आपल्या सर्वांची इच्छा होती. पण तत्वाशी कधीही तडजोड न केलेल्या आणि कोणत्याही सत्कार सन्मानाची अपेक्षा आयुष्यामध्ये कधीही न बाळगलेले हे महाकवी होते.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

त्यांच्या सुनबाई डॉ. नीलमताई गोऱ्हे या आपल्या सभागृहात सदस्या आहेत. आपले ठरले होते की, त्यांचा या ठिकाणी सन्मान करायचा परंतु विंदा यांनी अशा प्रकारचा कुठलाही सन्मान घ्यायचा नाही हा जीवनात घेतलेला निर्णय त्यांनी शेवटपर्यंत अमलात आणला. पुण्याला 26 ते 28 मार्च या काळात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा कार्याध्यक्ष म्हणून आम्ही विंदांना उद्घाटनाचे निमंत्रण दिले. त्यांनी यासाठी येण्याचेही मान्य केले. एवढेच नव्हे तर त्यांचा स्वभाव एवढा मिश्कील की त्यांनी स्वत:च्या हाताने या संमेलनासाठी उपस्थित राहीन म्हणून पत्रही लिहून दिले. त्यावेळेस स्वागताध्यक्ष आणि आम्ही म्हणालो की, पत्राची वगैरे काही जरुर नाही परंतु ते म्हणाले की, लोकांना असे वाटेल की, हा माणूस येतो की नाही ? वय झाले वगैरे शंका कुशंका व्यक्त करतात म्हणून माझे पत्र घेऊन जा. असे म्हणून त्यांनी थरथरत्या हाताने चार ओळीचे पत्र दिले आणि ते पत्र आजही त्या ठिकाणी आहे त्यामुळेच आज विशेष दु:ख होत आहे. ज्यावेळी उद्घाटनाला येणार अशी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले, त्यांचा पहाडी आवाज होता. त्या आवाज ते म्हणाले की, कदाचित तुमची कल्पना असेल की मी भाषण करावे परंतु मी या संमेलनाच्या ठिकाणी भाषण वगैरे करणार नाही तर माझ्या कवितांचे काव्य वाचन करीन. त्यातल्या त्यात महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी जी गीते केलेली आहेत त्यापैकी दोन तीन गीते तरी मी 100 टक्के म्हणून दाखवीन. आताच सभागृहात सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे अत्यंत परखड मते असणाऱ्या विंदांवर सुरुवातीला गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. नंतरच्या काळात कार्ल मार्क्सपासून शेक्सपियरपर्यंत, ज्ञानोबापासून तुकोबांपर्यंत कुठलाही वैचारिक बैठकीचा धागा त्यांनी सोडला नाही. या सर्वांच्या मधून त्यांचं सूत्र मात्र असं होतं की, माणसामधला माणूस शोधावयाचा, सत्याचा वेध घ्यायचा, समतेच्या तत्वांशी कधीही तडजोड करावयाची नाही. सामान्यपणे विचारांप्रमाणे आचरण करावयाचे यांची जी फारकत समाजामध्ये आज तुम्हा-आम्हाला दिसत आहे त्याबाबत विंदांच्या बाबतीत आदरपूर्वक सांगितले पाहिजे की, विचार आणि आचरण यांचे एक सूत्र जीवनाच्या माध्यमातून सर्व समाजाला, सर्व साहित्यिकांना आणि सर्वांना खऱ्या अर्थाने आपल्या वागण्यातून, आपल्या आचरणातून दाखविलेले होते. त्यांचे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

जबरदस्त प्रभुत्व होते तसेच त्यांची भाषांतरे खूप गाजलेली आहेत. म्हणून दीर्घ काव्यांपासून बालकवितांपर्यंत कसलाही प्रांत त्यांनी सोडलेला नाही. आताच प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, समकालीन कविंच्या मध्ये कै. वसंत बापट ते कै. विं.दा.करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या तिन्ही महानुभवांनी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यामध्ये, खेड्यापाड्यापर्यंत काव्य वाचनाचा आणि काव्य गायनाचा हा प्रकार पोहचविला. त्यापूर्वी देखील हा प्रकार होताच. कवि यशवंत, मर्ढेकर तसेच बा.भ.बोरकर यांच्या काळातही या तिघांनी मराठी वाङ:मयामध्ये काव्य गायनाचा प्रकार अत्यंत लोकप्रिय केला. त्यावेळेस जे मानधन मिळत होते त्याबाबत त्यांनी लिहून ठेवलेले आहे. त्यावेळेस या तिघांना मिळून 51 रुपये मानधन मिळत होते. 51 रुपयेच का तर 17 गुणिले 3 असे तिघांना सारखी रक्कम मिळावी म्हणून 51 रुपये त्या काळात मानधन ठरवून दिलेले होते. अशा या तिन्ही महा कविंच्या बाबतीत पुलंनी आपापल्या परीने वर्णन केलेले आहे. त्यांनी वसंत बापट यांच्या बाबतीत वर्णन केले आहे. मंगेश पाडगांवकरांच्या बाबतीत वर्णन केलेले आहे. त्यांनी असे वर्णन केले आहे की, एक कवी मानधनाचे पाकिट मिळाले की खिशात हात घालून खिशातल्या खिशातच मोजत होते. दुसरा कवी मानधनाचे पाकिट मिळाल्याबरोबर पत्नीकडे देत होते. तर विंदांच्या बाबतीत वर्णन करताना त्यांनी सांगितले की, मानधनाचे पाकिट सर्वांच्या समोर उघडणार आणि नोटा मोजणार, कारण काय तर तुझी एक रुपयाची नोट सुध्दा मला जास्त येता कामा नये म्हणून मी मोजतो, असे ते म्हणत असत. तसेच ते पाकिट ताबडतोब कोणाला तरी देणगी म्हणून ते देत असत. अशा प्रकारे त्यांनी कधीच मानधनाचे पाकिट घरी नेले नाही हे विंदांच्या आयुष्यातील फार मोठे वैशिष्ट्य होते. आताच प्रा.बी.टी. देशमुख यांनी सांगितले की, सामान्यत्वाकडून असामान्यत्वाकडे पोहचणे हे जसे अवघड तसेच ते अत्यंत साधे आणि सोपे विंदांनी आपल्या आयुष्यात करुन दाखविले पण आयुष्यात त्यांनी मानधनाचा एक रुपया सुध्दा खर्च केला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

त्यांना जे काही मानधन मिळत होते ते त्यांनी कधीच जवळ ठेवले नाही तर ते त्यांनी कोणत्याना कोणत्या मार्गाने परत देऊन टाकले होते. विंदांचे दुसरे वैशिष्टयअसे की, कै. विंदा यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्य योद्धे म्हणून काम केले होते परंतु ते काम संपल्यानंतर कुठलीही अपेक्षा न करता त्यातून बाहेर येऊन आपल्या काव्य प्रांतामध्ये समरस होणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या अनेक काव्यांचे वर्णन या ठिकाणी करण्यात आलेले आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजाचे हे चतुर्थ जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे मुद्दाम वर्णन करतो की, विंदांच्या मुखातून हे काव्य मला तीन वेळा ऐकायला मिळाले होते. त्या वाक्यातील कल्पना अशी आहे की, शेक्सपियर आणि संत तुकाराम महाराज स्वर्गामध्ये भेटलेले आहेत व त्यांच्यांमध्ये जो संवाद होतो तो विंदानी लिहिलेला आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, विंदाची ताकद फार मोठी होती. त्यांनी विल्यम शेक्सपियरचा उल्लेख "विल्ल्या" म्हणून केलेला आहे आणि संत तुकाराम महाराजांचा उल्लेख "तुक्या" असा केलेला आहे. विल्ल्या तुक्याशी बोलतो आहे असा तो संवाद आहे. त्या संवादामधून त्यांनी दाखवून दिलेले आहे की, आमचे जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे सर्वश्रेष्ठ तत्ववेत्ते होते आणि हेच दाखवण्याचे काम विंदानी आपल्या काव्य पंक्तीमधून, शब्दाच्या सामर्थ्यामधून मराठी सारस्वताला आणि मराठी माणसाला दिलेले आहे. त्यांच्या खूप कविता मी वाचलेल्या आहेत. मी जेव्हा शाळेत शिकत होतो तेव्हा त्यांची एक कविता अशी होती की, "माझ्या मना बन दगड, हास रगड, हास रगड" अशी कविता होती. या कवितेमधून त्यांनी स्थितप्रज्ञाची एक फिलॉसॉफी दाखवून दिलेली आहे. "तू तुझ्या मनावर दगड ठेव, मन दगड करुन टाक आणि मग आयुष्यामध्ये हसत जा, हसत जा असे त्यांना या कवितेमधून सांगावयाचे होते. अशा सुंदर आणि साध्या शब्दामध्ये काव्य लिहिण्याचे सामर्थ्य आणि त्यातून मोठे तत्वज्ञान सांगण्याचे सामर्थ्य हे विंदाच्या काव्य पंक्तीमध्ये होते. "उसळलेल्या द-यातून, पिसाळलेली आयाळ घ्यावी, भरलेल्या भीमेमधून तुकोबाची माळ घ्यावी" असे सुंदर तत्वज्ञान विंदांच्या कवितेमधून आपल्याला दिसून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

येते. विंदानी भागवत संप्रदायाचे तत्वाज्ञान असेल, मार्क्सवाद असेल, कान्ट असेल, एंजेल असेल, शेक्सपियर असेल, टॉलस्टॉय असेल असे सर्व वाङमय प्रकार त्यांनी हाताळले होते, त्यांनी कोणतेही वाङमय सोडले नाही एवढे सामर्थ्य विंदांच्या लेखणीमध्ये, काव्यामध्ये आणि लेखनामध्ये होते.

सभापती महोदय, विंदा हे आमच्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला येणार होते परंतु मला त्यासंदर्भात सांगतांना वेदना होतात. ते जर आमच्या कार्यक्रमाला आले असते तर सर्व मराठी मनाला आनंद झाला असता. परंतु तरी देखील या सदनाला मी सांगू इच्छितो की, आम्ही कार्यक्रमाच्या संदर्भात निर्णय घेतला आहे की, उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी विंदांच्या काव्य गायनाच्या क्लिपिंग्स त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या रसिकांना दाखविल्या जाणार आहेत. मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली महासाहित्यिकाला, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या सरस्वती दरबारातील एका श्रेष्ठ मानक-याला अर्पण करतो.

सभापती महोदय, आमचे सर्वांचे सहकारी कै.मधुकर सरपोतदार (दादा) हे सुरुवातीला माक्सर्वादी विचाराचे होते परंतु ते नंतर शिवसेनेच्या विचाराने प्रभावित झाले होते. मराठी माणसाच्या प्रश्नांच्या संदर्भात त्यांची पोटतिडीक, कामगार चळवळीतील त्यांच्या पोटतिडकीबद्दल तसेच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या संदर्भातील वर्णन या ठिकाणी करण्यात आले आहे. त्यांनी मोठया प्रमाणात कामगार चळवळी बांधल्याच बांधल्या परंतु त्यांच्या प्रश्नांकरिता अत्यंत प्रामाणिकपणे आणि शेवटच्या श्वासापर्यंत संघर्षही केला. त्यांच्या संदर्भात दुसरी जी गोष्ट या ठिकाणी सांगितली गेली ती अत्यंत महत्वाची आहे. दादा हे दिवसभर या सभागृहात उपस्थित राहत असत असे माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी या ठिकाणी सांगितले आहे. सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून संपेपर्यत ते कधीही सभागृहाच्या बाहेत जात नसत असा नियम त्यांनी आपल्या जीवनात पाळला होता आणि आपण ही बाब सर्वांनी जवळून पाहिलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ....

विधान सभा, विधान परिषद आणि लोकसभा या तीनही ठिकाणी ते अत्यंत समर्थपणाने वावरत होते.लोकसभेचे अधिवेशन चालू असतांना मुबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न असो वा अन्य कोणताही प्रश्न असो तो त्यांनी मांडला नाही असे एकही अधिवेशन गेले नाही. या संदर्भात त्या त्या वेळची बातमी आपल्याला वृत्तपत्रात वाचावयास मिळाली नाही असे कधीही घडले नाही. मुबईतील चाळींचा प्रश्न असो, मुंबईतील कामगारांचा प्रश्न असो, घरांचा प्रश्न असो असे विविध प्रश्न नियमांचे पुस्तक बरोबर घेंऊन आणि नियमावर बोट ठेवून सभागृहात ते शांतपणें मांडत होते. त्यांना कोणी कितीही विचलीत करण्याचा प्रयत्न केला असला तरी शातपणें आपल्या मुद्यापासून बाजूला न जाता तो मुद्दा अत्यंत आग्रहीपणाने मांडण्याचे सामर्थ वा आत्मविश्वास दादांमध्ये होते. आज ते आपल्यामध्ये नाहीत. गेल्या पास सहा वर्षात त्यांनी या सभागृहात जे काम केले होते ते आमच्या सारख्या अनेक सन्माननीय सदस्यांना मार्गदर्शक आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---- --

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांबद्दल या ठिकाणी भरभरुन बोलले गेले आहे.त्यांच्याबद्दल आपण जितके बोलू तितके कमीच आहे.मराठी वाङमयाचे नभांगण अलीकडच्या काळात वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या त्रिमुर्तीने फुलवले होते परंतु विंदाच्या कवितेची जातकुळी मात्र वेगळीच होती. ते तत्ववेत्ते कवी होते आणि त्यांच्या कवितेमध्ये मानवतेचा कैवार होता, शोषणाविरुध्दचा एल्गार होता, क्रांतीचा पुकार होता आणि समाजवादाचा कडवा पुरस्कारही होता.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी आताच सांगितल्याप्रमाणे महात्मा गांधींवर श्रध्दा असलेले विंदा हे पक्के मार्क्सवादी होते त्याचबरोबर या मातीशी त्यांचे नातेसुध्दा अत्यंत अतूट असे होते. मराठी भाषेवर आणि मराठी संस्कृतीवर प्रेम करीत असतांना त्यांनी हे प्रेम कधीही संकीर्ण होऊ दिले नाही, संकुचितही होऊ दिले नाही. उलट आपल्या भाषेची आणि संस्कृतीची कवाडे कशी खुली राहतील याचा प्रयत्न त्यांच्या प्रत्येक शब्दा शब्दातून आपल्याला जाणवत राहतो. विंदाना ज्यावेळी ज्ञानपीठ पुरस्काराचे दोन लाख रुपये मिळाले होते त्यावेळी त्यांनी ते आंतरभारती अनुवादासाठी देणगी म्हणून दिले होते. अशा प्रकारची त्यांची निष्ठा होती.

सभापती महोदय, हे सभागृह सार्वभौम आहे असे आपण नेहमी म्हणत असतो परंतु या सभागृहातील आपण सारे जण सार्वभौम जनतेचे प्रतिनिधी आहोत. ही जनता अखेर सार्वभौम आहे. त्या जनतेचा आक्रोश , त्या जनतेच्या मागण्या, त्या जनतेच्या वेदना आपण जाग्या ठेवल्या पाहिजेत यासबंधीचा इशारा विंदांनी आपल्या कवितेतून दिला आहे.त्या कवितेतील काही ओळी मी आपल्याला वाचून दाखवतो.

" **<u>ती जनता अमर आहे</u>**

जनतेच्या पोटामध्ये
आग आहे आग आहे;
जनतेच्या डोळयांमध्ये
शंकराचा राग आहे.
जनतेच्या ऐक्यामध्ये
लाव्हाची लाट आहे;

3..

श्री.कपिल पाटील .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जनतेच्या पायांपुढे

प्रकाशाची लाट आहे.

कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत :-

" जनतेच्या नसांमध्ये
लाल लाल रक्त आहे;
जनतेच्या सत्तेखाली
पृथ्वीचे तख्त आहे.
जनतेच्या मुक्तीसाठी
अजून एक समर आहे;
आणि जिचा आत्मा एक
ती जनता अमर आहे.

त्यांची सगळी कविता आणि त्यांचे सगळे वाङ्मय जनतेच्या शोषण मुक्तीसाठी होते परंतु यासाठी प्रयत्न करीत असातांना ते कधीही प्रचारकी झाले नाहीत. कवितेतील वाट त्यांनी कधीही सोडली नाही. वाङमयातील नियम त्यांनी कधी नाकारले नाहीत आणि कधीही प्रचारकी होऊ न देता त्यांनी आपला विचार इतरांसमोर पोहोचवला. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे एका बाजूला विंदा हे अत्यंत आधुनिक असलेले कवी होते परंतु त्यांनी तुकोबाकडून माळ घेतली होती. भीमेकडून काय घ्यावयाचे तर तुकोबाची माळ घ्यावी असे त्यांनी आवाहन केले होते. "देणाराने देत जावे आणि घेणा-याने घेत जावे "या कवितेमध्ये त्या ओळी आहेत. अशा प्रकारे विंदा हे एक मोठे कवी होते. हे महाकवी आज आपल्यातून निघून गेलेले आहेत त्यांना मी विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय कै. मधुकर सरपोतदार यांचे दु:खद निधन झालेले आहे. आदरणीय दादा हे सभागृहात असतांना मी देखील या सभागृहात आलो होतो. सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत ते या सभागृहात उपस्थित रहात होते. प्रत्येक चर्चेमध्ये ते नियमानुसार भाग घेत होते. सभागृहातील नियमांच्या बाबतीत ते कठोर आग्रही होते. त्यांचे विचार कदाचित वेगळे असू शकतील सभागृहात मी एखाद्या विषयावर बोललो तर ते मला लॉबीत गेल्यावर प्रेमाने असे म्हणत की , "तू वेगळे बोलत आहेस परंतु माझा विचार दुसरा आहे त्याचा तू देखील विचार कर " .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारे स्वत:च्या विचाराबद्दल आग्रही असणारा परंतु तो न लादता रेटत राहणे. आणि सर्वाशी संवाद राखणे असे एक अजब रसायन दादांकडे होते. कै. मधुकर सरपोतदार यांचे दु:खद निधन झाले आहे. मी त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ' माझ्या मना बन दगड' असे कितीही म्हटले तरी अशा प्रसंगी वैयक्तिक,सार्वजनिक,सामाजिक,कौटुंबिक,अशा प्रकारच्या सगळया भावना एकत्रित आलेल्या असतात तशा प्रकारचा हा प्रसंग आहे. विंदा करंदीकर यांना श्रध्दांजली व्यक्त करीत असतांना त्यांच्याशी माझा जो काही कौटुंबिक असा परिचय होता. त्यामध्ये 1976 साली मी त्यांच्या घरामध्ये सून म्हणून प्रवेश केल्यानंतर एक तर पहिला प्रश्न ते नेहमीच मला करायचे, कारण त्यावेळी माझे मेडिकलचे शिक्षण एक वर्ष बाकी होते. त्यामुळे त्यांना नेहमीच काळजी वाटायची. कारण मी चळवळीमधील एक कार्यकर्ती होते आणि चळवळीतील बरीचशी माणसे ही चळवळीमुळे आपले शिक्षण अर्धवट सोडत असतात. त्यामुळेच ते मी भेटले की, एकच प्रश्न नेहमी मला विचारीत असत की, तू अभ्यास चालू ठेवला आहेस की नाही, अभ्यास पूर्ण केला आहेस की नाही ? त्यांच्या अशा देखरेखालीच माझे आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण झाले, मला त्यातील पदवी प्राप्त झाली. त्यानंतर मी दहा वर्षे प्रॅक्टीस केली. लिखाण सुरु केले. सामाजिक राजकीय चळवळीमध्ये काम केले. त्यांच्या स्वभावाचे वैशिष्टय सांगावयाचे तर मी आपल्याला सांगेन की, त्यांचा स्वभाव हा अत्यंत मनस्वी असा होता. त्याचबरोबर ते अत्यंत प्रेमळ स्वभावाचेही होते. शिवाय ते स्वत:चे व्यक्तीस्वातंत्र्य जसे जपत होते तसेच, ते घरातील सुना, मुले यांनाही स्वत:ची मते असू शकतात, हे मान्य करणारे होते आणि त्या पध्दतीने प्रत्येकाने आपले जीवन जगावे ही समज त्यांच्यात मुळापासून होती आणि त्या पध्दतीने त्यांचे आर्शीवाद कायम आमच्या सोबत होते. लहान मुलांमध्ये मूल होणारे, त्याच बरोबर समीक्षा आणि जीवनाच्या अनेक कला, त्यामध्ये मग तबला वाजविणे असेल, संगीत आहे, समीक्षा, या सगळयांमध्ये त्यांचा अतिशय गाढा अभ्यास होता. माझ्या सासूबाई श्रीमती सुमाताई करंदीकर यांचे गेल्या वर्षीच निधन झाले आणि दोघांचीही सह जीवनाची साथ दीर्घकाळ होती ती खंडित झाली. त्यामुळे त्यानंतर भाऊ थोडे अबोल झाले होते. ते फारसे बोलत नसत. त्यांना कोणी काही विचारले तर जास्त काही बोलायचे नाहीत. मनामध्ये अशी काळजी वाटत होती की, सुमाताईंच्या शिवाय आता पुढील काळात ते स्वत:च्या स्वत: प्रवास कसे काय करतील, करतील ? तसे पाहिले तर त्या दोघांचेही पराकोटीचे अगदी साधे राहणीमान होते. विंदानी जी अनेक पुस्तके लिहिली त्यातील ठराविक पुस्तकांची नावे पुन्हा पुन्हा नेहमीच आपल्यासमोर येत असतात. स्वाभाविक आहे, कारण ती सारीच पुस्तके लोकप्रिय आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

परंतु त्यांना ज्या पुस्तकासाठी " ज्ञानपीठ पुरस्कार " मिळाला ते पुस्तक म्हणजे " अष्ट दर्शन " हा त्यांचा काव्यसंग्रह आहे. त्याचबरोबर " परंपरा आणि नवता " हे त्यांचे आणखी एक पुस्तक, तसेच " स्पर्शाची पालवी ", " अमृतानुभव " ही अशी काही पुस्तके आहेत की, ज्याचा आता सन्मानीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी उल्लेख केला की, त्यात विज्ञान, अध्यात्म, संस्कृति, आधुनिक विचार याचा अतिशय चांगल्या पध्दतीने सर्जनशील अविष्कार विंदांच्या साहित्यातून झालेला होता. सभापती महोदय, एक साधारण अशी समजूत असते की, काव्य म्हटले की, फुले, चंद्र, प्रेम या पुरतेच काव्य असतं, परंतु अगदी श्रमिक, वेगवेगळया पध्दतीचे मजूर, स्त्री - पुरुषांच्या जीवनात येणारे संघर्ष, स्त्रीला पडणारे कष्ट मग ती स्त्री कुटुंबातील असे वा समाजातील कोणत्याही थरातील असेल, याचीही अतिशय चांगल्या प्रकारची जाणीव त्यांना होती आणि ती त्यांच्या साहित्यातून दिसून येत होती. त्यांनी विद्याभ्यासाचा संस्कार केला. आज मराठी साहित्य संमेलनामध्ये त्यांचे कविता वाचन होऊ शकत नाही. याबद्दल मलाही वाईट वाटते आहे. परंतु थोडीशी खंत वाटते, मला यात कोठलेही राजकारण आणायचे नाही पण असेही वाटे की, साहित्य संमेलन माणिकचंद कुटखा कंपनीकडून प्रायोजित करुन विंदांचे काव्यसंमेलन झाले असते तर ते विंदानाही खरोखरी अजिबात आवडले नसते. म्हणून अनेक साहित्य संमेलनापासून काही कारणांनी का होईना पण ते अध्यक्ष पदासाठी निवडणुकीला उभे राहिले नाहीत, तसेच कोठल्याही राजकारणात त्यांनी भाग घेतला नाही. पण एका अर्थाने मला तरी असे वाटते की, साहित्य संमेलनाला त्यांनी एका वेगळया प्रकारचा चकवाच दिला आणि साहित्य संमेलनाच्या अगोदर त्यांचे प्रस्थान झाले. या सगळया त्यांच्य वाटचालीमध्ये त्यांना जे पुरस्कार मिळाले ते अनेक सामाजिक संघटनांना, कार्यांना दिले. विशेषत: विकास आमटे, त्याच बरोबर त्यांचे पिता बाबा आमटे, साधनाताई आमटे यांच्याशी देखील त्यांचा चांगल्या प्रकारचा स्नेह होता. तसेच " जाणीव " सारख्या विजाया लवाटे यांच्या संसथेला, कामाला त्यांनी त्यांचे पुरस्कार भेट दिले की, ज्या ठिकाणी एचआयव्ही पॉझिटिव्ह मुलांसाठी म्हणून काम चालते. मला आणखी एक उल्लेख येथे करावासा वाटतो की, अंध मुलांना शिकविण्याचे काम भाऊ आणि सुमाताई करायचे. त्यातील अनेक अंध मुले त्या दिवशी त्यांच्या अंत्य दर्शनाला आली होती. त्या संदर्भात मला असे वाटते

....3

सुंबरे श्री.गायकवाड नंतर..... 3.00

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

की, माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या वेळेस जाहीर केले की, शासकीय इतमामामध्ये आम्ही विंदांचा अंत्यसंस्कार करणार आहोत. त्यावेळेस खरे तर प्रशासनाला देखील प्रश्न पडला की, देहदान करणा-या माणसावल शासकीय इतमामामध्ये अंत्यसंस्कार कसे करायचे त्यामुळे काही काळ समजावण्यात आणि समजून घेण्यात गेला. जो देह त्यांनी दान केलेला आहे, त्यांनी नेत्रदान केले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नेत्रदान झाले त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले की, त्यांचे नेत्र चांगल्या अवस्थेत होते आणि त्यामुळे एका माणसाला निश्चितपणे नवी दृष्टी मिळणार आहे. तसेच त्यांनी देहदान केले त्यातून देखील शासकीय इतमामामध्ये अंत्यसंस्कार होत असतांना संवेदनशीलतेने सरकारने ही गोष्ट हाताळली त्याबद्दल मला खरोखर सरकारचे आभार मानावेसे वाटतात. भाऊ तर त्याच्या खूप पलिकडे पोहोचलेले होते. पण त्याच बरोबर पश्चिम बंगारमध्ये ज्योतिबसूं सारख नेता की ज्याने देहदान केले आणि शासकीय इतमामामध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.....

(यानंतर श्री.सरफरे...एम 1.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

अशाप्रकारे बऱ्याचशा गोष्टी त्यामधून बोलक्या होतात. आपल्या आयुष्यामध्ये भाऊंनी कधीही कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा ठेवली नाही. परंतु पद्मभूषण, पद्मविभूषण अशा पुरस्कारांसाठी शासनाने त्यांचा विचार करावयास हवा होता. हे मी त्यांची सून म्हणून नव्हेतर महाराष्ट्राची एक कन्या म्हणून याठिकाणी सांगू इच्छिते. या साहित्यिकांच्या बाबतीत आपल्या मनामध्ये किती संवेदनशीलता आहे, हे आपण आपला चश्मा बाजूला काढून जरुर बघावे. त्यांच्या कवितेतील परी जी खऱ्या अर्थाने एक अंध विद्यार्थीनी आहे, ती आता मोठी झालेली आहे. तिला नेत्रसुख नसतांना सुध्दा भाऊंच्या अंत्यसंस्काराच्या दिवशी त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आली होती. अशाप्रकारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. "देणा-याने देत जावे" ही त्यांची कविता खूप सुंदर आहे. दुसऱ्याकडील सर्व काही आपण ओरबाडून घेऊ नये अशाप्रकारचे संस्कार या विधीमंडळामध्ये झाले तरी खूप मोठी गोष्ट होईल असे मला वाटते. मी यानिमित्ताने कै. विंदा करंदीकरांना याठिकाणी श्रध्दांजली अपर्ण करते.

कै. दादा सरपोतदार हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व होते. त्यांचे जसे समोर लक्ष असायचे, तसे मागेसुध्दा लक्ष असायचे. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व मी आपसामध्ये कुजबुजत राहिलो तरी ते मागे वळून बघून आमच्यावर रागवायचे. त्यांनी मागे वळून बघण्यापूर्वीच आम्ही गप्प रहात होतो.

कामगार चळवळीप्रमाणे महिलांच्या प्रश्नाबाबत, त्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाबाबत त्यांची नेहमी तेजस्वी अशाप्रकारची भूमिका असायची. ज्यावेळी पश्चिम महाराष्ट्र महिला विभागाच्या संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली त्यावेळी या संदर्भातील घ्यावयाच्या मुलाखती कोणत्या नेत्याबरोबर घ्यावयाच्या आहेत? असे माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी मला विचारले. त्यावेळी कै. दादा सरपोतदार हे व्यक्तिमत्व माझ्यासमोर होते. अशा व्यक्तिमत्वासोबत स्त्रियांना निर्भयपणे काम करणे शक्य होत असे हे मला याठिकाणी मुद्दाम नमूद करावेसे वाटते. या निमित्त कै. विंदा करंदीकर व कै. दादा सरपोतदार यांच्यापुढे मी नतमस्तक होते.

धन्यवाद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी कै. विंदा करंदीकर व कै. मधुकरराव रघुनाथ सरपोतदार यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांच्या बाबतीत एक गोष्ट सांगितली पाहिजे की, "मुक्त झालो मी माझ्यातून" हे काव्य त्यांनी लिहिले होते. ज्यावेळी ते स्वत:मधून मुक्त झाले त्यावेळी देहदान करण्यासाठी त्यांची गाडी जे.जे. हॉस्पिटलकडे चालली होती, यानिमित्ताने त्यांनी एक वेगळा आदर्श याठिकाणी घालून दिला. याठिकाणी असे सांगण्यात आले की, साहित्यामधून मिळणारे मानधन ते कधीही स्वत:साठी वापरीत नव्हते, ते मानधन इतरांसाठी देत होते. "स्वत:साठी जगला तो मेला, दुसऱ्यांसाठी जो जगला तो खऱ्या अर्थाने जगला" हे विंदानी कृतीमधून दाखवून दिले. आणि म्हणून मराठी साहित्य विश्वाला तिसरे ज्ञानपीठ मिळवून देणारा असा महान कवी वयाच्या 91 व्या वर्षी आपल्यातून निघून गेला.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आमचे सन्माननीय नेते कै. मधुकरराव सरपोतदार शिवसेनेच्या स्थापनेपासून माननीय शिवसेनाप्रमुखांच्या खांद्याला खांदा लावून शिवसेना मोठी करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. शेवटपर्यंत भगवा झेंडयाचा शिपाई व शिवसेनेचा मावळा म्हणून त्यांनी काम केले हे सांगण्यासाठी मी उभा आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 1975 ते 1985 पर्यंत दहा वर्षे ते महाराष्ट्र श्रमिक सेनेचे अध्यक्ष होते. त्यांच्याजवळील काही कंपन्यांमधील कामगार संघटना मी संभाळीत होतो. त्यामध्ये कांदिवली येथील बॉम्बे ड्रग्ज कंपनी असू दे, मालाडची पटेल ॲल्युमिनियम कंपनी असू दे, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी असू दे, ओटीस कंपनी असू दे अशा अनेक कंपन्यांमधील कामगार संघटना संभाळण्याची जबाबदारी त्यांनी माझ्याकडे सोपविली होती. तितक्याच समर्थपणे या कंपन्यामधील कामगार संघटना मी संभाळीत होतो. त्यांच्यामुळेच कामगार क्षेत्रातील थोडाबहुत अनुभव मला मिळाला आहे, याच्या पाठिमागे त्यांचेच आशीर्वाद आहेत असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, यानिमित्ताने मला आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते की, शिवसेनेचे फार मोठे नेते म्हणून आम्ही त्यांच्याकडे पहात होतो. 1985 मध्ये शाखाप्रमुखांच्या नियुक्त्या व्हावयाच्या होत्या, माननीय शिवसेनाप्रमुखांनी शिवसेना नेत्यांवर शाखाप्रमुखांची नियुक्ती करण्याची जबाबदारी सोपविली होती. त्यावेळी कै. दादा सरपोतदार यांनी शिवसेनेचा शाखाप्रमुख म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरफरे)

श्री. रामदास कदम...

माझी नियुक्ती केली. अशाप्रकारे शिवसेनेचा ज्येष्ठ महान नेता, कामगार क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेला कामगार नेता, कामगारांना सतत न्याय देत राहणारा कामगार नेता, शिवसेनाप्रमुखांच्या पाठिशी सतत ठामपणे, खंबीरपणे उभा राहणारा आमचा हा कामगार नेता आमच्यातून निघून गेला. यानिमित्ताने मी कै. विंदा करंदीकर व कै. दादा सरपोतदार या दोघांनाही माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या वतीने, शिवसेना पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार यांच्या बाबतीत सांगावयाचे तर एक समर्पित जीवन जगलेला, रस्त्यावरच्या राजकारणापासून संसदेतील पटलापर्यंत आपला ठसा उमटविणारा एक मोठी दृष्टी असलेल्या नेत्याचे निधन झालेले आहे, त्या बद्दल मी शोक प्रकट करतो.

ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर यांच्या बाबतीत सांगावयाचे तर मराठी भाषेला आतापर्यंत तीन ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आहेत. पहिला पुरस्कार कै.वि.स.खांडेकर यांना मिळाला, दुसरा पुरस्कार कै.वि.वा.शिरवाडकर यांना मिळाला असून तिसरा पुरस्कार कै.विंदा करंदीकर यांना मिळाला आहे. तिघांच्याही नावामध्ये "व्ही" आहे. वि.स.खांडेकर यांना पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यानंतर वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा "विशाखा" हा पहिला कविता संग्रह हा वि.स.खांडेकर यांनी प्रकाशित केला होता आणि वि.वा.शिरवाडकर यांनी स्थापन केलेल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा "जनस्थान" पुरस्कार वि.वा.शिरवाडकर यांनी विंदा करंदीकर यांना दिला होता असे एक सत्र आपण गेली काही दशके आपल्या राज्यामध्ये, आपल्या मराठी भाषेमध्ये अनुभवलेले आहे. तसेच तीन विभिन्न प्रकारे कविता करणारे विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगांवकर एकत्रितपणे कविता सादर करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोचले. या तिघांचे स्वभाव कसे वेगळे होते हे सर्वांना सर्वश्रृत आहे. मघाशी 51 रुपयांच्या मानधनाच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. जर कोणी त्यापेक्षा कमी मानधन दिले तर विंदा करंदीकर त्याठिकाणी कधीच जाण्यास तयार नसत. हा कोकणी माणूस त्याबाबतीत घासाधीस करावयास कधीही मागेपुढे पहात नसे. पण त्यांना मिळालेले कोणतेही मानधन,पुरस्कार किंवा पुरस्काराची रक्कम त्यांनी आयुष्यभरामध्ये एकदा सुध्दा स्वत:च्या खिशामध्ये कधीही ठेवली नाही. सामाजिक विषम व्यवस्थेच्या विरोधात, अन्यायाच्या विरोधात साम्यवादी विचाराने ओतप्रोत नहालेले असे विंदा करंदीकर यांचे व्यक्तिमत्व होते. सर्वसाधारणपणे कवी म्हटल्यानंतर कुठल्यातरी स्वप्नांच्या जगामध्ये, वास्तवाच्या पलिकडे कल्पनेच्या अविष्काराने तो वेगळाच कोणीतरी असावा असे आपल्याला वाटते. पण विंदा करंदीकर यांचे पाय जमिनीवर घट्ट रोवलेले होते. येथील मातीचे आणि माणसांचे जे दु:ख आहे, त्या मध्ये ते सहभागी होऊन जगत असत. मान-सन्मान, पुरस्कार

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

मिळविणे हे या कोकणातील माणसाला कधी जमलेच नाही. अंतर्बाह्य पारदर्शक व्यक्तिमत्व, संवादासाठी सदैव आसुलेले, कोणाचीही भीड सहज मोडण्याचे कौशल्य त्यांच्यापाशी होते. साहित्याच्या निर्मितीनंतर त्याला जे स्थान प्राप्त होते, त्याला पुरस्कार मिळातात, जो सत्कार केला जातो त्यानंतर त्याची अधिकाधिक निर्मिती करण्याकडे प्रवृत्ती होऊ लागते. परंतु विंदा करंदीकर यांच्यासारखे थोडेच जण असतात की जे आपल्या साहित्य निर्मितीबद्दल स्वत: सुध्दा केव्हातरी शंका उपस्थित करु शकतात आणि मग ठरवितात की, आपण आता काही काळ लिहावयाचे थांबविले तरी हरकत नाही आणि हा "थांबा" असतो, तो विचारांसाठी महत्त्वाचा असतो.ते साम्यवादी विचारसरणीची कास धरलेले, त्याचबरोबर शेक्सपिअरच्या "किंग लिअर"च्या प्रेमात पडलेले आणि तुकोबाच्या माळेवरही प्रेम करणारे होते. कुसुमाग्रज यांना एकदा अचानक प्रश्न विचारला होता की, ईश्वर आहे की नाही याबद्दल तुमचे काय मत आहे ? हा अवघड प्रश्न होता. त्यावेळी कुसुमाग्रज यांनी ज्ञानेश्वरीचे दाखले दिले आणि संत ज्ञानेश्वरांनी ईश्वराचे रुप कसे मांडलेले आहे ते सांगितले. त्यामुळे मग त्यांना सहाजिकच पुढचा प्रश्न विचारला की, तुम्ही ईश्वर आहे याबद्दल ठाम आहात काय ? त्यावर कुसुमाग्रज यांनी उत्तर दिले की, शेवटी ज्ञानेश्वर सुध्दा कवीच होता. इतकी कवीची महती मोठी असते. लहान मुलांपासून अतिशय तत्वज्ञानी विचारांपर्यंत पोहोचलेल्या कविता, किंग लिअर या ग्रथांचे भाषांतर आणि त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार ज्या कृतीमुळे मिळालेला आहे ती म्हणजे "अष्टदर्शने" हा कविता संग्रह होय. असा हा फकीरी वृतीने मस्त जगलेला अवलिया पुरुष होता. या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण विंदा करंदीकर यांना मुकलो आहोत. खरे म्हणजे सदनामध्ये होणारे शोक प्रस्ताव, त्यातील औपचारिकता, त्याबाबत भावना व्यक्त करणे या पलिकडेही या मातीची, या महाराष्ट्रातील माणसांची जी दु:ख आहेत, वेदना आहेत अशा या साहित्याच्या पलिकडील गोष्टी देखील त्यांच्या व्यक्तिमत्वातून कायम प्रदर्शित झाल्या होत्या.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

किमान या सुवर्णमहोत्सवी वर्षात वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर आणि विंदा करंदीकर या इ ानपीठ त्रयींचे समग्र साहित्य एकत्रितरीत्या ग्रंथरुपात महाराष्ट्र शासनाला निर्माण करता येऊ शकेल. एखाद्या रस्त्याला, उद्यानाला, वास्तूला विंदा करंदीकरांचे नाव देता येऊ शकेल तसेच आपण माय मराठी आणि त्यांच्या सामाजिक समतेच्या अविष्काराचे चिरंतन स्मरण होण्यासाठी एखाद्या लोकजागर अभियानाला त्यांचे नाव देऊन ती योजना महाराष्ट्र शासन हाती घेऊ शकेल. याबद्दल शासनाने विचार करावा अशी माझी सभागृहामार्फत शासनाला विनंती आहे. "घेणाऱ्याने घेत जावे ... एके दिवशी घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावे" पण काय घ्यावे हे सांगताना गाडी घ्यावी, मोटार घ्यावी, बंगला घ्यावा असे नाही तर सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार म्हणाले त्याप्रमाणे मागताना सुध्दा भीमेकडून तुकोबाची माळ मागावी. ऐहिक गोष्टीपेक्षा चिरंतन राहणाऱ्या, काही मूल्य सागणाऱ्या, तत्व देणाऱ्या गोष्टी मागाव्यात म्हणजे देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही एक वेगळा आनंद मिळतो. अशा या महाकवीच्या निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने शोक प्रकट करुन माझे दोन शब्द थांबवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांनी आज ज्या दोन दिग्गजांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव सादर केलेला आहे हे दोन्ही दिग्गज माझ्या शेजारी राहात होते. विंदा करंदीकर ज्या ठिकाणी राहात होते त्या साहित्य सहवासला लागून माझी शाळा होती. शाळेतील कविता वाचल्यानंतर त्या कवींना बघण्याची जी ओढ त्या वयात होती त्यावेळेला श्री. य.दि.फडके यांचे चिरंजीव अनिरुध्द हे मला दाखवत होते की, हे विंदा करंदीकर, हे मंगेश पाडगावकर, हे य. दि. फडके, हे ना. सि. फडके. असे वेगवेगळे थोर व्यक्तिमत्व ज्या साहित्य सहवासमध्ये राहात होते तेथेच बाजूला मी शिकत असल्यामुळे लहानपणापासून या सर्वांचा माझ्यावर जबरदस्त प्रभाव होता. आज ते विंदा आपल्यात नाहीत. सभागृहाने त्यांच्याबद्दल ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सगळ्या भावनांशी मी देखील सहमत आहे.

सभापती महोदय, राजकारणात ज्यांचे बोट धरुन माझ्या आयुष्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली त्या दादासाहेब सरपोतदार यांच्या निधनाबद्दल या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. माझ या आयुष्यावर दादांचा जबरदस्त प्रभाव होता. शालेय जीवनापासून मी त्यांच्याबरोबर काम करीत होतो, त्यांच्याकडे जात होतो. त्यांच्या प्रत्येक हालचालीतून त्यांच्या प्रत्येक बोलण्यातून, प्रत्येक कृतीतून मी प्रत्येक वेळी नवीन काही तरी शिकत होतो. असा एक जबरदस्त नेता, शिवसेनाप्रमुखांना आपला सेनापती समजणारा आणि सेनापतींनी एकदा कोठलाही आदेश दिला की तो तंतोतंत पाळलाच गेला पाहिजे आणि त्यांचा शब्द खरा करण्यासाठी पडेल ती किंमत देऊन ते करण्याचा सातत्याने त्यांचा प्रयत्न असे. माझे कॉलेजचे शिक्षण चालू असताना एकदा त्यांनी मला विचारले की, तू नेमके काय करावयाचे ठरविले आहे ? मी त्यांना सांगितले की, मला आपल्याबरोबर काम करावयाचे आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझ्याबरोबर काम करावयाचे असेल तर ती काही सोपी गोष्ट नाही. प्रचंड कष्ट करावे लागतील आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे हाताला घड्याळ बांधून यावयाचे नाही. कारण माझ्याबरोबर काम करावयाचे असेल तर घरी कधी जायला मिळेल याची कधी वाट बघावयाची नाही. प्रचंड मेहनत करावी लागेल, शिक्षण पूर्ण करावे लागेल. कारण जो शिकतो त्याच्या विचाराची दिशा बदलते असे त्यांचे नेहमीचे वाक्य

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

असावयाचे. म्हणून माझे शिक्षण पूर्ण करावे यासाठी मी कशा पध्दतीने अभ्यास करतो, काय करतो याकडे त्यांचे जबरदस्त लक्ष असावयाचे. कामगार क्षेत्रात 20 वर्षे त्यांच्याबरोबर काम करीत असताना मी त्यांचे वेगवेगळे पैलू बघितले. ज्यावेळेला ते जॉन्सल टाईल्समध्ये कॉर्पोरेट जनरल मॅनेजर म्हणून काम करीत होते त्यावेळेला व्यवस्थापनाची बाजू कशा पध्दतीने मांडावयाची हे देखील मी बघितले. परंतु ज्या दिवशी बाळासाहेबांनी त्यांना आदेश दिला की, आता आपण कामगार क्षेत्रामध्ये कामगार नेते म्हणून काम करा, कामगारांच्या युनियनचे अध्यक्षपद स्वीकारा त्यावेळी सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या कंपनीमध्ये त्यांनी कॉर्पोरेट जनरल मॅनेजर म्हणून काम केले त्याच कंपनीची सगळ्यात पहिली युनियन, त्याच कंपनीचे सगळे कामगार सगळ्यात पहिल्यांदा कामगार नेता म्हणून त्यांच्याकडे आले. एक जबरदस्त विश्वास, जबरदस्त ध्येय, जबरदस्त ध्यास असे सगळे मिश्रण असलेल्या नेत्याबरोबर मला गेली कित्येक वर्षे काम करण्याची संधी मिळाली

यानंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

आज ख-या अर्थाने आम्ही पोरके झालो आहोत. कारण शेवटच्या दिवसापर्यंत ते मला सांगत होते की, अनिल, काम करीत असताना मरण आले पाहिजे. जर मरण यायचे असेल तर ते अशा पध्दतीने यावयास पाहिजे की, त्याचा त्रास आपल्याला होता कामा नये आणि दुस-याला देखील होता कामा नये. त्यांच्या शेवटच्या कार्यक्रमामध्ये मी तसेच या सभागृहाचे माजी सदस्य व विद्यमान विधानसभा सदस्य श्री.प्रकाश शेंडगे हे देखील उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी श्री.शेंडगे यांची तुम्ही विधानसभेची निवडणूक कशाप्रकारे जिंकली याबाबत आस्थेने चौकशी केली होती. त्यांचा जिव्हाळा मी पाहिला होता. अतिशय निर्भीड, शिवसेनाप्रमुखांना मानणारे ते नेते होते. हयातीमध्ये त्यांच्या जीवावर बेतणारे कित्येक प्रसंग आले होते. कामगार क्षेत्रामध्ये किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असताना ते कधीच डगमगले नाहीत. कामगार क्षेत्रामध्ये काम करीत असताना दिनांक 11.10.1988 रोजी 'इंडियन टूल्स' या कंपनीत त्यांच्यावर हल्ला झाला. त्याठिकाणी त्यांच्या विरोधातील कामगार होते. त्या कामगारांनी त्यांना चारही बाजूने घेराव घालून त्यांना असे म्हटले होते की, तुम्ही आम्हाला एका कागदावर लिहून द्यावे की, मी या कंपनीमध्ये पुन्हा कधी येणार नाही. अन्यथा, आम्ही तुम्हाला जीवानीशी मारुन टाकू. मी त्या घटनेचा साक्षीदार आहे. परंतु त्यावेळी दादांनी त्यांना असे म्हटले होते की, माझा मुडदा जरी येथून बाहेर गेला तरी मी तुमच्या कोणत्याही धमकीला भीक घालणार नाही, मी लिहून देणार नाही. त्यानंतर त्यांच्यावर त्या कंपनीत जबरदस्त हल्ला झाला. त्यामुळे ते 15 दिवस हॉस्पिटलमध्ये होते. मी देखील त्यांच्याबरोबर होतो. ते कधीही कोणालाही घाबरले नाहीत किंवा कोणाच्याही दबावाला बळी पडून त्यांनी कोणतीही कृती केली नाही.

सभापती महोदय, 1984 साली त्यांना एनएसए खाली अटक करण्यात आली होती. त्यावेळी श्री.रिबेरो हे मुंबई पोलीस आयुक्त होते. श्री.रिबेरो यांनी दादांना असे म्हटले होते की, तुमच्यामुळे या भागामध्ये दंगल पसरत असल्याने तुम्हाला अटक करीत आहोत. त्यांना अटक झाली त्यावेळी श्री.रिबेरो यांच्याकडे सगळयात पहिले शिष्टमंडळ मुस्लीम संघटनांचे गेले होते. त्यांनी त्यांना असे म्हटले होते की, साहेब, तुमचा दादांविषयी चुकीचा समज झालेला आहे. हे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

जर बाहेर असतील तर या विभागातील दंगल शांत होईल, दंगल शमू शकते. त्यामुळे तुम्ही त्यांना ताबडतोब सोडून द्यावे. दादा पोलिसांना कधीच घाबरले नाहीत. पोलिसांबरोबरचे त्यांचे संघर्ष मी कित्येक वेळा बघितले आहेत. ते मला नेहमी एकच गोष्ट सांगत असत की, अनिल, पोलिसांशी जर संघर्ष करावयाचा असेल तर स्वत:चे चारित्र्य अतिशय स्वच्छ ठेवले पाहिजे. पोलिसांनी आपल्याला कोणत्याही गोष्टीसाठी अडकविता कामा नये तरच आपण पोलिसांसमोर ताठ मानेने उभे राहून संघर्ष करु शकतो. अशी जबरदस्त हिंमत त्यांच्यात होती. 1992-93 मध्ये ज्यावेळी त्यांना पुन्हा अटक झाली त्यावेळचे किस्से सुध्दा सांगण्यासारखे आहेत. ते प्रत्येक गोष्ट नियमाच्या आधारे करीत असत. जेलमध्ये त्यांना नेल्यावर ते प्रथम जेलचे मॅन्यूअल मागवून घ्यायचे. कैद्यांना जेलमध्ये कसे ठेवले पाहिजे याचा ते अभ्यास करायचे. नाशिकच्या जेलमधून त्यांना ठाण्याच्या जेलमध्ये नेल्यावर पोटाचा विकार जडला आहे असे मला कळले होते. त्यामुळे मी त्यांच्यासाठी पाण्याच्या बाटल्या घेऊन गेलो होतो. मी त्यांना सांगितले की, दादा, तुम्हाला जेलचे पाणी चालणार नाही. म्हणून मी बिसलेरीच्या बाटल्या आणलेल्या आहेत. त्यावेळी ते माझ्यावर जबरदस्त चिडले. मला म्हणाले की, मी येथे कैदी म्हणून आलेलो आहे, मी कैदी म्हणूनच राहणार आहे. बाकीच्या कैद्यांना जशी वागणूक मिळते तशीच वागणूक मला देखील मिळाली पाहिजे. माझ्यात आणि बाकीच्या कैद्यात कोणत्याही प्रकारचा फरक होता कामा नये. अशाप्रकारे अतिशय वाईट परिस्थिती असताना देखील त्यांनी नियमाला बगल दिली नाही. सभागृहात एकदा आल्यानंतर ते सभागृह स्थगित होईपर्यंत बसत असत. मी ज्यावेळी आमदार झालो त्यावेळी त्यांना अतिशय आनंद झाला, आपला एक विद्यार्थी आपल्याबरोबर या सभागृहात आल्याचा त्यांना मनोमन आनंद झाला होता. सभागृहाच्या नियमांबाबत ते किती जागरुक होते याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. त्यांच्या शिस्तबध्द कार्यपध्दतीचा आमच्या जीवनावर, आयुष्यावर कायमचा प्रभाव आहे. अशा सर्व गोष्टी निरंतर जोपासून त्यांची ध्येय धोरणे पूर्ण करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी येथेच थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी दोन विभुतींच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विंदांच्या बाबतीत मी काही बोलावे इतका मी मोठा नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मराठी साहित्याचा महामेरु, मराठी वाङमयाचे मोठे शिखर, अतिशय कमी लोकांना ज्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले त्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविलेली मोठी विभूती म्हणजे विंदा करंदीकर. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याच्या शिरपेचातील एक मौल्यवार हिरा निखळून पडला असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. मी माझ्या आणि माझ्या कुटुंबियांतर्फे, तसेच माझ्या पक्षातर्फे आणि माझ्या संघटनेतर्फे त्यांना आदरांजली वाहतो.

कै. मधुकर सरपोतदार उर्फ दादा यांच्या संबंधात मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो तो असा की, कष्टक-यांच्या चळवळीमध्ये जनसामान्यांच्या परिस्थितीचे, वास्तवतेचे भान असलेले देशामध्ये जे काही फार कमी नेते आहेत त्यांच्यामध्ये आदरणीय मधुकर सरपोतदार उर्फ दादांचा सर्वात वरचा नंबर लागतो अशा माझ्या भावना आहेत. मला या ठिकाणी एका प्रसंगाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. खरे तर कामगार चळवळीमध्ये आम्ही नेहमीच एकमेकांच्या विरोधात उभे राहिलो. पण कामगार क्षेत्रामध्ये अनावधानाने एक गोष्ट पाळली जाते. वस्तुस्थिती स्वीकारली जात नाही, ती नाकारण्याचीच जास्तीत जास्त प्रवृत्ती असते. पण या माझ्या कामगारांच्या कैवा-याच्या बाबतीत असे कधी घडले नाही. ज्या जॉन्सन टाईल्सचा उल्लेख येथे झाला त्या कंपनीमध्ये त्यांनी पर्सनल मॅनेजर म्हणून आपली कारकीर्द सुरु केली आणि जॉन्सन टाईल्सच्या कामगारांचे नेतृत्व करुन कामगार क्षेत्रामध्ये कामगारांचे प्रतिनिधीत्व करायला सुरुवात केली. 1995-96च्या काळामध्ये जॉन्सन टाईल्सचे कामगार माझ्याकडे आले. त्यावेळी राज्यावर युतीचे सरकार होते आणि श्री. साबीर शेख हे त्यावेळी कामगार मंत्री होते. त्यांनी कामगारांच्या सांगण्यावरुन बैठक लावली. त्या बैठकीला दादा आणि मी उपस्थित होतो. त्या बैठकीचा सूर वेगळा होता. त्यातील राजकीय अभिनिवेश मी बाजूला ठेवतो. त्यावेळी त्या बैठकीमध्ये दादांनी कामगारांना एकच प्रश्न विचारला की, तुम्हाला माझे नेतृत्व हवे की नको ? त्यावेळी कामगारांनी सांगितले की, आम्ही भाई जगताप यांचे नवीन नेतृत्व आणलेले आहे. खरे म्हणजे त्यावेळी कामगार मंत्र्यांनी रदबदली करण्यासाठी बैठक बोलावलेली होती. दादांनी कामगार मंत्र्यांना स्पष्टपणे सांगितले की या प्रश्नामध्ये कसल्याही प्रकारची रदबदली नको, कामगार माझ्या बरोबर नाहीत, ते भाई जगताप यांच्या बरोबर आहेत त्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व भाई जगताप हेच करतील. असे वास्तवाचे भान असेलेली फार कमी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

माणसे या कष्टक-यांच्या चळवळीमध्ये अनावधानाने पहायला मिळतात.सभापती महोदय, जेव्हा या ठिकाणी हा शोक प्रस्ताव मांडला गेला त्यावेळी मी मुद्दाम आपल्याला चिठ्ठी पाठवून माझ्या भावना व्यक्त करण्याची परवानगी मागितली. कारण अशा विभूतीच्या बाबतीत मी राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून माझ्या भावना व्यक्त केल्या नाही तर मी माझ्या कर्तव्यामध्ये कसूर केल्यासारखे होईल. दादांना आदरांजली वाहताना मी इतकेच सांगेन की, दादांनी या कामगार चळवळीमध्ये काम करण्याचा जो आदर्श वारसा ठेवलेला आहे त्याचे जतन करण्याचे काम कामगार क्षेत्रातील आमच्या सारख्या कार्यकर्त्यांवर येणार आहे. तो वारसा जपण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु. मी माझ्या कष्टकरी समाजा तर्फे, कष्टकरी कामगार चळवळी तर्फे, माझ्या पक्षा तर्फे आणि माझ्या कुटुंबिया तर्फे या दोन्ही विभूतींना श्रध्दांजली अर्पण करतो.

नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सदनाचे नेते, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री यांनी सदनामध्ये जो दिग्गजांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला त्यावर मी माझ्या भावना याठिकाणी व्यक्त करीत आहे.

विंदा करंदीकर हे खऱ्या अर्थाने देशाला अभिमान वाटावा अशा पध्दतीचे मराठी व्यक्तिमत्व यादृष्टीने त्यांच्याकडे पाहणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. एक महान कवी, एक महान साहित्यिक आणि आयुष्यामध्ये अत्यंत परखडपणे डाव्या विचारसरणीच्या माध्यमातून गोरगरीब सामान्य समाज हा केंद्रबिंदू मानून त्यांनी साहित्याची सेवा केली आणि त्या अनुषंगाने समाजाला अनेक पध्दतीची दिशा दिली. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि त्यामध्ये कारावासही भोगला. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्यावर गांधीजींचाही प्रभाव होता आणि त्याच पध्दतीने डाव्या विचारसरणीच्या अनुषंगाने त्यांनी एकंदरीत आपल्या जीवनाची सुरुवात केली होती. एक शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली आणि नंतरच्या काळामध्ये मुंबईमधील रुईया आणि ई.एस.आय.एस.या नामांकित महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचेही काम केले. विंदा करंदीकर यांनी बाल कविताही केल्या. त्या खूप गाजल्या. "राणीचा बाग", "एकदा काय झाले", "सशाचे कान", "बागुलबोवा", "परी ग परी", "सर्कसवाला" अशा पध्दतीने त्यांनी मुलांच्या अनुषंगाने केलेल्या कविता अतिशय लोकप्रिय ठरल्या. त्यांनी "शेक्सपियरचे राजा लिअर", "ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र", "गोथेचे फाऊस्ट-भाग 1" इत्यांदी ग्रंथांचे अनुवाद केले. सर्वसामान्य माणूस हा विंदांच्या साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू होता आणि आयुष्यामध्ये शेवटपर्यंत त्या केंद्रबिंदूच्या अनुषंगाने त्यांनी आपले विचार, आपला ध्येयवाद लोकांच्या समोर मांडला. त्यांचे कवितासंग्रह "स्वेदगंगा", "मृदगंध", "धृपद", "जातक", "विरुपिका", "अष्टदर्शने" इत्यादी कवितासंग्रह त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. अशा या महान कवीचा अनेक पुरस्काराने गौरवही झाला. "सीनिअर फुलब्राईट पुरस्कार", "सोविएत लँड नेहरु वाड:मय पुरस्कार", "महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार", "कवीराज कुसुमाग्रज पुरस्कार", "कबीर पुरस्कार", "जनस्थान पुरस्कार", भारतीय भाषेतील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांना सन्मानित केले गेले. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल या सभागृहाने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव दिनांक 17 मार्च, 2006 रोजी संमत केला. अशा या महान साहित्यिकाचे, महान कवीचे निधन 14 मार्च, 2010 रोजी झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

या सदनाचे सदस्य, एक अत्यंत परखड ध्येयवादी, संयमी आणि कामगार हा केंद्रबिंदू मानणारे, त्या अनुषंगाने सातत्याने या महाराष्ट्रामध्ये काम करणारे आम्हा सर्वांचे सहकारी मधुकर सरपोतदार यांच्याशी माझा गेली जवळजवळ 15 वर्षांचा परिचय होता. या सदनाचे सदस्य म्हणून ज्या ज्यावेळी या सदनामध्ये ते काम करीत होते तेव्हा त्यांची मर्यादा फक्त शिवसेना अशा पध्दतीची राजकीय मर्यादा होती असे मला कधी वाटले नाही. ज्या ज्या ठिकाणी अन्याय असेल, ज्या ज्या ठिकाणी एखाद्या बाबतीत सर्वसामान्य समाजाला न्याय द्यायची भूमिका असेल त्या त्या ठिकाणी सन्माननीय मधुकर सरपोतदार हे एखाद्या वाघासारखे धावून जाणाऱ्यांपैकी एक व्यक्तिमत्व होते. सदनामध्ये सकाळी आल्यानंतर संध्याकाळी सदनाची बैठक संपेपयंत सातत्याने सभागृहात बसून सदनाचे नियम, पध्दती याबरहुकूम काम करणे, सभापती सुध्दा एखाद्या वेळी एखादी गोष्ट चुकत आहेत असे त्यांना वाटे त्या त्यावेळी अत्यंत मर्यादित शब्दात ते या सदनामध्ये सांगत असत.....

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....
आणि त्यादृष्टीने या सदनात सर्वसाधारणपणे न्याय मिळावा यासाठीच त्यांचे प्रयत्न राहत होते ही वस्तुस्थिती आहे. अनेक वेळा अनेक ठिकाणी सर्वसामान्य समाजाचे प्रश्न, कामगार व कष्टकऱ्यांचे प्रश्न असतील अशा लोकांसाठी त्यांनी सातत्याने राज्यात काम केलेले आहे. शिवसेनेची जडणघडण होत असताना त्यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच त्यांच्या विचाराबरहुकूम सतत काम केले व ते वागले. म्हणून खऱ्या अर्थाने कष्टकरी सामान्य समाज हा त्यांचा केंद्रबिंदू होता अशा लढवय्या नेत्याचा दुर्दैवाने 3 मार्च, 2010 रोजी मृत्यू झाला पण शेवटपर्यंत अत्यंत तडफेचा कार्यकर्ता यादृष्टीने आपले आयुष्य ते जगले आणि असे आयुष्य जगत असताना त्यामध्ये कधीही व कोणत्याही प्रसंगी डगमगले नाही. त्यांचा सभागृहातील एक प्रसंग मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तो म्हणजे मी काही काळ या राज्याचा गृह राज्यमंत्री होतो. त्या काळात साधारणत: सन 1983 च्या दरम्यान कै. सरपोतदार यांना नॅशनल सिक्युरिटी ॲक्टखाली बंदी केले होते. त्यानंतरच्या काळात शासनाने त्यांना मुक्त केले. ज्या दिवशी त्यांना सभागृहाने निरोप दिला त्या दिवशी बोलत असताना त्यांनी सांगितले की, अशा पध्दतीने मी नाशिकला बंदीत होतो तरीही सरकारला मी कधी डगमगलो नाही. अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. कुठल्याही प्रसंगाला न डगमगता तोंड देणे असे कै. सरपोतदार यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. मी त्यांना शिवसैनिक न म्हणता एक विचारी, ध्येयवादी व तत्ववादी तसेच सामान्य माणसाला न्याय देणारा असेच त्यांचे वर्णन करीन. या दोन्हीही दिग्गज नेत्यांना मी अभिवादन करुन श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.38 ते 3.48 पर्यंत स्थगित झाली)

-------- (नंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./ मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) :अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 4- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 1- महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 3-मुंबई न्यायालय-फी (सुधारणा आणि त्या चालू राहणे) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 2 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे. आणि तसे करीत असतांना आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 व 203 (3)मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

उपसभापती : सन 2009-2010 या वर्षाच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणात वितरीत करण्यात येत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी विधेयकांना संमती अधिसंमती

उपसभापती : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधी यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

5) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2009

6) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 8 - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2009

7) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 9 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक ,2009

8) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 11 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2009

5) सन 2009 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 13 - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक ,2009

6) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 18 -मुबई मोटार वाहन कर) (सुधारणा) विधयेक, 2009

7) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 20 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राहयीकरण) विधेयक, 2009

8) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 22 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका व मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2009

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी. : सभापती तालिका नामनिर्देशित करणे

उपसभापती : मी महाराष्ट्र विधान परिषद नियम आठ च्या पोट नियम एक अन्वये खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1) श्री. जयप्रकाश छाजेड
2) श्री. रमेश शेंडगे
3) श्री. चंद्रकांत पाटील
4) ॲड. अनिल परब

सर्व तालिका सभापतींना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी सभागृहात अवश्य उपस्थित रहावे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी. औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या अनेक वर्षापासून विधिमंडळाच्या कामकाजाच्या निमित्ताने आम्ही सर्व सभासद या ठिकाणी येत असतो परंतु आज येथे येत असतांना आम्ही सर्वजण घाबरलेल्या आणि बावरलेल्या मनस्थितीतून या सभागृहात आलेलो आहोत. या सदनात कधी बॉम्ब हल्ला होणार आहे, कधी आतंकवादी घुसणार आहेत,कोण कोठून येणार, कोण कसा हल्ला करणार अशा प्रकारचे आमच्यावर एक नवीन दडपण निर्माण झालेले आहे. या ठिकाणी वेगळी सिक्युरिटी आज आम्ही पाहिलेली आहे. आम्ही पायी चालत आलो तसेच माननीय सभापतीसुध्दा पायी चालत आले आहेत.. परंतु एका एकी एवढी सुरक्षा वाढविण्यासाठी काय घडले आहे ते आम्हाला कळलेले नाही. महाराष्ट्रातील विधान भवनच जर या छायेखाली असेल तर महाराष्ट्रातील जनतेने काय करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. माझी सिक्युरिटी काढली म्हणून सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.रमेश बागवे हे व्यथित आहेत. त्याबाबतीत आपण नंतर बोलू . परंतु आज या सदनाच्या बाहेर खूप सिक्युरिटी ठेवण्यात आलेली आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांची सिक्युरिटी काढून ती या ठिकाणी आणली आहे. या ठिकाणी एवढी सिक्युरिटी ठेवण्यात आलेली आहे की, प्रत्येकजण संशयाने बघत बघत आतमध्ये येत आहे. तेव्हा एवढी सिक्युरिटी का ठेवण्यात आलेली आहे हे कळत नाही. सभापती महोदय, आमदारांवर अविश्वास निर्माण करणारे विधिमंडळातील हे कोणते कामकाज आहे ? आमदारांच्या प्रत्येक गाडीला लावण्यासाठी स्टीकर दिले जाते. आमदारांची गाडी तपासली जाते. त्याबाबतीत आजपर्यंत कोणीही तक्रार केलेली नाही. आमदाराच्या गाडीमध्ये कितीही माणसे बसलेली असली तरी त्यांना खाली उतरविले जाते परंतु त्याबाबतीत कोणीही तक्रार केलेली नाही.

नंतर श्री. सुंबरे

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते.....

महाराष्ट्रातील या विधिमंडळामध्ये येणारे आम्ही या राज्यातील जनतेचे प्रतिनिधी आहोत आणि असे असतानाही आम्ही अशा भीतीच्या छायेखाली येणार असू, या विधान भवनामधील वातावरण भीतीचे झाले असेल तर मग आपली सुरक्षा ठिकाणावर आहे काय हा प्रश्न निर्माण होतो. या विधिमंडळाला संपूर्णत: सुरक्षेच्या आवरणाखाली ठेवायचे किंवा काही धोका होईल असा प्रश्न पडला असेल तर आज येथे त्याबाबत खुलासा झाला पाहिजे. श्री. अबू आझमी हे आता विधान सभेचे सदस्य आहेत आणि त्यांचा दहशतवाद्यांशी जवळचा संबंध आहे अशी बातमी मध्यंतरी वृत्तपत्रातून आमच्या वाचनात आली आहे. तेव्हा असा एखादा सदस्य आपला आतंकवादी सहकारी घेऊन येथे आला वा येईल अशी भीती आपल्याला वाटते आहे का ? त्याचाही खुलासा झाला पाहिजे. नाही तरी गेल्या वेळेस आमदार निवासामध्ये आतंकवादी राहून गेले आणि त्या गोष्टीवर या सदनामध्ये चर्चाही झाली आहे. तेव्हा कोणी कोणाबद्दल काय काय बोलायचे ? या पध्दतीने आम्ही येथे आल्यानंतर पाहतो आहोत की, तुमचे सचिव खाली उतरतात. तुमची सारी व्यवस्था कशी आहे, गाडी आली तरी ती बाहेरच उभी करायचे आणि तेथून चालत यायचे. खरे तर तुम्ही लाखो रुपये खर्च या सुरक्षेसाठी केले आहेत, त्यादृष्टीने अनेक गोष्टी आणल्या आहेत, येथे उभारल्या आहेत. त्यात दोन-तीन मंडप देखील आपण घातले आहेत. त्यावर आपण खर्च केला आहे. आता तुम्हाला ऑडिटमध्ये याबद्दल काही कोणी विचारीत नाही म्हणून काहीही करायचे का ? तुम्ही येथे एवढी सुरक्षा लावली आहे की, गाडी येथून येणार नाही, जाणार नाही. गाडीतून किती माणसे आणायची यावर देखील मर्यादा. म्हणजे मग यामागे तुमची नेमकी भूमिका काय आहे ? अशा प्रकारे आपण येथे सुरक्षा व्यवस्था ठेवणार असाल तर हे शासन महाराष्ट्राला सुरक्षा कशी देणार आहे ? येथील आपल्या या सुरक्षे व्यवस्थेमुळे अध्यक्ष, सभापती, मंत्री, आमदार सारे चालत येत आहेत. चारही बाजूंनी भीतीदायक वातावरण या साऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे निर्माण झालेले आहे की, प्रत्येक जण एक दुसऱ्याकडे, आजूबाजूला भयचकित नजरेने पाहतो आहे. अशा प्रकारे आपण महाराष्ट्राच्या जनतेने निवडून दिलेल्या आमदारांवर गैरविश्वास दाखविणार असाल तर ते बरोबर नाही. आपण सुरक्षेबाबत काही सूचना दिल्या आहेत त्या आम्ही वाचल्या. ती जी काही बैठक आपली झाली त्यामध्ये मी हजर नव्हतो. पण मी देखील आपल्याला या अगोदर सांगितले होते की, तुम्ही विधिमंडळामध्ये येणारी संख्या मर्यादित करा. आमदारांसाठी कँटीन आपण काढले पण तेथेही

....व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते.....

आमदाराला बसायल मिळत नाही, इतरच मंडळी तेथे असतात. इतकेच काय, पण मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेबांना सांगू इच्छितो की, उद्या तुम्हाला कोणी शिष्टमंडळ भेटायला येथे आले तर ते या विधिमंडळामध्ये येऊ शकणार नाही तर त्यासाठी लांब उभारलेल्या मंडपामध्ये तुम्हाला जावे लाणार आहे तेथे तुम्ही या शिष्टमंडळाची भेट घेऊ शकणार आहात. सभापती महोदय, आता आपण हे सारे केले आहे ते योग्य आहे असे म्हणत असाल तर मग आमचे काही म्हणणे नाही, पण महाराष्ट्रातील जनतेला हे कळले पाहिजे की संसदेसारख्या या विधिमंडळावर कोणता हल्ला होणार आहे ? अफझल गुरु सारखा नाही तरी आज अत्यंत सुरक्षा व्यवस्थेत जगतोच आहे, तसे असेल तर मग कोणालाही हल्ला करु द्यात, झालाच हल्ला तर त्यात दोन चार पोलीस, 5-10 माणसे मरतील, त्यांची चिंता आपण का करता ? त्यांना शहीद म्हणून आपण हार घालणारच आहोत. तेव्हा ही बाब अत्यंत गंभीर आहे. तुम्ही आमदारांबद्दल गैरविश्वास दाखवित आहात तो बरोबर नाही. आपण जे काही केले आहे वा करता आहात ते योग्य आहे असे वाटत असेल तर त्याचे कारण काय हेही आपण येथे सांगितले पाहिजे. विधिमंडळावर हल्ला होण्याची भीती असेल तर तसे आम्हाला कळले पाहिजे. म्हणूनच मी औचित्याच्या मुद्याद्वारे या सुरक्षे व्यवस्थे संबंधीचा मुद्दा गांभीर्याने येथे मांडला आहे. त्याबाबत आता खुलासा कोण करणार ? सभापती म्हणून आपण करणार की, सरकार करणार आहे हेही मी समजू शकत नाही. पण कोणाकडूनही येथे खुलासा व्हावा एवढीच विनंती.

(यानंतर श्री. सरफरे----डब्ल्यू 1..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. वास्तविक पहाता विधान भवन, आणि या सभागृहाची सुरक्षितता कशी असावी हे ठरविण्याची जबाबदारी माननीय सभापती व माननीय अध्यक्षांची असून त्यांच्या अधिपत्याखालील ही बाब आहे. आज सकाळी विधान भवनाच्या प्रवेशव्दाराजवळ आलो असतांना सुरक्षा रक्षकांकडून आम्हाला अडविण्यात आले. यापूर्वी असे कधीही आम्हाला अडविण्यात आले नव्हते. आज माननीय राज्यपाल महोदय दोन्ही सभागृहांना संबोधित करण्यासाठी येणार असल्यामुळे आजच्यापुरती ही व्यवस्था करण्यात आली असावी. परंतु गेली कित्येक वर्षे माननीय राज्यपाल महोदय या सभागृहामध्ये येत आहेत.त्यामुळे आतापर्यंत या सभागृहामध्ये येणाऱ्या माननीय सदस्यांवर, माननीय मंत्र्यांवर कधीही निर्बंध लादण्यात आले नव्हते. यापूर्वी आमदारांची वाहने मुख्य प्रवेशव्दाराजवळ आल्यानंतर व त्यांची तपासणी केल्यानंतर ती वाहने पोर्चमध्ये येऊन थांबत असत. त्या वाहनामधील आमदार खाली उतरल्यानंतर ते वाहन पुढे पार्कींगसाठी जात असे. परंतु आज वेगळी परिस्थिती पहावयास मिळाली. आम्ही वाहनामधून मुख्य प्रवेशव्दाराजवळ आल्यानंतर आम्हाला वाहनामधून खाली उतरण्यास सांगिततले गेले. आणि तेथून चालत-चालत विधान भवनाच्या इमारतीमध्ये येणे भाग पडले. आज माननीय राज्यपाल महोदय येणार आहेत म्हणून आजच्या पुरती ही व्यवस्था केली असेल तर मी समजू शकतो. परंतु हे निर्बंध आपण कशासाठी घातले आहेत? आज या सभागृहाच्या आजूबाजूला आमदार आणि मंत्र्यांपेक्षा बाहेरचे लोक त्यांच्याजवळ प्रवेशपत्रिका नसतांना सुध्दा फिरत असल्याचे, मंत्र्यांच्या दालनामध्ये शिरत असल्याचे आपणास पहावयास मिळते. त्यांच्यावर काहीही निर्बंध लादण्यात आलेले नाही. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या माननीय सदस्यांना सभागृहामध्ये प्रवेश करण्याच्या बाबतीत अशाप्रकारे निर्बंध घातले जाणार असतील तर ती गोष्ट योग्य होणार नाही. या सभागृहातील माननीय सदस्यांचे म्हणणे आपण ऐकून घेता. त्यामुळे याठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाच्या संदर्भात आपण स्वत: लक्ष घालावे. या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी गटनेत्यांना बोलाविले असेल तर मला त्याची माहिती नाही, कारण मला कधीही बोलाविण्यात आले नाही. आपण जर माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री यांच्या संमतीने ही सुरक्षितता वाढविली असेल तर ते बरोबर नाही. यामध्ये आपण सुधारणा करण्यासाठी लक्ष घालावे अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा मुद्दा वेगळा आहे....

उपसभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी म्हणणे मांडले आहे. तेव्हा सर्वच माननीय सदस्य बोलावयास उभे राहिले तर अडचण निर्माण होईल. या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांचे स्पष्टीकरण झाल्यानंतर आपण बोलावे....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा वेगळा मुद्दा आहे. आज सभागृहामध्ये प्रवेश करीत असतांना सुरक्षा रक्षकांनी मला सोबत लॅपटॉप आणू दिले नाही. माझ्या लॅपटॉपमध्ये वेगवेगळी माहिती संग्रहीत केलेली असते, सभागृहातील कामकाजाच्या दृष्टीने मला ती आवश्यक असते. माझा स्वीय सहाय्यक तो लॅपटॉप हाताळतो. त्यामुळे नाईलाजास्तव मला तो लॅपटॉप पुन्हा मनोरा आमदार निवासामध्ये पाठवून द्यावा लागला. एअरपोर्टवर कडक सुरक्षा व्यवस्थेमध्ये लॅपटॉप सोबत असतांना आम्हाला सोडले जाते. तर मग या ठिकाणी अशाप्रकारे आम्हाला अडवून कसे चालेल? लॅपटॉपसहीत आमदारांना विधान भवनामध्ये प्रवेश करण्यास अनुमती द्यावी अशी माझी विनंती आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ...

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, हा विधीमंडळाच्या संदर्भातील विषय आहे, सरकारच्या संबंधातील नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी असे म्हटले की, सरकारचे डोके ठिकाणावर नाही. परंतु या संबंधातील बैठकीच्या वेळेस सरकारसहित इतर जे गट नेते,अतिथीगण उपस्थित होते, त्या सर्वांचे डोके ठिकाणावर होते. म्हणूनच यावेळेला सभागृहाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात काही पोलीस अधिकारी, उच्च पोलीस अधिकारी, गृह विभागाचे अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, विविध नेते मंडळी चर्चा करण्यासाठी एकत्र आली आणि हे खरे आहे की, महाराष्ट्र राज्यातील काही ठिकाणे अशी आहेत की, जी अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर आहेत आणि त्यामध्ये "विधान भवन" हे सुध्दा निश्चितपणे आहे. पोलीस आणि आपले जे गुप्तहेर खाते आहे, त्यांनी ही सर्व माहिती दिल्यानंतर विधान भवनाच्या सुरक्षेच्या बाबतीत काय-काय करणे आवश्यक आहे याबाबत बैठकीमध्ये बरीचशी चर्चा झाली आहे. ही चर्चा झाल्यानंतर असे लक्षात आले की, याठिकाणी खूप गाडया येतात, खूप लोक येतात आणि मघाशी सन्माननीय सदस्य यांनी सांगितले त्याप्रमाणे येथे चालण्यासाठी सुध्दा रस्ता रहात नाही. कॅन्टीन मध्ये देखील गर्दी असते वगैरे. एकतर पोलिसांचे असे म्हणणे आहे की, आम्ही आणि आमचे पोलीस आतमध्ये फारसे येऊ शकत नाही. त्याचबरोबर आम्ही एवढे लोक कोणाकोणाची तपासणी करणार आहोत. मग यातून असा प्रस्ताव पुढे आला की, काही दिवसाकरता का होईना,परंतु या परिसरातील गर्दी कमी केली पाहिजे. त्याचबरोबर या संदर्भात आपण कडक नियम करुन ते काटेकोरपणे अंमलात आणले गेले पाहिजेत. मग असे ठरविण्यात आले आणि आम्हीच सांगितले की, जर गाडया बाहेर ठेवावयाच्या असतील तर ठीक आहे. आज देखील माननीय मुख्यमंत्री, माननीय अध्यक्ष, माननीय सभापती हे चालत आतमध्ये आलेले आहेत. माननीय सभापती, माननीय अध्यक्ष,माननीय मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री वगैरे कोणीच गाडी आतमध्ये आणलेली नाही. त्यामुळे आम्ही सुध्दा असे सांगितले की, माननीय अध्यक्ष, माननीय सभापती आणि पोलीस अधिकारी हे जो काही निर्णय घेतील, तो आम्हाला सुध्दा मान्य आहे. मग तुम्ही आम्हाला सांगितले की, गाडया बाहेर ठेवाव्यात, तर गाडया बाहेर ठेऊ. तुम्ही आम्हाला जे नियम घालून द्याल, ते माननीय मुख्यमंत्री यांच्यापासून सरकारचे मंत्री आणि आमदार सुध्दा ऐकतील. याचे सर्वांनी पालन करणे गरजेचे आहे. यामध्ये कुणाच्याही मानाचा किंवा

....एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

अपमानाचा काहीही प्रश्न उद्भवत नाही. तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीने जी पावले उचलणे आवश्यक आहे, ती उचललेली आहेत. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी लॅप टॉपच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला असून तो माननीय अध्यक्षांनी ऐकलेला आहे. त्यासंदर्भात ते सूचना देतील. मी त्याबद्दल काही बोलत नाही. ती बाब दुरुस्त करता येईल. मात्र आज सगळेच जण बाहेर उतरले आहेत आणि या विधान भवनामध्ये आपण सर्वजण चालत आलो आहोत आणि त्यामध्ये वाईट वाटण्याचे काही कारण आहे असे वाटत नाही. आम्हाला तरी काही वाईट वाटलेले नाही आणि इतरांनी सुध्दा वाईट वाटून घेण्याचे काही कारण आहे असे मला वाटत नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, ...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा कोणता हरकतीचा मुद्दा आहे? मी याठिकाणी उत्तर देण्यासाठी उभा आहे. त्यामुळे बोलणे संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडावा. सन्माननीय सदस्य म्हणाले म्हणून मी बोलत आहे. असे आहे की, मी त्या बैठकीच्या वेळेस हजर होतो आणि जसे सन्माननीय सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे तसा या सभागृहाचा नेता म्हणून मला बोलण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांकडे जशी माहिती आहे, तशी मी माझ्या कडील माहिती तुम्हा सर्वांसमोर मांडत आहे. जर ती चुकीची असेल तर ते दुरुस्त करतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लॅप टॉपच्या बाबतीत मुद्दा सांगितला. त्याबाबत मी सांगितले की, माननीय सभापतींनी हा मुद्दा ऐकलेला आहे. याबाबतीत पोलिसांकडून काही चूक झाली असेल तर ते दुरुस्त करतील, याबाबत सांगू शकतील. लॅपटॉप नेण्यास परवानगी द्यावयाची की नाही हा त्यांचा अधिकार आहे, त्याप्रमाणे ते सांगतील. आम्ही सुध्दा त्यांना सांगितले आहे की, तुम्ही सांगाल त्याप्रमाणे ऐकण्यास तयार आहोत. फक्त त्या बैठकीमध्ये काय झाले हे याठिकाणी सांगत आहे. ज्याप्रमाणे तुम्ही या सदनाचे सन्माननीय सदस्य आहात, त्याप्रमाणे मी देखील सदस्य आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे त्यांच्याकडील माहिती येथे सांगितली, त्याप्रमाणे मी देखील तुमच्यासमोर माहिती सांगितली आहे.त्यामध्ये जर काही चूक असेल तर माननीय सभापती तसे सांगतील.म्हणून मी माझ्यावतीने आणि सरकारच्यावतीने सांगत आहे की,या सभागृहाची काळजी घेणे हे जसे माननीय सभापती आणि माननीय अध्यक्ष यांचे काम आहे, पोलिसांचे काम आहे तसेच

. . . .एक्स-3

APR/ KGS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

ते तुमचे-आमचे सर्वांचेच काम आहे. म्हणून जर पोलिसांकडून काही टिप्स् आल्या असतील तर त्याप्रमाणे जर काही खबरदारी घ्यावयाची असेल आणि त्यासंबंधात माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांनी काही नियम घालून दिले असतील तर मला असे वाटते की, आपण सर्वांनी ते सगळे नियम पाळले पाहिजेत कारण हा आतंकवाद्यांकडून धोका आहेच आणि याबाबतीत अनेक वेळा माहिती देण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाकडून देखील आलेले आहेत की, विधान भवनाला आतंकवाद्यांपासून धोका आहे. म्हणून जी काही काळजी घ्यावयाची आहे त्यासाठी पोलिसांनी देखील सांगितले की, अमुक-अमुक गोष्टी केल्या तर बरे होईल. पोलिसांनी त्यांच्यावर दबाव टाकलेला नाही, त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला असे वाटते, शेवटी तुम्ही निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानुसार माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांनी या सर्व गोष्टींचा विचार करुन काही निर्णय घेतला असेल तर मला असे वाटते की, आपण सर्वांनी त्या प्रमाणे सहकार्य केले पाहिजे. धन्यवाद.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा अत्यंत गंभीर असा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब म्हणाले की, आम्हाला लाज वाटते. पण आम्हाला लाज वाटली असे मी कुठे म्हटलेले आहे. मी तसे म्हटलेले नाही. परंतु आता आपल्या निवेदनामध्ये जे काही आले आहे ते जास्त गंभीर आहे. मी असे म्हटलेले आहे की, विधान भवनाला जर धोका असेल तर अन्-ॲडेन्टीफाईड लोक असतील त्या लोकांना थांबविलेच पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

हा मुद्दा असू शकतो. पण आता आपल्या निवेदनातून असे आले की, या विधान भवनाला धोका असल्याने ही काळजी घेत असल्यामुळे कोणीही आत यावयाचे नाही. म्हणजे आपण सरळ आमदारांवर शक करीत आहात. म्हणजे आमदार सुध्दा त्या आतंकवाद्यांमध्ये असू शकतील हा त्याचा अर्थ होतो. आपण असे कसे म्हणत आहात ? आपण एक गाडी आयडेंटीफाय करता, त्या गाडीला आपण ओळखपत्र देता. माननीय भुजबळ साहेब, मी जे म्हणालो ते आपण समजून घ्यावे. ज्यावेळी आमची गाडी येते त्यावेळी त्या गाडीला आपण बॅज देता. त्याच्याशिवाय गाडी आत येत नाही. तुम्ही तपासा. आपण प्रत्येक आमदाराच्या दोन अभ्यागतांना रोज परवानगी देणार, त्यांना पास देणार. म्हणजे आम्ही सांगू त्यांना आपण पास देणार. ते कोण आहेत हे आपण कसे काय सांगणार आहात ? या सदनातील एक सदस्य आतंकवाद्याशी संबंधित आहे म्हणून सांगितले जाते, तो कशावरुन त्या माध्यमातून दोन आतंकवादी आत आणणार नाही ? आपण थांबवू शकणार नाही. आपण प्रत्येक आमदाराचे दोन अभ्यागत मान्य करता. हे यातील नियोजन आहे ना ? आपण आम्हाला कसे काय सांगता ? सभापती महोदय, आपण आमच्यावर संशय व्यक्त करुन आम्हाला थांबवले. आम्ही आनंदाने मस्त डुलतडुलत येऊ. त्यामध्ये आम्हाला लाज वाटण्याचा विषय नाही. या देशाच्या सुरक्षिततेकरिता हे सर्व करण्यास आम्ही तयार आहोत. पण त्या सुरक्षिततेमध्ये आमच्याकडे सुध्दा त्या पध्दतीने बघितले जाते याची खंत वाटते. अभ्यासगत येतील, ते विधिमंडळात राहतील. प्रत्येक आमदाराचे दोन अभ्यागत म्हटले तरी 700-800 लोक रोज येतील. ठीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आज जी काही सिक्युरिटी आहे त्याबाबत माननीय सभागृहाचे नेते श्री. भुजबळ साहेबांनी सांगितले की विधान भवन टारगेटवर असल्याचे इन्पुट आहे. मला कन्फ्युजन एवढेच आहे की, सकाळी बारा साडेबारा वाजता मुंबईच्या आयुक्तांना चॅनेलने विचारले की, विधान भवन टारगेटवर आहे म्हणून सिक्युरिटी वाढवली काय ? त्यांनी असे उत्तर दिले की, असे काही नाही, रुटीनमध्ये आहे. मी म्हटले असे असू शकते. मग गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मिडियाने खाली गाठलेले मी पाहिले. त्यांना विचारण्यात आले की, एवढी सिक्युरिटी का आहे ? विधान भवन टारगेटवर असल्याचे इन्पुट्स आहेत म्हणून आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्यांनी सांगितले की, असे काही नाही. रुटीनमध्ये आहे. आता सभागृहाचे नेते म्हणत आहेत की, विधान भवन टारगेट आहे. काल मंत्रिमंडळात जी मारामारी झाली त्यामुळे सिक्युरिटी वाढली की काय असे माझे पहिले मत झाले. त्या ठिकाणी जी दादागिरी, तलवारबाजी झाली त्यामुळे असे असू शकते. पण नंतर श्री. आर. आर. पाटील म्हणाले की, असे काही नाही, रुटीनमध्ये आहे आणि आता सभागृहाचे नेते म्हणत आहेत की, विधान भवन टारगेटवर आहे. यातील स्पष्टता आली पाहिजे. विधान भवन खरेच टारगेटवर आहे की नाही ? माननीय गृहमंत्री नाही म्हणतात आणि सभागृहाचे नेते होय म्हणतात. त्यामुळे याची स्पष्टता व्हावी एवढेच आमचे मत आहे.

उपसभापती : आता सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे जे बोलले तेही रुटीनमधले आहे. या ठिकाणी आता जी चर्चा झाली त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर दोन तीन सन्माननीय सदस्यांनी त्यावर आपले विचार व्यक्त केले. पहिली गोष्ट अशी की, 3 मार्चला आपल्या कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. त्यावेळी मला असे वाटते की, आपली बैठक आटोपल्यानंतर महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक, गृहमंत्री आणि पोलीस कमिशनर या सगळ्यांना त्या ठिकाणी बोलविले होते. विधान भवन हे एक अतिसंवेदनाशील स्थळ आहे ही बाब त्यावेळी निदर्शनास आणलेली होती आणि नुकतेच पुण्यात जर्मन बेकरीवर जो हल्ला झाला या सगळ्या पार्श्वभूमीवर हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे सिक्युरिटीच्या दृष्टीने जास्तीत जास्त काळजी कशी घेता येईल याच्यावर विचार झाला. त्या ठिकाणी आपण सगळेच उपस्थित होतो. यामध्ये एवढेच झाले की, त्या चर्चेच्या शेवटी ही चर्चा आता सर्वांच्या समक्ष न होता विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष, विधान परिषदेचे सन्माननीय सभापती, पोलीस महासंचालक आणि पोलीस आयुक्त अशा चार किंवा पाच लोकांनी मिळून चर्चा करावी आणि त्या चर्चेच्या अंती जे काही निर्णय होतील ते निर्णय आपणा सगळ्यांना बंधनकारक राहतील अशा प्रकारचा निर्णय झालेला होता, ही वस्तुस्थिती आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी लॅपटॉपच्या संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केला. आपला मुद्दा अत्यंत योग्य आहे. यासंदर्भामध्ये मी आता माननीय सभापती महोदयांशी लगेच चर्चा करुन उद्यापासून त्यांच्या संमतीने, त्यांच्या पूर्वपरवानगीने आपला हा जो मुद्दा आहे तो निकाली काढण्यात येईल

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

आणि आपल्याला तशी परवानगी देण्यासाठी मी त्यांना विनंती करीन. आता या विषयावरील चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 19 मार्च, 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 16 वाजून 15 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 19 मार्च, 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ...

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, हा विधीमंडळाच्या संदर्भातील विषय आहे, सरकारच्या संबंधातील नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी असे म्हटले की, सरकारचे डोके ठिकाणावर नाही. परंतु या संबंधातील बैठकीच्या वेळेस सरकारसहित इतर जे गट नेते,अतिथीगण उपस्थित होते, त्या सर्वांचे डोके ठिकाणावर होते. म्हणूनच यावेळेला सभागृहाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात काही पोलीस अधिकारी, उच्च पोलीस अधिकारी, गृह विभागाचे अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, विविध नेते मंडळी चर्चा करण्यासाठी एकत्र आली आणि हे खरे आहे की, महाराष्ट्र राज्यातील काही ठिकाणे अशी आहेत की, जी अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर आहेत आणि त्यामध्ये "विधान भवन" हे सुध्दा निश्चितपणे आहे. पोलीस आणि आपले जे गुप्तहेर खाते आहे, त्यांनी ही सर्व माहिती दिल्यानंतर विधान भवनाच्या सुरक्षेच्या बाबतीत काय-काय करणे आवश्यक आहे याबाबत बैठकीमध्ये बरीचशी चर्चा झाली आहे. ही चर्चा झाल्यानंतर असे लक्षात आले की, याठिकाणी खूप गाडया येतात, खूप लोक येतात आणि मघाशी सन्माननीय सदस्य यांनी सांगितले त्याप्रमाणे येथे चालण्यासाठी सुध्दा रस्ता रहात नाही. कॅन्टीन मध्ये देखील गर्दी असते वगैरे. एकतर पोलिसांचे असे म्हणणे आहे की, आम्ही आणि आमचे पोलीस आतमध्ये फारसे येऊ शकत नाही. त्याचबरोबर आम्ही एवढे लोक कोणाकोणाची तपासणी करणार आहोत. मग यातून असा प्रस्ताव पुढे आला की, काही दिवसाकरता का होईना,परंतु या परिसरातील गर्दी कमी केली पाहिजे. त्याचबरोबर या संदर्भात आपण कडक नियम करुन ते काटेकोरपणे अंमलात आणले गेले पाहिजेत. मग असे ठरविण्यात आले आणि आम्हीच सांगितले की, जर गाडया बाहेर ठेवावयाच्या असतील तर ठीक आहे. आज देखील माननीय मुख्यमंत्री, माननीय अध्यक्ष, माननीय सभापती हे चालत आतमध्ये आलेले आहेत. माननीय सभापती, माननीय अध्यक्ष,माननीय मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री वगैरे कोणीच गाडी आतमध्ये आणलेली नाही. त्यामुळे आम्ही सुध्दा असे सांगितले की, माननीय अध्यक्ष, माननीय सभापती आणि पोलीस अधिकारी हे जो काही निर्णय घेतील, तो आम्हाला सुध्दा मान्य आहे. मग तुम्ही आम्हाला सांगितले की, गाडया बाहेर ठेवाव्यात, तर गाडया बाहेर ठेऊ. तुम्ही आम्हाला जे नियम घालून द्याल, ते माननीय मुख्यमंत्री यांच्यापासून सरकारचे मंत्री आणि आमदार सुध्दा ऐकतील. याचे सर्वांनी पालन करणे गरजेचे आहे. यामध्ये कुणाच्याही मानाचा किंवा

....एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

अपमानाचा काहीही प्रश्न उद्भवत नाही. तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीने जी पावले उचलणे आवश्यक आहे, ती उचललेली आहेत. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी लॅप टॉपच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला असून तो माननीय अध्यक्षांनी ऐकलेला आहे. त्यासंदर्भात ते सूचना देतील. मी त्याबद्दल काही बोलत नाही. ती बाब दुरुस्त करता येईल. मात्र आज सगळेच जण बाहेर उतरले आहेत आणि या विधान भवनामध्ये आपण सर्वजण चालत आलो आहोत आणि त्यामध्ये वाईट वाटण्याचे काही कारण आहे असे वाटत नाही. आम्हाला तरी काही वाईट वाटलेले नाही आणि इतरांनी सुध्दा वाईट वाटून घेण्याचे काही कारण आहे असे मला वाटत नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, ...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा कोणता हरकतीचा मुद्दा आहे? मी याठिकाणी उत्तर देण्यासाठी उभा आहे. त्यामुळे बोलणे संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडावा. सन्माननीय सदस्य म्हणाले म्हणून मी बोलत आहे. असे आहे की, मी त्या बैठकीच्या वेळेस हजर होतो आणि जसे सन्माननीय सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे तसा या सभागृहाचा नेता म्हणून मला बोलण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांकडे जशी माहिती आहे, तशी मी माझ्या कडील माहिती तुम्हा सर्वांसमोर मांडत आहे. जर ती चुकीची असेल तर ते दुरुस्त करतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लॅप टॉपच्या बाबतीत मुद्दा सांगितला. त्याबाबत मी सांगितले की, माननीय सभापतींनी हा मुद्दा ऐकलेला आहे. याबाबतीत पोलिसांकडून काही चूक झाली असेल तर ते दुरुस्त करतील, याबाबत सांगू शकतील. लॅपटॉप नेण्यास परवानगी द्यावयाची की नाही हा त्यांचा अधिकार आहे, त्याप्रमाणे ते सांगतील. आम्ही सुध्दा त्यांना सांगितले आहे की, तुम्ही सांगाल त्याप्रमाणे ऐकण्यास तयार आहोत. फक्त त्या बैठकीमध्ये काय झाले हे याठिकाणी सांगत आहे. ज्याप्रमाणे तुम्ही या सदनाचे सन्माननीय सदस्य आहात, त्याप्रमाणे मी देखील सदस्य आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे त्यांच्याकडील माहिती येथे सांगितली, त्याप्रमाणे मी देखील तुमच्यासमोर माहिती सांगितली आहे.त्यामध्ये जर काही चूक असेल तर माननीय सभापती तसे सांगतील.म्हणून मी माझ्यावतीने आणि सरकारच्यावतीने सांगत आहे की,या सभागृहाची काळजी घेणे हे जसे माननीय सभापती आणि माननीय अध्यक्ष यांचे काम आहे, पोलिसांचे काम आहे तसेच

. . . .एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

ते तुमचे-आमचे सर्वांचेच काम आहे. म्हणून जर पोलिसांकडून काही टिप्स् आल्या असतील तर त्याप्रमाणे जर काही खबरदारी घ्यावयाची असेल आणि त्यासंबंधात माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांनी काही नियम घालून दिले असतील तर मला असे वाटते की, आपण सर्वांनी ते सगळे नियम पाळले पाहिजेत कारण हा आतंकवाद्यांकडून धोका आहेच आणि याबाबतीत अनेक वेळा माहिती देण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाकडून देखील आलेले आहेत की, विधान भवनाला आतंकवाद्यांपासून धोका आहे. म्हणून जी काही काळजी घ्यावयाची आहे त्यासाठी पोलिसांनी देखील सांगितले की, अमुक-अमुक गोष्टी केल्या तर बरे होईल. पोलिसांनी त्यांच्यावर दबाव टाकलेला नाही, त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला असे वाटते, शेवटी तुम्ही निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानुसार माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांनी या सर्व गोष्टींचा विचार करुन काही निर्णय घेतला असेल तर मला असे वाटते की, आपण सर्वांनी त्या प्रमाणे सहकार्य केले पाहिजे. धन्यवाद.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा अत्यंत गंभीर असा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब म्हणाले की, आम्हाला लाज वाटते. पण आम्हाला लाज वाटली असे मी कुठे म्हटलेले आहे. मी तसे म्हटलेले नाही. परंतु आता आपल्या निवेदनामध्ये जे काही आले आहे ते जास्त गंभीर आहे. मी असे म्हटलेले आहे की, विधान भवनाला जर धोका असेल तर अन्-ॲडेन्टीफाईड लोक असतील त्या लोकांना थांबविलेच पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

हा मुद्दा असू शकतो. पण आता आपल्या निवेदनातून असे आले की, या विधान भवनाला धोका असल्याने ही काळजी घेत असल्यामुळे कोणीही आत यावयाचे नाही. म्हणजे आपण सरळ आमदारांवर शक करीत आहात. म्हणजे आमदार सुध्दा त्या आतंकवाद्यांमध्ये असू शकतील हा त्याचा अर्थ होतो. आपण असे कसे म्हणत आहात ? आपण एक गाडी आयडेंटीफाय करता, त्या गाडीला आपण ओळखपत्र देता. माननीय भुजबळ साहेब, मी जे म्हणालो ते आपण समजून घ्यावे. ज्यावेळी आमची गाडी येते त्यावेळी त्या गाडीला आपण बॅज देता. त्याच्याशिवाय गाडी आत येत नाही. तुम्ही तपासा. आपण प्रत्येक आमदाराच्या दोन अभ्यागतांना रोज परवानगी देणार, त्यांना पास देणार. म्हणजे आम्ही सांगू त्यांना आपण पास देणार. ते कोण आहेत हे आपण कसे काय सांगणार आहात ? या सदनातील एक सदस्य आतंकवाद्याशी संबंधित आहे म्हणून सांगितले जाते, तो कशावरुन त्या माध्यमातून दोन आतंकवादी आत आणणार नाही ? आपण थांबवू शकणार नाही. आपण प्रत्येक आमदाराचे दोन अभ्यागत मान्य करता. हे यातील नियोजन आहे ना ? आपण आम्हाला कसे काय सांगता ? सभापती महोदय, आपण आमच्यावर संशय व्यक्त करुन आम्हाला थांबवले. आम्ही आनंदाने मस्त डुलतडुलत येऊ. त्यामध्ये आम्हाला लाज वाटण्याचा विषय नाही. या देशाच्या सुरक्षिततेकरिता हे सर्व करण्यास आम्ही तयार आहोत. पण त्या सुरक्षिततेमध्ये आमच्याकडे सुध्दा त्या पध्दतीने बघितले जाते याची खंत वाटते. अभ्यासगत येतील, ते विधिमंडळात राहतील. प्रत्येक आमदाराचे दोन अभ्यागत म्हटले तरी 700-800 लोक रोज येतील. ठीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आज जी काही सिक्युरिटी आहे त्याबाबत माननीय सभागृहाचे नेते श्री. भुजबळ साहेबांनी सांगितले की विधान भवन टारगेटवर असल्याचे इन्पुट आहे. मला कन्फ्युजन एवढेच आहे की, सकाळी बारा साडेबारा वाजता मुंबईच्या आयुक्तांना चॅनेलने विचारले की, विधान भवन टारगेटवर आहे म्हणून सिक्युरिटी वाढवली काय ? त्यांनी असे उत्तर दिले की, असे काही नाही, रुटीनमध्ये आहे. मी म्हटले असे असू शकते. मग गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मिडियाने खाली गाठलेले मी पाहिले. त्यांना विचारण्यात आले की, एवढी सिक्युरिटी का आहे ? विधान भवन टारगेटवर असल्याचे इन्पुट्स आहेत म्हणून आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्यांनी सांगितले की, असे काही नाही. रुटीनमध्ये आहे. आता सभागृहाचे नेते म्हणत आहेत की, विधान भवन टारगेट आहे. काल मंत्रिमंडळात जी मारामारी झाली त्यामुळे सिक्युरिटी वाढली की काय असे माझे पहिले मत झाले. त्या ठिकाणी जी दादागिरी, तलवारबाजी झाली त्यामुळे असे असू शकते. पण नंतर श्री. आर. आर. पाटील म्हणाले की, असे काही नाही, रुटीनमध्ये आहे आणि आता सभागृहाचे नेते म्हणत आहेत की, विधान भवन टारगेटवर आहे. यातील स्पष्टता आली पाहिजे. विधान भवन खरेच टारगेटवर आहे की नाही ? माननीय गृहमंत्री नाही म्हणतात आणि सभागृहाचे नेते होय म्हणतात. त्यामुळे याची स्पष्टता व्हावी एवढेच आमचे मत आहे.

उपसभापती : आता सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे जे बोलले तेही रुटीनमधले आहे. या ठिकाणी आता जी चर्चा झाली त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर दोन तीन सन्माननीय सदस्यांनी त्यावर आपले विचार व्यक्त केले. पहिली गोष्ट अशी की, 3 मार्चला आपल्या कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. त्यावेळी मला असे वाटते की, आपली बैठक आटोपल्यानंतर महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक, गृहमंत्री आणि पोलीस कमिशनर या सगळ्यांना त्या ठिकाणी बोलविले होते. विधान भवन हे एक अतिसंवेदनाशील स्थळ आहे ही बाब त्यावेळी निदर्शनास आणलेली होती आणि नुकतेच पुण्यात जर्मन बेकरीवर जो हल्ला झाला या सगळ्या पार्श्वभूमीवर हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे सिक्युरिटीच्या दृष्टीने जास्तीत जास्त काळजी कशी घेता येईल याच्यावर विचार झाला. त्या ठिकाणी आपण सगळेच उपस्थित होतो. यामध्ये एवढेच झाले की, त्या चर्चेच्या शेवटी ही चर्चा आता सर्वांच्या समक्ष न होता विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष, विधान परिषदेचे सन्माननीय सभापती, पोलीस महासंचालक आणि पोलीस आयुक्त अशा चार किंवा पाच लोकांनी मिळून चर्चा करावी आणि त्या चर्चेच्या अंती जे काही निर्णय होतील ते निर्णय आपणा सगळ्यांना बंधनकारक राहतील अशा प्रकारचा निर्णय झालेला होता, ही वस्तुस्थिती आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी लॅपटॉपच्या संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केला. आपला मुद्दा अत्यंत योग्य आहे. यासंदर्भामध्ये मी आता माननीय सभापती महोदयांशी लगेच चर्चा करुन उद्यापासून त्यांच्या संमतीने, त्यांच्या पूर्वपरवानगीने आपला हा जो मुद्दा आहे तो निकाली काढण्यात येईल

यानंतर श्री. खंदारे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

उपसभापती.....

आणि आपल्याला तशी परवानगी देण्यासाठी मी त्यांना विनंती करीन. आता या विषयावरील चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 19 मार्च, 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 16 वाजून 15 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 19 मार्च, 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही